म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २३७०



# …चीं पानें

REFBK-0011534

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम 39938 वि: निबंध
क्रमांक 93670 नों. दि: 5/7/82

99438

डॉ. कु. सरोजिनी बाबर

# खुणेचीं पानें

सुविचार प्रकाशन मंडळ
नागपूर-पुणें

REFBK-0011534

सर्व हक्क सुरक्षित ©

प्रथमावृत्ति आक्टोबर १९६१

मूल्य चार रुपये

प्रकाशक : श्यामकान्त वनहट्टी

सुविचार प्रकाशन मंडळ

धनतोली, नागपूर १

४६१।१० सदाशिव, पुणें २

मुद्रक : चिं. स. लाटकर

कल्पना मुद्रणालय, शिव–पार्वती,

४६१।१० सदाशिव, पुणें २

बॅ. शेषराव वानखेडे

व

सौ. कुसुमताई वानखेडे

यांना

—सरोजिनीताई

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| (१) | खुणेचीं पानं | १ |
| (२) | माझं घर | ९ |
| (३) | आईची शाळा | १४ |
| (४) | ग्रामधर्मांचीं माणसें | १९ |
| (५) | मीं पाहिलेला नवा खेळ | २७ |
| (६) | गैरसोयीचं आयुष्य | ३२ |
| (७) | आमचे आम्ही | ४० |
| (८) | स्वामी विवेकानंदांचा काळ | ४८ |
| (९) | आमची जडण घडण | ५७ |
| (१०) | काव्यानंद मीमांसा | ६३ |
| (११) | घरगुती माणसं | ७१ |
| (१२) | शेजारधर्म | ७८ |
| (१३) | आपली तपासणी | ८३ |
| (१४) | ज्ञानदेवी आणि मी ! | ९१ |
| (१५) | जुनी श्रद्धा | १०२ |
| (१६) | नव्या आयुष्यांत | १०९ |
| (१७) | समाज-चित्रें | ११६ |
| (१८) | अनोळखी माणसं | १२४ |
| (१९) | स्नेहसम्मेलन | १३१ |
| (२०) | हीं माणसंहि बोलतात ! | १३७ |
| (२१) | आतां इथंच थांबू या ! | १४५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
अनुक्रम ३७८६८ वि: ...
क्रमांक ...१४७४० नों दि ...
४।११५९
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ११४३८

# खुणेचीं पानें

अलिकडे असं कधीं तरी होतं कीं, माझ्या पुढ्यांतल्या अभ्यासानं क्षणभर कंटाळून माघार घेतली म्हणजे आतां अगदीं स्वस्थ बसून रहायचं, असं ठरवून मी हातांतलं पुस्तक मिटवून ठेवतें. पण तसं करण्यापूर्वी आठवण ताजी राहावी म्हणून जेव्हां मी माझ्या हातांतल्या पुस्तकांत खुणेसाठीं म्हणून एखादा कागदाचा तुकडा घालून ठेवतें, तेव्हां मलाहि नकळत माझ्या आयुष्यानं माखलेल्या पुस्तकांतील कितीक खुणा नजरेसमोर सरकूं लागतात. अशा वेळीं मी स्वखुशीनं घेऊं केलेला मघांचा निवांतपणा पडदानशीन होत जातो आणि माझ्या मनांत असंख्य आठवणींची गर्दी उडून जाते. मघांपेक्षांहि दुप्पट वेगानं मन कामांत गुरफटून जातं.

आपल्या आवडत्या फुलझाडाचा रसरशीतपणा, तजेला, सौंदर्य नीट पारखून घ्यावं म्हणून आपण जशी त्या झाडाच्या पानाफुलांची उलथापालथ करीत बसतों, तशीच मनांत घोळणाऱ्या आठवणींचीहि खालींवर हालचाल होते; आणि आपला आपल्याला अंदाज यायला लागतो. अशा वेळीं आपण समजून चालतों त्यापेक्षां आपल्याजवळ अधिक हिंमत असल्याचा पुरावा मिळतो. ह्या

आठवणी यायला लागल्या म्हणजे, 'अरे, सुख आपण पाहिलं आहे, अनुभवलं आहे!' अशा प्रकारच्या समाधानानं मन भरून जातं.

त्या दिवशींदेखील तसं झालं. आपल्याला उभ्या जन्मांत कधीं कुठल्या सभेंत जाऊन लोकांच्या समोर कांहीं बोलावं लागेल, याची मला कल्पनाहि नव्हती. पण स्नेहीमंडळींच्या भिडेला बळी पडून मी एका ठिकाणीं व्याख्यानासाठीं गेलें; नव्हे, मला जाणं भाग पडलं. परंतु घरांतून निघाल्यापासून काळीज एवढं हादरून गेलं होतं कीं, तिथं जाऊन काय बोलायचं, कोणत्या विषयावर बोलायचं याचा ठावठिकाणा लागेना आणि तोंडांतून शब्द तरी बाहेर येईल कीं नाहीं, याची शाश्वति येईना! ...कारण नसतांना हातपाय गार पडत चालले, उगाचच तहानेनं जीव व्याकुळ होऊं लागला आणि जीव घेणारं कांपरं अंगाला भरलं... समोर जमलेली मंडळी बघितल्यावर तर ह्या घटकेला धरणी पोटांत घेईल तर उत्तम या भावनेनं मी पायाखालची जमीन उजव्या पायाच्या अंगठ्यानं चांचपली! आणि विश्वास सोडून गेलेल्या मनाला 'चल, चटकन माघार घेऊन परत आपल्या घरीं' असं बजावीत मीं खालचा ओंठ दांताखालीं धरला. इतक्यांत कुणी तरी माझी ओळख करून द्यायला सुरुवात केल्याचा आवाज कानावर आला. मी चपापलें, ओशाळून गेलें. घाबरलेंदेखील. पण झालं असं कीं, ओळख करून देणारं माणूस दूरध्वनिक्षेपक यंत्रापासून बाजूला झालं आणि अंगांत एकाएकीं संचार व्हावा तशी मी त्या यंत्राजवळ जाऊन उभी राहिलें. 'कोठून आपणाला इथं यायची बुद्धि झाली आणि कबूली देतांना आपण कशी झक मारली कुणाला माहीत?' अशा पश्चात्तापानं गोरंमोरं होऊन काळवंडलेलं माझं मन क्षणार्धांत धीट झालं; आणि तापलेल्या तव्यावर राजगिरा टाकतांक्षणींच लाही फुटावी तसा एकेक शब्द माझ्या तोंडांतून बाहेर फेकला जाऊं लागला! ...न अडखळतां, न घाबरतां, अस्खलितपणें मी चांगली अर्धापाऊण तास मींच ठरविलेल्या विषयावर बोललें! भाषण संपलं. मी खालीं बसणार तों टाळ्यांचा गजर झाला आणि मी बोलूं शकतें, या कल्पनेचें प्रचंड स्वागत झाल्याचा इषारा मिळाला. मग मात्र 'वा! नाहीं नाहीं म्हणत सुंदर बोललांत कीं!' असं जो भेटेल तो म्हणूं लागला. तेव्हां मी अगदीं लाजून लाजून चूर होऊन गेलें, पण घरीं आल्यानंतर मात्र मला कळून

चुकलं कीं, माझ्याजवळ हिंमत आहे ! एखादी गोष्ट करायची म्हटली कीं, मला मार्ग सांपडतो आणि मी यशस्वीहि होऊं शकतें ! ...

तसं पाहिलं तर हा प्रसंग कांहींच वाटूं नये, अशा भयंकर वाटणाऱ्या दिव्यांतून माझं जीवन पुढं सरकलं आहे. आणि त्या प्रसंगाच्या भव्यतेनं सुरुवातीला गांगरून गेलेलं माझं मनहि अद्याप शाबूत राहिलेलं आहे.

मला वाटतं, मी त्या वेळीं बारा-तेरा वर्षांची असेन नसेन. खूप दिवसांनीं चिमुकली बहीण घरांत आली, या आनंदानं चार–सहा महिने बेहोष होऊन गेलेल्या मनाला खो बसावा तसं झालं. हसत खेळत आपल्या बाललीलांनीं मला वेडी केलेली माझी बहीण एकदम फार आजारी झाली. साध्या वाटणाऱ्या पडशाखोकल्यामधून तिला ब्रँको निमोनिया झाला. एवढीशी चिमुरडी तापानं फणफणून गेली आणि तिच्या घशांत घरघरूं लागलं. तसं सर्वांच्या तोंडचं पाणी पळालं. पोरीचं अंग काळंनिळं पडत चाललं आणि शिकस्तीचा प्रयत्न करणारे डॉक्टर दीर्घ उसासा टाकून निराश झालेले दिसले तेव्हां रिकाम्या पाळण्याला मिठी मारून आईनं आक्रोश सुरू केला. आणि जिच्यावरून मीं माझा सारा जीव पराकाष्ठेच्या मायेनं ओवाळून टाकला होता, ती माझी बहीण हालचाल करेनाशी झालेली बघून माझा प्राण आतां जाणार याच भावनेनं मीं अखेरचा श्वास घेतला आणि डोळे मिटून मट्‌कन खालीं बसलें. जणूं उभ्या दुनियेकडं मीं पाठ फिरवली आणि दुसऱ्या जगाचा रस्ता धरला. पण त्याच घटकेला डॉक्टरांनीं माझ्या नांवाचा पुकारा करतांच मी झोपेंतून जाग यावी तशी त्यांच्यापुढं धावलें आणि बहिणीचे मीं शिवलेले सारे कपडे आपल्या तोंडांत घालून ते चावीत माझा आवाज बंद करायला तयार झालेलं मन एकदम डॉक्टरांच्या इच्छेप्रमाणं हलूं लागलं. मध्यान्हरात्र टळून गेलेली. वडील बहिणीला मांडीवर घेऊन बसलेले. दुसरं कोणी जवळ नसलेलं. पण एरव्हीं रात्रीच्या वेळीं सैंपाकघरांतला दिवा एकटीनं मालवून अंधारांतून निजायच्या खोलींत यायला भिणारा माझा जीव अंधाराची पर्वा न करतां डॉक्टरांच्या घराकडे धावला ! मीं हवीं तीं औषधं, पायांना विमानाचा वेग देऊन आणलीं. आणि घमेल्यांतल्या उकळत्या पाण्यांत निलगिरी तेलाची बाटली ओतून त्यामुळें निर्माण झालेल्या वाफेवर डॉक्टरांनीं पालथ्या

धरलेल्या बहिणीनं मंद आवाजांत का होईना रडायला सुरुवात केली, तेव्हां मी जिवंत आहे का बघावं म्हणून स्वतःलाच चिमटा घेऊन बघितला !

त्यानंतर दोन-चार वर्षांनीं एक दिवस असा उजाडला कीं, ह्या माझ्या लाडक्या बहिणीला घेऊन मी कांहीं कामानिमित्त मुंबईला गेलें होतें. पण गेल्या रात्रीं काय झालं एकाएकीं कुणाला माहीत. मला रात्रीं आठच्या सुमारास सपाटून ताप भरला आणि अगदीं उभं राहवेना कीं बसवेनादेखील. तशांत हिला भूक लागलेली. दुसऱ्या कुणाला तरी हिला मांडीवर घेऊन भरव म्हणावं तर आम्ही हॉटेलमध्यें उतरलेल्या, सांगणार कुणाला ? बोलणार तरी कुणाजवळ ! शेवटीं माझं ताट खोलींतच मागवून मीं दार बंद केलं आणि बहिणीला मांडीवर घेऊन भरवूं लागलें. पण दोन-तीन घास जेमतेम मीं तिच्या जिभेवर ठेवले असतील नसतील इतपतच मला बसवलं आणि मी खालीं कोलमडलें. त्यासरशीं तिला पाणी पाजायला धरलेलं भांडं हातांतून उपडं झालं आणि तीहि समोरच्या ताटांत कलंडली...त्यानंतर घटकाभर काय झालं कळलं नाहीं. पण मीं डोळे उघडून बघितलं तेव्हां बहीण माझ्या तोंडांत तोंड घालून माझ्या गळ्याशीं पडलेली ! माझ्या काळजांत धस्स झालं. माझा ताप बहिणीला येईल या धास्तीनं मीं तिला बिगीनं बाजूला सारली, तों तिनं मला विचारलं, ‘ ताई, लागावलीस ? ’ तिच्या आवाजानं मन पोखरून निघालं. पोटांत भडभडून आलं. ‘ छे ! तुझ्यावर रागवेन कशी ? ’ अशी तिची समजूत घालून मीं तिला पोटाशीं धरली आणि तिला आतां तरी जेवूं घालावं म्हणून उठायचा प्रयत्न करूं लागलें. पण मला उठवेना. छाती जड झाल्यासारखी वाटूं लागली. जीभ आंत ओढल्यासारखी भासूं लागली. मग मात्र माझा धीर सुटला. छोटीला सोडून आपण मरतों कीं काय याच धास्तीनं कंबर खचून गेली. केविलवाण्या नजरेनं माझ्या काळजाचा वेध घेणाऱ्या चिमुकल्या बहिणीचं मी मेलेंबिलें तर कसं होईल, या काळजीनं काळीज दडपून गेलं. तरी पण मीं धीर धरला. कधीं नव्हती देवाला म्हटलं, ‘ पुण्याला आईबाबांचेकडे जाईपर्यंत छोटीजवळून मला बाजूला नेऊं नकोस ! ’ आणि तिला पोटाशीं धरून दहादा जीव जातो आहे अशा काळजीनं भेडसावणारी रात्र संपतांच मीं जीव मुठींत घेऊन पुण्याची गाडी पकडली. रस्त्यांतदेखील अनेकदा माझी मला खात्री वाटूं नये येवढ्या वेदना

झाल्या, पण देवाजवळ तोच एक हट्ट धरून मी छोटीभोंवतालची मिठी ढिली केली नाहीं. पुण्याच्या स्टेशनवर जिना चढून येतांना वरची एकेक पायरी स्वत: अगोदर चढून मला वर उचलून घ्यायला छोटीनं आपला हात पुढं केला कीं, मला उमाळे यायचे आणि हुंदक्यानं ऊर दाटून जायचा. वाटायचं, देवानं हिचा हिरमोड न करतां मला घरीं जाऊं द्यावं ! आणि घरीं आल्यावर जेव्हां वडिलांनीं बोलावून आणलेल्या डॉक्टरांनीं माझी परिस्थिति चिंताजनक असून काळजी घ्यायला पाहिजे, असं म्हटलं तेव्हां मनांतल्या मनांत हसून पुटपुटलें, 'चिंता रात्रीं होती. आतां संपली.' आणि आतां मी नक्कीच जिवंत राहणार या भावनेनं आईच्या कुशींत मीं तोंड खुपसलं.

आईची गोष्ट निघाली म्हणून सांगतें. मी सात-आठ वर्षांची होतें तेव्हांची गोष्ट. त्या वेळीं आम्ही दक्षिण सातारा जिल्ह्यांतील शिराळ्याला राहात असूं. तिथल्या नाथाच्या देवळाजवळ सुंदर पिसाऱ्यांचे मोर नाचतात म्हणून आई 'नको' म्हणाली तरी तिकडे जायचं मला भारी वेड. एकदा शेजारीं खेळायला जातें, असं सांगून मी सरळ नाथाचा रस्ता धरला. वाटेंत आभाळ भरून आलं, जोरानं विजा होऊं लागल्या आणि ही एकेक टपोरी गार पडूं लागली. तरी पण चार-दोन पोरी बरोबर होत्या म्हणून मीं नाथाचं देऊळ चिंब भिजून जात गांठलं आणि आम्ही, तिथली जत्रा भरत चालली होती त्यापैकीं, एका पालांत बसून राहिलों. पण गारांचा वर्षाव वाढला. पालं फाटून गेलीं ! ...आणि मग धो धो पाऊस जोरानं कोसळूं लागला. चिमणीसारखं माझं तोंड झालं, देवळासमोरच्या ओढ्याला पाणी येणार म्हणून लोक कुजबुजूं लागले. भीतीनं काळीज गोठून गेलं. डोळ्यांसमोर आई दिसूं लागली. भुकेनं जीव व्याकुळ झाला. पळत जाऊन घर गांठावं म्हणून मी उठलें आणि अंगावर पाऊस घेत पुढं निघालें तों वाजत गाजत ओढ्यांत मोठा पाण्याचा लोंढा आला आणि आमची वाट आडवली गेली...तें बघून मी मोठमोठ्यानं आईच्या नांवाचा पुकारा करीत सैरावरा धावून रडूं लागलें. आईकडे घार होऊन जावं, वाटूं लागलं. कुठून तरी चटकन् आईनं येऊन जवळ घ्यावं म्हणून जीव कासावीस होऊं लागला. पाय नेतील तिकडे मी पळत सुटलें पण जिकडे बघावं तिकडे पाऊस आणि पाणीच पाणी बघून आतां आईची गांठ पडत नाहीं या भीतीनं मनांत ठाण मांडलं आणि मी चिंचेच्या झाडावर

चढून माकडासारखी फांदीला कवटाळीत बसून राहिलें. पण अंधार पडत चालला तसं धाबं दणाणलं. पांढऱ्या जटांचीं भुतं येऊन खाऊन टाकतील अशी कुणीं तरी ऐकवलेली भीति घाबरवून सोडूं लागली आणि काय होईल तें होऊं दे, आईकडे जायचंच ह्या ईर्षेनं मीं भीतिबिती बाजूला सारीत घरच्या रस्त्याला लागलें. बरोबरच्या मुलींनीं मला ओढ्यांतून जाऊं नको म्हणून नानापरीनं अडवलं; तरी मी तशीच ढेंगा टाकीत पुढं निघालें. आणि पाहतें तों ओढ्याच्या पलीकडच्या तीरावर कंदील हालत असलेले ! माणसांची चाहूल लागली. मी मोठ्यानं आईला पुकारीत ओरडलें, 'आतां पुन्हा असं करायची नाहीं गऽऽ पण मला लौकर घरीं ने ! ' माझ्या आवाजानं जवळपासचीं दोनतीन माणसं आलीं. त्यांनीं मला 'येडी का खुळी' म्हणत मागं खेचलं. इतक्यांत एक चांगला पोहणारा माणूस भोपळ्यावर तरंगत आला आणि त्यानं 'माझी आई व बाबा कंदील घेऊन पलीकडे आलेत. पाणी आत्तां उतरेल. आपण लगेच जाऊं' असा मला धीर दिला. आणि त्या माणसाच्या रूपानं आईच आली या भाबड्या भावनेनं मी आनंदून त्याच्या कमरेला मिठी मारली.

अशा प्रकारच्या अनेक प्रसंगांना तोंड देतांना माझ्या मनानं हिंमत धरली आणि मला शाबूत ठेवलं याचा मला विलक्षण आनंद होतो; आणि मग वाटायला लागतं कीं, अशा वेळीं मनाची जी कुतरओढ होते आणि विलक्षण व महाभयंकर असा भावनांचा जो खेळ चालतो त्यामुळें जीवनाला एक प्रकारची गति येत जाते. आयुष्यांत सुखदुःखांना कशी वाचा फुटते आणि मग मन कसं फुलत राहतं याचीहि कल्पना येते. त्यामुळं मग आपल्या स्वतःच्या आयुष्याला जगावं कसं हें आपोआप समजत जातं.

आणि असं कांहीं मनांत येऊन मी वाचतां वाचतां ठेवलेल्या पुस्तकाला जवळ घेऊन मघां केलेली खूण बाहेर काढीत तें वाचूं लागतें तेव्हां मला पटूं लागतं कीं, पुस्तकांतल्या भावनाविष्कारापेक्षां आयुष्यांत हरघडी निर्माण होणाऱ्या संग्रामामुळं मनांतल्या मनांत होणारा भावनाविष्कार फार श्रेष्ठ दर्जाचा आहे. आयुष्याच्या महान् ग्रंथांतील खुणेचीं पानं फार मोलाचीं आहेत. आणि जगावं कसं हें तीव्रतेनं कळल्याखेरीज वाचलेलं, अभ्यासलेलं, पचवून टाकून शहाणं कसं व्हावं हें कळणं फार कठीण आहे. स्वतःच्या जीवनाची पारख

झाल्याशिवाय इतरांच्या जीवनाचा अर्थ समजणं त्यामुळंच फार अवघड होऊन बसतं !

अगदीं नुकतीच घडलेली गोष्ट आहे. कांहीं तरी नेहमींपेक्षां निराळं वाचावं म्हणून अलिकडेच अनेकांच्या आवडीचं झालेलं पुस्तक 'मिस्टर स्पीकर सर!' हें मी वाचीत होतें. त्या वेळीं ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदांच्या हालचाली आणि भाषणं वगैरेंची माहिती मनांत सांठवून घेत असतांना एक विचार मनाला चाटून गेला. 'या पुस्तकाचा खरा अर्थ समजून घेण्यासाठीं आपणांलाहि मोठ्या दिव्यांतून जावं लागलं आहे ! आणि त्यामुळंच आपलं मन त्यांत अधिक रमतं आहे.' त्यामुळं तें पुस्तक मी बोटांची खूण धरून मिटवलं आणि माझ्या जीवनाकडे थोडं मागं वळून पाहिलं.

त्या वेळीं एका आठवणीनं माझ्यावर एवढी पकड घातली कीं, तो क्षण मी ह्या घटकेला अनुभवीत असल्याचा मला भास झाला.

निवडणुकीचं मतदानाचं काम संपलं होतं आणि मतमोजणी सुरू झाली होती. अशा वेळीं दर क्षणाला नाना प्रकारच्या शंकाकुशंकांनीं मनाची विलक्षण ओढाताण होत होती. नाहीं नाहीं तें मनांत येत होतं. मी बाई माणूस म्हणून विरोधी उमेदवारांनीं केलेला प्रचार, प्रत्यक्ष मतदानासाठीं विनंती करावयास जातांना आलेला अनुभव, त्या वेळीं लोकांची होणारी हालचाल, खराखोटा असा नेमका कोणताच भाव त्यांच्या चेहऱ्यावर न उमटल्याकारणानं आपणांला घेतां न येणारा अंदाज आणि कबूल करूनहि खरोखरच समक्ष कोणीं कसं मतदान केलं असेल याची वाटणारी धास्ती, या कारणांनीं मनाची बेचैनता पराकोटीला गेलेली ! तशांतच एका लहानशा खेड्यांत प्रचारासाठीं आम्ही कांहीं लोक गेलों असतांना झोपेंतून उठवलं म्हणून तें गांव मुठींत ठेवलेल्या पाटलांनीं भिकाऱ्याला दान द्यावं तसं 'एकदा सांगितलेलं कळत नाहीं का ?' म्हणून चिडून आम्हांला वाटेला लावलं होतं, तो प्रसंग मनाची स्थिरता नाहींशी करीत होता. त्यामुळं मतमोजणी चालू असतांना प्रत्येक क्षणाला काय होणार नि काय नाहीं याची या निवडणुकीच्या क्षेत्रांत नव्यानं उतरलेल्या माझ्या मनाला खात्री येत नव्हती. विरोधी उमेदवारांच्या पेट्या सुरुवातीला मोजण्यानं चढणारा आंकडा समोर आला कीं, क्षणभर श्वास कोंडत होता ! पण दुसऱ्याच क्षणाला आपण यशस्वी होणं

शक्य आहे, असं कुणी कुजबुजलं कीं, हुशारीनं मन कामाला लागत होतं. अखेरीस असं अनेकदा कमीजास्त होतां होतां जेव्हां मी निवडून आल्याचं जाहीर झालं तेव्हां मात्र घटकाभर मी एवढी गोधळून गेलें कीं खरंखोटं मला कांहींच कळेना ! माझ्या मागं उभ्या असलेल्या पाठिंब्याची भव्यता मला मापतां येईना. आणि एवढी हिंमत माझ्याजवळ कशी आली याचाहि मला पत्ता लागेना. पण जनतेच्या चरणीं माझी सेवा रुजूं झाली, या आनंदांत झालेला सारा शीण विसरून असंख्य मतांनीं माझं स्वागत केलं तेव्हां मात्र निवडणुकीचा अर्थ मला उमजला आणि त्याच ईर्षेनं मी विविधमंडळांतलं पहिलं भाषण केलं. त्या वेळीं देखील मी कसं काय घडलं म्हणून साशंक झालें होतें. पण अखेरीस माझ्याजवळच्या हिमतीनं उचल खाल्ली आणि मी त्याहि भाषणाच्या कसोटीला उतरलें.

●●●

# माझं घर

दारांत उगवला चंद्र. अंगणांत आलं चांदणं. भैन भावाचं निघालं बोलणं. नाहीं सुचलं खाणंपिणं. अपेक्षांचं झालं शिंपणं. भावनांचं निघालं टिपणं. प्रेमामृताचं झालं झिरपणं. अभिमान आला वर. त्याला नाहीं कशाची म्हणून कशाची सर. बोलणं झालं भराभर. मनोभावाला आला बहर. बहीणभावाच्या प्रीतीचा सामोरा आला सागर. जिवाभावाच्या त्यावर आल्या नौका. त्यांचं बोलणं निघालं धरीत मनोभाव पक्का. बहीण काय बोलली तें ऐका.

माझा मुलुख मराठमोळा, गांव गोठणाचं. घर चिरेबंदी वाडयाचं. भोंवतीं गणगोत असतं जिवाभावाचं. मनांत फुलतं चांदणं प्रीतीचं. घर दिसतं मुलाबाळांचं, पैपाहुण्याचं, आल्या गेल्याचं——स्वाभिमानाच्या करणीचं. नक्षत्रासारख्या घरधन्याचं. कृष्णदेवाच्या गोकुळाचं. शिवाजीच्या पुण्याईचं. मराठमोळ्या चालीरीतींचं. घरधनिणीच्या हाताखालचं. कर्तृत्वाच्या शिणगाराचं. सासरमाहेरींच्या वर्दळीचं. माझ्यामधच्या ‘ मी ’चं.

माझं बाळ गोरंपान. जसा देव सूर्यबान. नाजुक केतकीचं पान. गोंडस रूपाची खाण. काजळतीटीची येती शान. सकाळची न्हयारी. दुधा-दह्याची

भरते झारी. येती सोबतीला सूर्यनारायणाची स्वारी. दाही दिसांच्या कौतुकांत नारी. अंगणांत येतात सोनेरी धारा. पडतो मोत्यांचा चाराचुरा. उगवतीला दिसतो लाल शेंदरांच्या खाचांचा पसारा. वसरीवर वसतो गोपाळ कृष्णाचा सवंगडी झाडून सारा. गाईवासरांचा जीव होतो वाराहुरा. राघु मैनांचा नाच घुमतो न्यारा. मोराचा उभारतो पिसारा. चिमण्यांचा सजतो तंबोरा. अणिक या गोतावळ्यांत माझ्या बाळाला मी म्हणतें मनोहरा. शाम-सुंदरा. श्रीधरा. सारंगधरा. ये, माझ्या वासरा. उरीं दाटला पान्हा मग ठिपकतो झराझरा. न्याहरीची होते त्वरा.

घराची माझ्या लई डामडौल. हंड्या गल्लासांची तुळीला पडते झूल. माडीवर उप्पर माडी. नेसतें रेशमी साडी. तिचा कांठ जरीकांठी, हौशा कांत वळखतो माझ्या मनाची नाडी. हिरव्या चोळीनं दंड करतो रसारसा. हसतो काळजांतला आरसा. येते मनाला हुषारी. जिवाला चढते उभारी. हाताची सजते जागोजाग कारागिरी. दिवाळीला दिसतात नक्षीदार किनारी. सोपा सजतो धामुद्याच्या 'या बसा नमस्कारीं'. बघतात कौतुक नगरच्या नारी. माझा सखा श्रीहरी. घरांत आनंदाची फुटते गोळी. शहाणपण सांगा-यला येत नाहीं कोणी. मीच असतें शहाणी. गिरवतें कित्ता जसा देतें माझी माय मालनी. मी तिची शुक्राची चांदणी. बघून घ्यावी माझी करणी. लुटा-व्यात सौभाग्याच्या खाणी. नाहीं सांगत बरं का ही कहाणी. खरी गोष्ट वोलतेंय देखणी. घरीं आहेत वासाचे तांदूळ. दारीं आहे वासाचं फूल. सांगतें घराण्याचं कूळ. शेतांत येतो सहा खंड्या ढेपीचा गूळ. करतें हौसमौज. घालतें कोलापुरी साज. कामाधामांत कळत नाहीं कशी येते तिन्हीसांज. मला नाहीं कशा एकाची लाज. माझ्या घरीं आहे दिवाळीचं न्हाणं धुणं. रोज घरीं येतो राजा भोज. विणतो रेशमी बाज. काढतो मोत्यापवळ्यांचं कामकाज. राखतो घराचा वोज. आणतो नवी दुनिया रोज.

नवरा माझा कृष्णदेव. नणंद वासाची कोतमिरीची ठेव. सासूबाई खजिन्याची पेटी. मामांजी जगजेठी. दीरजाऊ वासाचे वेलदोडे. म्हणून कधीं नाहीं पडत कसलें कोडें. तरीपण मन होतें खरें वारंवार वेडें वेडें. भजन, कीर्तनाची दारीं उघडतात कवाडें. भक्तिरसाचे पडतात सडे. माणुसकीचे उभारतात नित्य नवे वाडे. मनांत हर्षाचा चौघडा झडे. पण कसें करूं मनाचें

अनुक्रम 39238 दि:
क्रमांक ....2340........ नों: दि:

रुपडें उघडें ? म्हणून कल्पनेचा पडतो पाऊस. विचारांची पडते झिम्मड. शब्दांचा उभारतो डोंगर. मनोभावाचा उसळतो गजर. आणि म्हणून माझी बोलते नुसती नजर. तेवढ्यानें होते कामाची आवराआवर. वाहवा करते कलाकुसर. जगाचा पडतो खरोखरीं मग विसर. मला फक्त घ्यायची असते माझ्या माणसांच्यावर प्रीतीची पाखर. त्या बळावर चढतें मी यशाचं शिखर.

बरं का, ऐकावं. माझा देश तसा माझा वेष, पाठीशीं उभा असतो वाडवडिलांच्या रूपानं घर संभाळणारा शेष. दारी असते स्वागताची वेस. गुणाच्या पारखीचा मला भारी असतो सोस. म्हणून कौतुकाची रोज भरते मी शेस.

वाटतं कसं, बाळानं मोठं व्हावं. पोथी पुस्तकं वाचावीं. कानींचा डूल डोलवावा. गिन्यानी हुरदं उकलावं. शिवाजीच्या शौर्यानं नटावं. ज्ञानदेवाच्या कीर्तीनं सजावं. तुकोबाच्या ऐश्वर्यानं माखावं. इतिहासाचीं पारायणं करावीत. साहित्याच्या गोण्या फोडाव्यात. शूर वीरांचे पवाडे गावेत. ज्ञानाला सामोरे यावं. प्रसन्नतेला हसवावं. सौंदर्याला फुलवावं. रोज कांहीं शिकावं. नवा धडा घ्यावा. नवा कित्ता गिरवावा. बाळ म्हणजे घरचा आनंद. सर्वांचा ब्रह्मानंद. म्हणून मी म्हणतें त्याला आणावा रेशमी पाळणा. मोत्याचा खेळणा. त्यासाठीं सागर करावा उपडा. काढावेत चंद्रसूर्य. चांदण्याला करावी त्यांची ‘ जडण. ’ वडिलांनीं त्यासाठीं दिला आहे समुद्र आंदण. दारीं बांधलंय हिऱ्या-माणकांचं कंकण. सौभाग्याचं भूषण. बाळाला घाला हृदयाचं अंथरुण. मायेचं पांघरूण. म्हणावी अंगाई. आशीर्वादाला आणावी देवी शिवाई. करावी चांगल्या संस्काराची सरबराई. त्यासाठीं शहाणपणाची दारीं उभारावी आंबराई. घरीं उघडावी माणुसकीची पाणपोई. बाळ होईल मग सर्वांपेक्षां सवाई.

घर माझं निर्मळ. ढगावांचून आभाळ. दारीं गाईम्हशींची दावण. समोर सोन्यासारखं अंगण. घरांत आहे लाख मोलाचं गोदणं. धनी भरतात पाण्याची घागर. मी असतें नागर. त्यांची होते शाईची दऊत. मी होते लेखणी. म्हणून मी देखणी. त्यांना असतं रूप दाराचं. मला असतं चौकटीचं. म्हणून मी बोलणं करतें बळकटीचं. ते असतात चंद्र. मी असते चांदणी. म्हणून आकाश सोडून मी राहतें गगनीं. नेसतें भरजरी पैठणी. त्यांचं काम हंड्यासारखं. माझं काम परातीसारखं. म्हणून ते असतात गांवांत. अन् मीं असतें

घरांत. घरीं धनी आणतात अमृताची घागर. माझ्या प्रेमाला फुटतो पाझर. दोघांच्या प्रीतीचा होतो घरोघरीं गजर. ते माझी शक्ति. मी त्यांची स्फूर्ति. घरांत चमकतात माणिकमोतीं. दारीं फुलतात हवई चंद्रज्योती. सुखाच्या पाजळतात दीपमाळेवर पंचारती.

दारींच्या माझ्या ईर्षेचा कळस. तिच्या पूजेचा नसतो मला आळस. तुळस माझी सखी–राखती घराची एकी–जिवाभावाच्या गोष्टी विकी. तुळस माझी माउली. घरादाराची सावली. कृष्णदेवाची करवली. विठूरायानं तिला पालवली. गळ्यांत माळली. तिनं मला सजवली. शक्ति दिली. माझी पाठ राखली. मला गुण्यागोविंदानं सोबत दिली. धन्याच्या दारीं आणली. सुखानं नांदवली. म्हणून मी तिला न् ती मला दिसती सगळ्यांत आगळी.

माझा शेतमळा. मानमळा. ऊसमळा. सारा कसा छानदार गोतावळा. तिथली काळीशार मातीं. पिकवते माणिकमोतीं. भरते आपुलकीचीं पोतीं. जोडते जिवाशिवाचीं नातीं. उभारते घराच्या भिंती. लावते कीर्तीच्यां शिड्या सभोंवतीं. मला करते सौभाग्यवती. आणते अंगणीं चंद्रकिरणांची वस्ती न् ह्यांच्या हातीं अमृताचा कलश देती.

गोड भ्रताराचं सुख. बसते आयाबायांना सांगत. कोण कोण रहात ऐकत. भर दिवसा सूर्य राहतो त्या नादांत डोलत. पाखरं राहतात झाडावर चिवचिवत. पोरीबाळी असतात अंगणांत नाचत. मी मग असतें मळ्यांत. सपान पडतं मला खळ्यांत. नवरत्नांचा हार दिसतो कोलापूरच्या अंबाबाईच्या गळ्यांत. आणि सोन्याचं जानवं येतं रत्नागिरीच्या देवा ज्योतिबाच्या गळ्यांत. बोलला नवस धनी फेडत्यात मायबोलीच्या फुलांत. भूलोकींच्या चांदण्याच्या मेळाव्यांत. सनई चौघड्याच्या सुरांत. ढोल लेझमांच्या तालांत. गजा खेळ-णाऱ्यांच्या नाचांत. मग वाटेल तें येतं माझ्या मनांत. नसतें मी भानांत. राहतें खुशालींत. बोलतें ओवींत. सांगतें कहाणींत. दाखवतें करणींत. रांधतें उतरंडींत. बसतें तूप भिन्वीत. भाऊ जेवतो सोन्याच्या ताटवाटींत.

भावाला बहीण भेटली. सुखाची गोष्ट बोलली. रायाइंद्राच्या घरचं सांगावं तशी हारखली. काय बोलूं न् काय नको म्हणून भुलली. भावाच्या भेटीनं विसावली. माहेरच्या दर्शनानं सुखावली. माझ्यासारखी मीच

भाग्याची असं बोलली. भाऊ हंसला. आनंदला. बहिणीच्या कपाळावरची रेघ वाचली म्हणाला–हारखून टुम्म झाला. त्यानं मग शेलका वारू आणला. त्याला वाऱ्याचे पंख लावलेत म्हटला. आणि मग आईचा सांगावा त्यानं मनाच्या पेटींतून बाहेर काढला. माहेरीं चल म्हणाला. हिचा आनंद मग गगनांत मावेना. नजरेंत राहीना. ओठावर तरंगेना. त्यानं एकदम उसळी मारली.बहीण भावाला भेटली. सुखाची चवड मग तिथं उभी राहिली. तिनं हिला साजिवत केली. आईच्या कुशींत ओढली. बाळपणांत नेऊन सोडली.

●●▶

# आईची शाळा

मध्यंतरीं ब्रेन ट्रस्टचा एक कार्यक्रम झाला. त्या वेळीं इतर मंडळींच्याप्रमाणें मलाहि अनेक प्रश्न श्रोत्यांचेकडून विचारण्यांत आले होते. त्यांपैकीं बरेचसे प्रश्न स्त्रीजीवनविषयक असे होते आणि प्रामुख्यानें स्त्रियांच्या शिक्षणावर त्यांत भर देण्यांत आला होता.

प्रश्नांचा रोख लक्षांत घेऊन व स्त्रियांची बाजू चांगल्या प्रकारें मांडतां येईल तेवढी मांडून मीं भराभर उत्तरें दिलीं. पण एका उत्तराच्या वेळीं मात्र मला स्वत:लाच समाधानकारक वाटेल असें उत्तर देणें जड गेलें ! मीं तशी वेळ मारून नेली. पण मनाचें समाधान मात्र मुळींच झालें नाहीं. श्रोत्यांना काय वाटलें कुणाला माहीत पण मी मात्र अस्वस्थ झालें होतें.

आणि त्याला कारणहि तसेंच महत्त्वाचें होतें. हाच प्रश्न मला अनेकदां या ना त्या प्रकारें अनेक प्रसंगीं विचारला जात होता. आणखी दर वेळीं मी स्वत:च अधिकाधिक निरुत्तर होत जात होतें ! लहान मुलांच्या संगोपना-बाबत शिकलेल्या स्त्रिया अलिकडे कां उत्सुक दिसत नाहीत, व घरच्या नोकरांचेवर मुलें सोडून इतरत्र अनेक कार्यक्रमांत भाग घेण्यांत त्या आनंद कां मानतात या प्रकारचा तो प्रश्न होता. म्हणजे दर वेळीं शब्दांच्या मांडणींत

काय तो फरक; एरव्हीं मतलब ह्याच. पण त्यांतली वाईट गोष्ट अशी कीं, एवढ्यानें भागणारी ही गोष्ट नव्हती. म्हणजे प्रश्नापुरतेंच उत्तर देऊन मोकळें होणें शक्य नव्हतें. कारण त्यामागें स्त्रियांना फारसें शिकवूंच नये म्हणजे हा प्रश्न निघायचा नाहीं असा वडीलधाऱ्यांचा निर्णय उभा होता !

त्यामुळें उत्तर देणारांची मोठी पंचाईत व्हायची. स्त्रियांना खूप शिकावें असा मनाचा कौल एकीकडे दिला जायचा आणि दुसरीकडे हा प्रश्न एकपरी खरा आहे असें वाटूं लागायचें ! त्या कारणानें मनाची द्विधा अवस्था व्हायची. निश्चितपणें बोलणें कठीण जायचें.

आणि मग घरीं आलें तरी कित्येक दिवस हाच प्रश्न मनांत तरळत, रेंगाळत राह्यचा. पण नेमकें उत्तर म्हणून सांपडेना. अनेक विचार उलटसुलट बाजू पुढें ठेवीत, मनांत डोकावून जायचे ! आणि वाटायचें कीं, भगिनी समाजांतून गृहिणीचीं कर्तव्यें सांगणारीं विद्यालयें सुरू व्हावींत ! तिथं लहान मुलांच्या खऱ्या संगोपनाचे पाठ सुशिक्षित स्त्रीला वयस्कर, अशिक्षित बाई-कडून दिले जावेत ! एरव्हीं अशा प्रश्नांना उत्तर नाहींच !

आजकाल अशा शिक्षणाची फार गरज आहे. स्त्रीला आपल्या मुलाला वळण लावतां आलें पाहिजे. गृहपाठ देतां आले पाहिजेत. आई ही मुलाची पहिली शिक्षिका आहे हें समजलें पाहिजे, पटवितां आलें पाहिजे. जुन्या काळीं हें आवर्जून सांगितलें जाई. अनुभवानें अवलंबिलें जाई. त्या काळीं घर हें स्त्रीचें मुख्य कार्यक्षेत्र मानलें जाई. संस्कृतिसंवर्धनाची देवता म्हणून स्त्रीला समाजांत मान मिळे.

आज काळ बदलला आहे. शिकलेल्या स्त्रियांना घरकाम आवडेनासें झालें आहे. घराबाहेर काढतां येईल तेवढा वेळ काढण्याची त्यांची वृत्ति बळावत चालली आहे. अर्थात् याला कांहीं अपवाद आहेत. पण ते फार थोडे. त्यामुळें होतें मात्र असें कीं, एके काळीं " आईनें हेंच शिकविलें का ?" असा मुलांना प्रश्न विचारीत तो आतां " कुणीं रे सांभाळलें तुला बाळपणीं ? त्याची सावली पडली बघ हं !" या प्रकारच्या बोलण्यांत समाविष्ट होऊन जातो !

आणि मग प्राथमिक शिक्षणाबाबत तज्ज्ञ मंडळी चर्चा करीत राहतात. मुलांची जडणघडण कशी होते व कशी व्हावी याची विचारपूस करीत बसतात.

होतां होतां मग भगिनी समाजाकडून कांहीं अपेक्षा ते व्यक्त करतात. बायकांनीं अमूक करावें, तमूक करूं नये अशा निर्णयाला येतात. आणखी मग मुलाकडे जिव्हाळ्यानें कां पाहिलें पाहिजे याची मानसशास्त्रदृष्टया छाननी करीत मनाचें समाधान करूं पाहतात !

एक काळ आमच्या समाजांत असा होता कीं, बाई जिवापाड मुलाला सांभाळीत असे. चिऊकाऊच्या गोष्टीपासून तों राजाराणीच्या कहाणीपर्यंत मुलांना गोष्टी सांगून त्यांची जिज्ञासा वाढीला लावीत असे. जातां जातां त्यांतून बालामृत पाजीत असे. अंगाईगीतें गाऊन त्यांना जोजवीत असे. वडील माणसांचीं, कर्त्या पुरुषांचीं, देशभक्तांचीं चरित्रें ऐकवून त्यांच्यांत स्फूर्ति आणूं पाहात असे. सणासुदीला चालरीत शिकवीत असे. फार सांगतां आलें नाहीं तरी वडील माणसें करीत आलीं, त्यांचें त्यामुळें भलें झालें म्हणून आपण तें करावें असें तरी सांगून मुलाला हवें तसें वळण लावूं पाहात असे. घराण्याला शोभेल अशी वागणूक होईल हें स्वतः जातीनें बघत असे.

त्यामुळें शाळेंत जाण्यापूर्वीं मुलाच्या मनाची घडण एका विशिष्ट बैठकी-वर तयार होत असे. ज्ञान ग्रहण करण्याची ताकद मिळवून मूल शाळेंत पाऊल टाकी !

आजकाल निराळा देखावा पाहायला मिळतो. मूल आईच्या मागें मागें रेंगाळत तिला सतावीत नाहीं. आईचा आणि त्याचा फार थोडा संबंध येतो. रात्रीच्या वेळीं ! एरव्हीं दिवसभर गड्याच्या ताब्यांत मूल ! नोकर घडवील तो आकार त्याच्या मनाला प्राप्त होतो !

आणि तिकडे मग आई जगाच्या उठाठेवींत, इतर कार्यांत गुंग होत राहते, मन रमवूं पाहाते. त्यामुळें तिचा उपयोग मुलांना फारसा होत नाहीं. ती फक्त स्वतःचा विकास घडवूं इच्छिते. मुलांच्या विकासाचा प्रश्न ती शाळेवर सोंपविते ! गुरुजी पाहतील हा तिचा आत्मविश्वास असतो !

पण गुरुजी शाळेंत शिकवतात तें निराळें. आई घरीं शिकवते तें वेगळें. शाळेंत अक्षरओळख होते. लेखन-वाचन समजतें. वाचलें तें, ऐकलें तें पाठ करायची कुवत मुलांत येते. परंतु आईजवळ बिनपाटी-पुस्तकाचें असें मूल जें शिकतें तें त्याच्या काळजाला जाऊन भिडणारें असतें. त्याच्या मनाला पट-

णारें असतें. त्याच्या समजशक्तीला पेलणारें असतें. त्याच्या बुद्धीची बैठक उभारणारें असतें. म्हणून त्याची गरज अगोदरची. नंतर शाळेंतील शिक्षणाची आवश्यकता असते. म्हणून मला तरी वाटतें कीं, भगिनी समाजानें मुलांची ही भूक अगोदर कशी भागवितां येईल याचा विचार करावा.

दोन अडीच वर्षेंपावेतों नोकराच्या ताव्यांत सांपडलेलें मूल लगेच मॉंटे-सरीच्या वर्गांत धाडावयाचें तें प्रामुख्यानें घरांत शांतता नांदावी म्हणून हा विचार स्त्रीनें प्रथम मनांतून काढून टाकला पाहिजे. हा विचार भगिनी समाजानें ठांसून वरचेवर मांडला पाहिजे. याचा अर्थ मुलांनीं शाळेंत जाऊंच नये असा नव्हे. मुलें शाळेंत गेलींच पाहिजेत. पण त्या आधीं आईच्या शाळेंत तीं पास झालीं पाहिजेत एवढेंच माझें म्हणणें. आईनें कांहीं झालें तरी ही जबाब-दारी झुगारूं नये एवढाच माझा आग्रह आहे.

ज्या आया अशिक्षित असतात त्यांना शिक्षणाची कदर अजून वाटत नाहीं ! घरकाम मुलांना कसें येईल, चालरीत कशी कळेल एवढेंच त्या पाहा-तात. आणि सुशिक्षित आया मोठेपणाच्या नांवाखालीं दुसऱ्या कुणाकरवीं तरी मुलांचें संगोपन करून घेतात ! म्हणजे इथेंहि लहान मुलांच्या शिक्षणाची आबाळ होतेच. भावी पिढीची म्हणावी तशी काळजी घेतली जात नाहीं असेंच म्हणावें लागेल.

माझ्या लहानपणीं परिस्थिति वेगळी होती. मुलांना फार मोठ्या प्रमा-णावर शाळेंत धाडलें जात नसलें तरी मुलें आईच्या सावलींतच लहानाचीं मोठीं होत. चेंडू, लगोऱ्या, फुगडी, झिम्मा असे खेळ खेळतांच मुलें भावंडांना सांभाळलें पाहिजे, वडील माणसांचें ऐकलें पाहिजे, वडिलांच्या हाता-खालीं काम केलें पाहिजे हें समजून असत. त्याखेरीज घरांत निभाव नाहीं हें त्यांना पटत असे. त्यामुळें मुलांना एक प्रकारचा वडील माणसांबद्दल वचक वाटे. काम करण्यांत ईर्ष्या वाटे. खर्डे गिरवून अक्षर घटविण्यांत आनंद होई. तोंडपाठ गाणीं म्हणण्यांत भूषण वाटे.

आतांहि कांहीं प्रमाणांत हा भाग आहे, नाहीं असें नाहीं. पण घरांत नोकरांचा भरणा झाल्यानें आईचा हातच जिथें घरांत फिरत नाहीं तिथें मूल

कशाला जाईल ? काम न करण्यांत जर आईलाच आराम वाटतो तर मूल तिकडे लक्षच कशाला देईल ? अर्थात् गरीब कुटुंबांत हा प्रश्न उद्भवत नाहीं. तिथें आणखी निराळाच प्रश्न येतो. शाळा शिकायलाच काय पण कांहींहि शिकायला मूल म्हणावें तसें राजी होत नाहीं. रिकामटेकडा खेळ खेळीत गांवभर उनाडक्या करायला त्याला हवें असतें. त्यामुळें मनाला येईल तसें वागायला तें शिकतें आणि मग गुन्हेगार मुलें जन्माला येऊं पाहतात ! तेव्हां आमच्या भगिनी वर्गानें हें सारें बारकाईनें अभ्यासून त्याचा विचार करावा. ही फार अगत्याची गोष्ट आहे. मुलाला शिकवितांना आईदेखील शिकत असते, याचा पडताळा येणें आवश्यक आहे. स्वतःचें मूल म्हणजे जीवनाचा आनंद आहे हें तिला मनापासून वाटलें पाहिजे.

जुन्या काळीं बायका आपल्या घरच्या मुलांना चांफा मानीत ! जिवाचा लाल समजत. शेजारच्या मुलांत देखणा मानीत. मग त्याचं रूप विठूसारखं सावळं का असेना ! जगांतील सारें सौंदर्य ओंव्या गाऊन आपल्या मुलांत ओतून टाकीत ! माझा बाळ पुस्तक वाचतो आहे म्हणून त्याच्या कानींचा डूल हलतो आहे असें त्यांना वाटे. प्रत्यक्ष सूर्यदेवालादेखील त्या मुलाबरोबर न्याहारीचें बोलावणें करीत !

त्यामुळें स्वाभाविकच मुलाचें मन एक प्रकारें संस्कारक्षम होई, आईभोंवतीं सुखानें रेंगाळे. 'मातृदेवो भव' याचा अर्थ नकळत का होईना मानूं लागे ! आज त्याची गरज आहे. भगिनी वर्गाकडून समाजाची तशी अपेक्षा आहे. आणि म्हणूनच माझ्या कल्पनेप्रमाणें अलीकडे स्त्री-शिक्षणाचा प्रश्न हिरीरीनें चर्चिला जातो आहे. स्त्रीला गृहशिक्षणाची आवश्यकता आहे हें पुन्हा पुन्हा पटविण्याची गरज निर्माण होत आहे.

●●●

# ग्रामधर्माचीं माणसें

मध्यंतरीं कांहीं विद्वान् माणसांच्या घोळक्यांत मला बराच वेळ काढायची संधि मिळाली. त्या वेळीं वाटलें कीं, हीं माणसं नव्या वाङ्मयाचीं, नव्या जगाचीं, नव्या विज्ञानाचीं, महाविद्यालयाचीं, विद्यापीठाचीं किंवा असलींच कांहीं बोलणीं काढतील. म्हणून मीं थोड्या उत्सुकतेनंच त्यांच्या बोलण्याकडे कान दिला. पुढ्यांत आलेलं चहापाणीदेखील घ्यायच्या भानगडींत पडलें नाहीं. म्हटलं, त्यांत नको लक्ष गुतायला. ऐकूं या कांहीं नवीन. आणि म्हणून माझ्या अंवतींभोंवतीं बसलेल्यांच्याकडे कौतुकानं बघून मी हसलें. त्यांच्या बोलण्याचं कौतुक करावं म्हणून सहर्ष त्यांचं स्वागत केलं.

पण काय गंमत बघा, ही मंडळी जी बोलायला लागली ती एकदम धावत्या पळत्या इंग्रजींत ! बरंच्या बरं, मला तें कळत होतं म्हणून ! नाहीं तर पंचाईतच. आणि विषय कोणता काढला म्हणाल तर खेड्यांतील लोकांचा ! ! त्यामुळं मीं तर बाई थोडी घाबरलेंच. म्हटलं हीं माणसं काय बोलतात न् काय नाहीं. उगाच शहरांतील लोकांशीं त्या खेडुतांची तुलना निघाली तर करणार काय ? आणि झालं बरीक तसंच हं ! "खेड्यांतील

माणसं भारीं मागासलेलीं... त्यांना संस्कृति म्हणून नाहींच ... स्वतःचं देखील भलंबुरं कळूं नये एवढीं अडाणी ... " असलं बोलणं त्या विद्वान् माणसांनीं काढलं तशी मला ह्यांच्याच अज्ञानाची कींव आली. मी मनांत बोललें, "ह्यांनीं कधीं खेडं बघितलंय का? उगाच कुणाचं तरी वाचून न् ऐकून बोलावं म्हणजे ?" पण मोठ्यानं त्याचा आविष्कार केला नाहीं. ऐकत राहिलें.

परंतु फार वेळ दम निघेना. हीं माणसं साफ खोटें बोलताहेत अशी माझी पक्की खात्री झाली. म्हणून मीं चटकन् तोंड उघडलं, "खोटं आहे ! विचार करून बोला. " तशीं मात्र तीं माणसं चपापलीं. गप्प झालीं. एकमेकांकडे पाहात मला न्याहाळूं लागलीं. म्हणून मी पुन्हा बोललें,

' खेड्यांतील लोकांचं मानसशास्त्र निराळं आहे. अभ्यासून पाहा. त्यांचं जग जगून मग काय तें बोला. नाहीं तर अशानं उभा देश नालायक आहे म्हणून डोक्यांत राख घालून बसाल ! "

आतां मात्र त्यांनीं आपल्या बोलण्याची सारवासारव सुरू केली. पण माझी समजूत पटेना.....उभें कडवें घर न् पायाखालची घरांतील जमीन आपल्या हातानं सारवायची म्हणून, उभ्या घराचं मन निर्मळ करायचं ह्या भावनेनं घरादारांत वावरणारी खेडूत स्त्री गांवढळ कशी म्हणावी ? आणि आपल्या श्रमानं उभ्या दुनियेला पोसणारं माणिक–मोतीं शेतांत पिकविणारा शेतकरी तरी अडाणी कसा म्हणावा ? त्यांच्या संस्कृतीची पारख करणारे आम्ही कोण ? काय समजतं आम्हांला त्यांचं ? माझ्या डोक्यांत अशा विचारांची गर्दी झाली म्हणून मीं महात्मा गांधींचा ' हरिजन 'मध्यें १९४२ सालीं प्रगट झालेला एक विचार त्या विद्वान् लोकांच्या पुढ्यांत टाकला :

" माझ्या कल्पनेंतलें ग्राम-स्वराज्य हें पूर्णपणें लोकशाही स्वरूपाचें आहे. तें आमच्या महत्त्वाच्या गरजांसाठीं शेजाऱ्यांवर विसंबून असणार नाहीं. प्रत्येक खेड्यानें स्वतःपुरतें धान्य व कापड निर्माण केलें पाहिजे. त्या गांवांत लहान मुलांसाठीं खेळण्याचें मैदान, गुरांसाठीं कुरण, मोठ्या माणसांसाठीं नाटकगृह व एक सभागृह असेल. पिण्याच्या पाण्याची सोय तळीं व विहिरी बांधून केली जाईल. शिक्षण सक्तीनें दिलें जाईल. प्रत्येक कार्य सहकारी पद्धतीनें केलें जाईल. अस्पृश्यता व जातिभेद यांचा मागमूसहि तेथें आढळणार नाहीं. "

आणि मग पंचवार्षिक योजनांनीं पुष्कळशा प्रमाणांत साध्य केलेल्या ह्या ग्राम-स्वराज्यांतील माणसांच्याबरोबर आपुलकीनं बोलायची विनंती केली.

त्यावर मग चर्चा वेगळीच रंगली, विषय निराळे आले न् गेले — आणि अखेरीस खेड्यांतील माणसांची आर्थिक परिस्थिति कशी सुधारेल या विवंचनेंत ही बैठक मोडली गेली.

पण त्या दिवसापासून माझ्या मनाला चटका लागून राहिला. वर्षानुवर्ष आपलीं खेडीं स्वावलंबी ठेवून त्या गांवच्या धर्मानं वागणारीं आमचीं खेडुत माणसं नव्या सुधारलेल्या जगांत किती अडाणी ठरतात या प्रश्नानें मी व्याकुळलें.

खेड्यांतील माणसें गरीब आहेत. त्यांना पुरेंसें खायला मिळत नाहीं, ल्यायला मिळत नाहीं. पण म्हणून कांहीं त्यांची दानत कमी नसते. याहि परिस्थितींत घरीं आलेल्या पाव्हण्यांचं ते सानंद स्वागत करतात. हसत-मुखानं पोटाला चिमटा देऊन असलेली मीठभाकरी पाव्हण्याच्या पुढ्यांत ठेवतात. ही त्यांची संस्कृति आहे. मग ह्यांना अडाणी कसं म्हणायचं ? केवळ त्यांच्या घरांत लिहिणंवाचणं खेळत नाहीं म्हणून ? नाहीं. असं कोणीं मनांत आणू नये. ह्या लोकांना अक्षरओळख नसेल, पण त्यांचं कल्पनावैभव अमाप आहे. चंद्रसूर्याला लाजवील अशी त्यांची वाणी. लाखाची त्यांची भाषा. नव-लाखाची त्यांची करणी. त्यांच्या पायधुळीनं सूर्यदेवदेखील खुशीनं गदाळतो ! त्यांच्या पोटांत उमाळा, ओठांत अमृत आणि बोलण्यांत माणुसकी असते. करणींत सामर्थ्य असतं. म्हणून महात्माजी म्हणत कीं, खेड्यांत भारताचा आत्मा राहतो. आणि म्हणूनच ह्या देशाचा भलेपणा या देशांतील असंख्य खेडुत बांधवांच्यावर प्रेम करण्यांत, त्यांच्याकडे भक्तिभावानं पाह-ण्यांत व त्यांची सेवा करण्यांत आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू अलाहाबाद जिल्ह्यांतील सौदाबाद नांवाच्या गांवांत भाषण करतांना एकदा म्हणाले, " लक्षांत घ्या बांधवांनो, देशाचं धन कोणतं आहे ? कांहीं रुपये अगर पैसे म्हणजे धनदौलत नव्हे. रुपया न् पैसे हीं देशाच्या व्यापाराचीं साधनं आहेत, कीं ज्यांच्यामुळं आमचे नित्याचे व्यव-हार सुरळीत चालतात. चांदी, सोनं माणूस खात नाहीं कीं पीत नाहीं.

म्हणून मी म्हणतों कीं, तुमच्याजवळ कितीहि सोनं-चांदी असू द्या, खाण्यापिण्याशिवाय का तुम्ही जगूं शकतां? तेव्हां, धनदौलत ही श्रमानं निर्माण होणारी चीज आहे. कारागिरींतून, शेतीमातींतून, कारखान्यांतून, नदीनाल्यांतून धलदौलत बाहेर येते. कर्तबगारीनं शिणगारून ती पुढें येते. म्हणून मी म्हणेन कीं, आमच्या देशाची धन-संपत्ति जर वाढवायची असेल अर ती आपण आपल्या कर्तबगारीनं वाढविली पाहिजे. आम्हांला जेवढं म्हणून आवश्यक आहे तें आम्हीं पैदा केलं पाहिजे. स्वावलंबन हेंच खरं आमचं धन."

म्हणजे खेड्यांतील लोकांच्याबद्दल मोठीं माणसें अशीं आदरानं व आशेनं पाहतात, त्यांच्या विकासासाठीं धडपडतात, असा याचा अर्थ आहे. आणि पंडितजींसारख्या थोर लोकांना असं बोलणं भाग पाडणं हा या खेडुत मंडळींचा प्रमुख गुणधर्म आहे हें ओघानंच येतं. एवढंच नाहीं तर उभ्या देशाची शक्ति ह्या खेड्यांतील लोकांच्यामध्यें सामावलेली आहे असा याचा स्पष्ट खुलासा होतो. आणि मग देशाचा राज्यकारभार लोकनियुक्त प्रतिनिधि करतात त्याहिपेक्षां त्या कामाला उठाव आमजनताच आणूं शकते असाहि निष्कर्ष अशा वेळीं निघूं शकतो.

माझ्या लहानपणीं आमच्या राहत्या बागणी गांवीं (द. सातारा) आमच्या घरांत सारं कांहीं त्या लहानग्या गांवांतूनच येई. तेल्याच्या घरीं आमच्या शेतांतील करडईचा घाणा चालू होई व आम्हांला तेल मिळे. सुताराच्याकडून शेतीचीं अवजारं मिळत. कुंभाराकडून डेरे, गाडगीं, टिगाण्या मिळत. घरांत आजी रहाटावर सूत काढी त्याचं साळीकोष्टी कापड विणून देत. शिंपी कपडे शिवी, आणि बाराबैती या ना त्या प्रकारें सारें घरांत आणीत. म्हणजे परगांवाहून विशेष कांहीं आणायची गरज नसे. म्हणून मला कधीं त्या आमच्या खेड्यांत कांहीं कमी दिसत नसे. नाहीं म्हणायला आमच्या गांवीं सर्कस अगर सिनेमा कधीं तरी दुसऱ्या गांवाहून येई. पण ती रोजची गरज नसे.

आजदेखील आमच्या त्या गांवांत मला कांहीं उणीव दिसत नाहीं. तरी पण गांवचा रस्ता उत्तम व्हावा, तळं खोदून निघावं, विहिरी बांधल्या जाव्यात, शाळा उभारली जावी, वाहनांची सोय व्हावी असें मात्र वाटतें. आणि मग शहरच्या माणसांशीं दळणवळण वाढवून, स्थानिक स्वराज्य संस्थांशीं जवळचा संबंध ठेवून हें सर्व घडवून आणायला ईर्ष्या वाटते. गांवचा

विकास झाला पाहिजे म्हणून अहोरात्र मनाला हुरूप येतो. प्रगतीची आशा मनांत डोकावते. माणूस कार्यप्रवृत्त होतो.

माणसाच्या अशा कर्तृत्वामधून देशाला उठाव येतो. सरकारपेक्षां मग हीं असंख्य खेडुत माणसंच देशाच्या भल्याबुऱ्याची जिम्मेदारी अंगावर घेतात. देशाच्या रक्षणासाठीं त्यांची शक्ति पणाला लागते. म्हणून असं म्हटलं जातं कीं, जशीं माणसं तसा मुलूख. माणसावरून त्या मुलखाची पारख करावयाची.

१९५४ सालीं पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरूंनीं नागपूरच्या हिन्दी साहित्य संमेलनांत भाषण करतांना म्हटलं कीं, कोणत्याहि देशाची पारख ही त्या देशांतील लोकांनीं लिहिलेल्या साहित्यावरून करतां येईल. महाकवि मिल्टननें तर असं जाहीरपणें म्हटलं होत कीं, कोणत्याहि देशाच्या साहित्यावरून तिथले लोक कसे राहतात, तो देश दुर्बल आहे कीं सबल आहे, तिथं सौभाग्य नांदतं आहे कीं निराशा पसरली आहे वगैरे सर्व गोष्टींचा तपास घेतां येतो.

आमच्या खेड्यांतील लोकांचं साहित्य या संदर्भात अवश्य पाहता येईल. हीं माणसं लिहीत नाहींत पण बोलतात. दृष्ट लागण्याजोगं बोलतात. इंद्राला लाजवील अशा वैभवाची गोष्ट करणारं बोलणं काढतात. सरस्वती जशी हात जोडून त्यांना सामोरी येते.

मनांत आलं कीं, हीं माणसं चंद्रसूर्याला जेवायला बोलावतात. पानांफुलांच्या उपमा-दृष्टान्तांनीं मनांतील गोष्ट चारचौघांत मांडतात. वाऱ्याच्या गतीनं राजाराणींची कथा बोलतात. असं अद्भुत सांगतात कीं ऐकतच राहावं. घरांत मग कांहीं का असेना पण रेशमाची बाज विणायची, मोत्यांचा पाळणा गुंफायचा, पवळ्यांची ओटी भरायची, सागर सांडून रत्नं काढीत चांदवा करायचा, ऐशी खिडक्यांचीं घरें बांधायचीं, नऊशें दारांतून आखा मिरवायचं, असलं कांहीं जगावेगळं त्यांचं बोलणं ऐकलं कीं तहानभूक हरपते. वाटतं, ह्यांच्याबद्दल कुणीं बोलावं बाई? ह्यांची तारीफ करायला शब्द तरी नकोत सांपडायला? आणखी म्हणे ही मंडळी अडाणी!! हाय रे देवा! बोलणारांची जीभ तरी कशी उचलते? त्यांच्याकडून आम्हीं कांहीं शिकावं अशी त्यांची लायकी आणि आम्हीं पण त्यांना कांहीं शिकवावं हेंहि चांगलं. पण त्यांच्या कलानं घेतलं तर हं! एरव्हीं तेच आपणांला अडाणी म्हणून मोकळे!!!

कारण तीं माणसं बोलतात तें जगून दाखवतात. जगतात तेंच बोलूनहि दाखवतात. आम्ही पुस्तकं वाचून जास्त जगतों. कल्पनेंत तरंगतों. हवेंत फिरतों. व्यवहाराशीं सांगड बसत नाहीं आमची आणि आम्हांला त्यांनीं अडाणी म्हणावं असा प्रकार होतो. रीतीभातीनं जगणारीं, चालीरीतीनं वागणारीं हीं खेडुत माणसं आपल्या गांवच्या धर्माला जगतात. त्यांना आपलं जसं घर तसं आपलं गांव हें देवासारखं वाटतं. बाकीची फिकीर ते करीत नाहींत. म्हणून कोणी शिकलेला माणूस आला न् परक्या देशांतील सुधारणांची यादी वाचूं लागला कीं, हीं माणसं त्याच्यापासून दूर जातात! त्यांना एकदम नवं कांहीं पेलत नाहीं. साधा विजेचा दिवा घरांत आला तर एवढ्या उजेडानंच त्यांचे डोळे दिपून जातात! बावचळून जातात बिचारे!! पण रात्रीं अपरात्रीं अंधारांत विनचूक चालावं त्यांनींच. सूर्य-चंद्रांच्या गतीवरील घड्याळंहि त्यांनींच वाचावींत. आम्हीं कुणी शहरच्यांनीं त्यांच्याबद्दल बोलूं नये हें चांगलं.

माणूस जेव्हां एखाद्याबद्दल बोलतो तेव्हां तो आपले विचार दुसऱ्यापुढं ठेवतो. त्यामुळं जसा विचार तशी त्याची भाषा होते. म्हणून खेडें ज्यांनीं लांबून पाहिलं आहे त्यानं त्याबद्दल भाषा करायची ती लांबचीच होणार. तिच्यांत जिव्हाळा येणार नाहीं. मोठी मोठी विकासाची भाषा निघेल पण अंतरंग कळणार नाहीं. म्हणून खेड्याबद्दल शहरचे लोक जें लिहितात तें हेंगाडी भाषा घेऊन लिहायला बसतात असं वाटतं! त्यांना वाटतं कीं, वेडीवांकडी हेल काढणारी शब्दरचना असली कीं झालं काम, पण तसं नाहीं. खेड्याची भाषा करायची तर तशी रग अंगांत पाहिजे. नाहीं तर तें विडंबन होतं. आणि मग खेडुतांनीं तें वाचलं कीं ते तोंड वांकडं करतात, हिरमोडतात, रागावतात. त्यांना तो कमीपणा वाटतो. "तुमचं जग तुम्हांला लखलाभ, आमचं आम्हांला लखलाभ" ही त्यांची निकराची भाषा होते!

म्हणून खेडुतांची भावना सोन्याप्रमाणं तोलूनमापून जपली पाहिजे. हें काम कायद्यानं होणार नाहीं. हा साधा माणुसकीचा सवाल आहे.

त्यामुळं देशाचं खरं रक्षण करणं हें शस्त्रास्त्रांच्या हातीं नाहीं, कायद्यांत नाहीं, तर तें माणुसकींत आहे असं म्हणतात.

खेड्यांतील माणसं लाखांनीं देशकार्यांत सामील झालीं आणि १९४२ च्या क्रांतीनं भारताला स्वातंत्र्य मिळवून दिलं. भारताची सारी शक्ति एकजुटीनं

परक्या शक्तीशीं सामना देऊं शकली एवढेंच नाहीं तर पंडित जवाहरलाल नेहरूंना कधीं जनतेला आवाहन करावंसं वाटतं तर कधीं जनतेची आज्ञा मानावीशी वाटते !

देशाचा इतिहास माणसं घडवतात. म्हणून आमची खेडूत मंडळी आपल्य वागणुकीनं आमचा देश आमच्या खेड्यांत आहे असं विचारवंतांना म्हणायला भ ाग पडतात.

पण आजच्या काळांत मात्र खेडीं हीं शहरें बनूं लागल्यामुळं ह्या विचाराला मुरड घालायची वेळ आली आहे. माणसं आळशी होत चाललीं आहेत. ऐषआरामाकडे त्यांचा कल झुकूं लागला आहे. आणि आपल्या गांवावरून आतां त्यांचं लक्ष स्वतःकडे झुकलं आहे. म्हणून जर कोणीं त्यांना अडाणी म्हटलं तर मात्र तें मानावं लागेल. कारण हें आवाहन त्यांच्या कर्तबगारीला केलं जात आहे. देशाची सर्व प्रकारची शक्ति ही त्या देशाच्या जनतेच्या कर्तबगारींत सामावलेली असते, हा पिढ्यान् पिढ्या गिरवलेला धडा आतां नव्यानं धुळाक्षरं पाहावींत तसा त्यांच्यापुढं ठेवायची वेळ येणं हें कांहीं भाग्याचं लक्षण खास नव्हे.

आजचा काळ हा व्यक्तीचा विचार करण्यासारखा नाहीं. ही सामुदायिक जीवनाच्या कसोटीची वेळ आहे. म्हणून कोणी कोणाला मागासलेला न ठरवतां अगर कोणी कोणाबद्दल तर्क चालवीत न बसतां ज्यानं त्यानं आपल्या वागणुकीनं धडा घालून दिला पाहिजे.

कारण जगाच्या मानानं आज आम्ही खरंच मागं आहोंत. नव्या जगांतील शास्त्रीय जीवन आम्हीं आत्मसात् केलं पाहिजे. नवे नवे शोध लावून आमच्या देशाची मान जगांत आम्हीं उंच केली पाहिजे. कारण स्वाभिमानानं जगणं ही आमची संस्कृति आहे. स्वावलंबन शिकणं हा आमचा धर्म आहे. माणुसकीनं वागणं हें आमचं सौंदर्य आहे.

ग्रामधर्माचें पालन करणारांची हीच खरी दानत होय. ती त्यांनीं जिवापाड सांभाळावी.

उपनिषदांतील एक सुंदर गोष्ट अशा वेळीं आठवते.

एकदा काय झालं, देव, दानव आणि माणूस हे प्रजापतीच्या घरीं अभ्यासासाठीं म्हणून गेले होते. विद्याभ्यास संपल्यावर प्रजापतीनं एकेकाला

उपदेश करायचं ठरवलं. आणि एकेकाला बोलवून कांहीं बोलणं केलं. कसलं बोलणं म्हणाल तर एकाक्षरी मंत्र एकेकाला दिला. प्रथम देव, नंतर दानव व नंतर माणूस अशी वर्णी लागली.

तर झालं काय कीं देवांना प्रजापति म्हणाला, " उपदेश तर वर्षभर मीं केलाच आहे. अभ्यास करतांना आपण खूप शिकलांत. आतां अखेरीस एक अंतिम अक्षर आपणांस देण्यांत येत आहे. हें अक्षर म्हणजे ' द '." देवांना हा उपदेश मिळाला. नंतर त्याचा अर्थ विचारण्यांत आला. त्यांनीं उत्तर दिलें कीं, " ' द ' म्हणजे दमन करा. " मग ते निघून गेले.

नंतर दानव आले. त्यांनींहि विद्याभ्यास केला होता. त्यांनाहि तेंच अक्षर दिलें गेलें. त्यांनीं उत्तर दिलं, " 'द' म्हणजे दया करा. "

मग माणूस आला. त्यानं उत्तर दिलं, " 'द' म्हणजे दान करा. "

प्रजापतीला आनंद झाला. सर्वांचे अर्थ त्यास आवडले. श्रुतीमध्यें या दान, दया व दमन अशा त्रिविध कर्मांत उभ्या जगाचें कल्याण असल्याचें म्हटलें आहे. तसेंच यामुळें सामाजिक धारणाहि बलशाली झाल्याचा उल्लेख आहे.

प्रजापतीनं आपल्या शिष्यांना दिलेला हा मंत्र आजदेखील मेघगर्जनेंतून प्रकट होत आहे.

त्यामुळं आमचे शेतकरी मेघरायाचं लगीन काढून उतावीळपणें हर्षानं नाचत राहतात. आपल्या नाचगाण्यानं मेघरायाची प्रार्थना करून जगाच्या कल्याणाची भाषा करतात.

त्यांच्याकडून असं केवढं तरी शिकायला मिळतं आणि मग अशा कहाण्या रात्रीलाहि मागं सारीत ते ऐकवूं लागले म्हणजे ह्यांच्या मानानं आपण किती मागं आहोंत याचा मागोवा आपलं मन घेत राहतं.

अशा वेळीं जीव बाराहुरा होतो. असलं कांहीं पुस्तकांत गवसत नाहीं म्हणून मग खेड्याकडे धाव घ्यावीशी वाटते. आणि शहर व खेडीं यांचा संघटित दुवा घालून देशाचा प्रचंड असा क्रांतिकारी उठाव करायचा मोह होतो. मग ही ईर्ष्येची शक्ति एवढी उफाळून वर येते कीं, काय होतं तें तिचं तिलाच माहीत. आम्हीं काय तिची तारीफ करावी ! तिची तीच करूं जाणं.

● ● ●

# मीं पाहिलेला नवा खेळ

माझ्या आयुष्यांत असा प्रसंग केव्हां निर्माण होईल याची कल्पना मला जर एखाद्या ज्योतिषानें दिली असती अगर स्वप्नांतदेखील जरी कुणीं मला असें कांहीं घडेल म्हटलें असतें तरी माझा कांहीं त्या गोष्टीवर विश्वास बसला नसता. तशी ती गोष्ट जगावेगळी नसली तरी कटाक्षानें लहानपणीं मला तिच्यापासून दूर ठेवण्यांत आल्यानें माझा तसा ठाम ग्रह झाला होता. त्यामुळें ही नको ती गोष्ट माझ्यापुढें जेव्हां आपण होऊन चालत आली तेव्हां मात्र मी विलक्षण भांबावून गेलें. एवढी कीं, माझं मलाच भान राहूं नये एवढं माझं मन गरम झालं आणि भीतीनं काळीज दडपून गेलं ! त्याकारणानं आपण कुठं निघालोंत आणि काय चाललंय याचा अंदाज घेतां यावा म्हणून मीं अखेर शेवटीं माझा मलाच एक चिमटा घेतला तरीहि मला कशाची म्हणून कशाचीच दाद लागली नाहीं.

मी पाय उचलत होतें. माझ्या पायाखालची जमीन मागं सरकत होती आणि मी पुढं चाललें होतें. बस्स, यापलीकडे त्या घटकेला सुन्न झालेल्या माझ्या मनाला बाकीचं कांहींएक समजलं नाहीं. उमज तर कशाचाच पडला नाहीं.

पण अचानक कुणीतरी एकदम पुढं झालं आणि मला त्या व्यक्तीनें प्रेमानं जवळ ओढली तशी मात्र खाड्दिशी जाग येऊन मी जोराचा प्रतिकार करीत ओरडलें, "मागं हो!" तशी ती व्यक्ति एवढ्या जोरानं हसली कीं, त्या आवाजाच्या जुन्या ओळखीचा थांगपत्ता लागून माझेहि ओठ समाधानानं एकमेकांपासून विलग झाले आणि मीं मान वर केली! पाहतेंय तों 'दीदी' माझ्यासमोर उभी! "दीदी तूं?" मला ब्रह्मानंद झाला.

एखाद्या लहान मुलाप्रमाणं तिच्या कमरेला विळखा घालीत मी तिला बिलगलें. माझा सारा संकोच पार पळून गेला. वयानं माघार घेतली. भीतीनं ठाणं उठवलं. आणि दीदीच्या गळ्यांतील माझ्या आवडत्या बोरमाळेशी चाळा करीत मीं तिला मोठ्या उत्सुकतेनं विचारलं, "किती दिवसांनीं भेटलीस ग ऽ" तशी तिनं माझा हात जोरानं दाबला आणि नेहमींप्रमाणं एक टपोरं गुलाबाचं फूल माझ्या वेणींत माळीत हसून म्हटलं, "मग बोलत बसूं. ती बघ माणसं खोळंबून उभीं आहेत! जा!"

"माणसं?" दीदीनं माणसांचं नांव काढतांच माझी तंद्री उडाली. मग माझ्या लक्षांत आलं कीं, माझ्याबरोबर इतर लोक आलेत आणि मी 'खेळ' पाहायला आलेंय! मग मात्र मी दीदीचा हात सोडला आणि चटकन माझ्यासाठी राखून ठेवलेल्या पहिल्या रांगेतील खुर्चीवर येऊन बसलें.

मी बसलें होतें ती खुर्ची तशी मऊ होती. ऐसपैस होती. माझ्या आजूबाजूलाहि माझ्या नित्य परिचयांतील माणसं होतीं. म्हणजे तसं सारं ठीक होतं. पण खरं सांगायचं म्हणजे मला कसंतरीच वाटत होतं! कुठल्या तरी अनोळखी जगांत आपण आल्याचा भास तर होत होताच पण आपल्या हातून हें कांहींतरी जगावेगळंच आज घडत आहे या कल्पनेनं मी बेचैन झालें होतें. वास्तविक तसं व्हायचं कांहींच कारण नव्हतं. पण होत होतं खरं, म्हणून मी उगाचच एक वेळ उठल्यासारखं करीत माझ्या जागेवर नीट बसलें आणि माझा माथ्याचरचा पदरहि चांगला सावरून घेतला. एवढ्यांत माझ्या डाव्या बाजूनं आवाज आला, 'आतां नीट लक्ष द्या हं?' आणि त्याच क्षणाला समोरचा पडदा हलक्या पावलांनीं बाजूला झाला...

माझी मान वर झाली. पैंजणांची छुमछुम कानांत भरली. तुणतुण्याची रता छेडली गेली आणि मग शब्दांचा पाऊस पडूं लागला. एकदम मोठा

आवाज. विलक्षण धावाधाव. रोखीचा सवाल जबाब, पहाडी आवाजांतील लावणी असं कांहीं भराभर कानावर आदळूं लागलं.

इतक्यांत थिएटरच्या मागच्या बाजूनं कुणीतरी जोरानं तोंडानं शिट्टी वाजवली आणि समोरच्या रंगमंचावरील बाईनं मोठा मजेदार मुरका मारीत आपला नाच सुरू केला...

आतां मात्र मी तमाशा पाहात बसलें याची मला पक्की जाणीव झाली. आणि मी पुन्हा कारण नसतांना अस्वस्थ झालें. रंगमंचावरील 'वग', 'लावणी', 'नाच' वगैरे तसं कांहीं वेळ चांगलं चाललं होतं आणि यांतहि एक सुंदर कलाविष्कार पाहायला मिळतो आहे हीहि गोष्ट मनाला पटत होती. तरी पण रंगमंचावर नाचगाणं करायला आलेल्या बायका सोडल्या तर प्रेक्षकांच्यामध्यें औषधालाहि माझ्याखेरीज कुणी बाई आलेली न दिसल्यानं माझं मन कांहीं त्यांत रमेना. माझ्या मनाला जणू तें वातावरणच कांहीं केल्या पेलेना ! म्हणून मग मी पुन्हा पडदा पडल्यानंतर घरीं जायला निघालें तों दीदी आडवी येऊन म्हणाली, "आज तुला बोललं पाहिजे ! चांगली बोल सभेंतल्यासारखी. सगळ्यांच्या टाळ्या पडूं देत. मी हार घालीन ! अं ? शहाणी वेडी ग ऽऽ" आणि तिनं एवढ्या प्रेमानं माझा गालगुच्चा घेतला कीं, माझ्याच्यानं नाहीं म्हणवेनाच !

शेवटीं होय नाहीं करतां करतां मी रंगमंचावर येऊन खुर्चीत बसलें. इतर माणसं बसलीं आणि पुन्हा पडदा बाजूला झाला. मीं समोर पाहिलं तर ही गर्दी जमलेली. ओळखीचा एकहि चेहरा नाहीं. आतां काय करावं ?

पण मला विचार करायला सवडच मिळाली नाहीं. माझं नांव पुकारलं गेलं. मी भाषण करणार म्हणून जाहीर करण्यांत आलं. तशी माझ्या अंगावर सर्रदिशी कांटा आला. मी दीदीला डोळ्यांनीं खुणावलं. ती जवळ आली. म्हटलं, "जवळ उभी राहा", आणि मग बोलायला उभी राहिलें. तितक्यांत कुणीतरी कुजबुजलं, "तमाशा पाहायला देखील हिंमत लागते !" मीं होकारार्थी मान हालवीत मागं पाहिलं आणि बोलायला सुरुवात केली.

तशी मी आजवर कितीकदा सभेंत बोललें आहें आणि सभेंत बोलायचं ही गोष्ट माझ्या हाडीमांसीं भिनलेली आहे. पण या वेळीं मात्र मला 'मी

सभेंत बोलतेंय' ही कल्पनादेखील नवखी वाटली. मग विषय तर नवखा होताच होता !

परीक्षेच्या निमित्तानं शाहिरी वाङमय मीं अभ्यासलं होतं आणि सरकारच्या वतीनं तमाशाच्या वह्याहि परीक्षक या नात्यानं तपासल्या होत्या. म्हणजे बोलायला तशी माझ्याजवळ सामग्री खूप होती. लक्षांतहि बरंवाईट असं काय काय येत होतं. पण मी जी बोललें ती मात्र यापैकीं कांहीं न बोलतां आणि मी घटकाभर मनाशीं आखलं होतं तेंहि न सांगतां एकदम निराळंच !

त्यामुळं झालं काय कीं, माझं बोलणं प्रेक्षकांना नि तमासगिरांना पटलेलं जसं जसं मी त्यांच्या चेहऱ्यावरून वाचूं शकलें तशी तशी मी वेड्या-सारखी झालें ! वाटलं, हें काय आपण बोलत सुटलों ? एवढी आपुलकीची भाषा इथें कशाला ?

पण आतां ह्या वाटण्याला अर्थ नव्हता. मी सारं बोलून गेलें होतें ! आणि तें देखील आपुलकीनं, जिव्हाळ्यानं.

आणि तसं पाहिलं तर मी कांहीं खोटंनाटं सांगितलं होतं असं नव्हे, तर घडली गोष्ट बोललें होतें. माझा अनुभव सांगितला होता. आणि त्या कारणानं प्रेक्षकांनाहि सारं ओळखीचं वाटत होतं. दीदीच्या म्हणण्याप्रमाणें टाळ्या एकसारख्या पडल्या नव्हत्या तरी माणसं खुशींत होतीं. आणि खुद्द तिच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे होते !

माझ्या बालपणाची गोष्ट मीं लोकांना सांगितली होती.

त्या वेळीं मी फार तर चारपांच वर्षांची असेन नसेन. माझे आजोबा रोज उठल्याबरोबर मला आपल्या खांद्यावर बसवून गांवभर फिरायला नेत. आणि मीदेखील त्यांच्या भल्या मोठ्या पागोट्याचे एकावर एक बसलेले पीळ चाचपीत दोन्ही पाय त्यांच्या दोन्ही खांद्यावर ठेवून राजीखुशींत भटकायला जात असे. पण व्हायचं काय कीं, मला नेमकीं एक जागा नको असायची आणि आजोबा नेमकं तिथं घेऊन जायचे. हें कसं अगदीं रोजचं ठरलेलं ! तर शेवटीं एक दिवस मीं त्यांना विचारलं, "बाबा, इथं कशाला येतोस मला घेऊन रोज ? मला नाहीं आवडत हं ! पुन्हा बघ आणशील तर?"

तशी मला नको असलेल्या एका माणसाच्या हातांत मला देऊन पागोटं नीट बांधीत ते म्हणाले, "काग ? ह्यो नाच्या का न्हाई आवडत तुला ? गोळ्या देतोय कीं ? अं ? बत्तास देऊं दे का ? " तशी गाल फुगवून मी खेंकसलें, "अं हं ? काय नको. दिवसा पुरुष नि रात्रीं बाई. ईऽऽ मला नको ह्याच्या हातचा जा ! " आणि तिथून पळत सुटलें.

म्हणजे त्या माणसाचा हा विक्षिप्तपणा सोडला तर त्याच्याशीं खेळायला माझी ना नसायची. तसा तो चांगला. मोठा प्रेमळ. पण तो खोटें खोटें बायकासारखं वागायला लागला कीं माझं डोकं भडकायचं !

एक दिवस मी माझ्या आजोबांच्या जवळ ह्या नाच्याचा तमाशा बघायचा हट्ट घेतला. म्हणालें, "खरं खरं बाई दिसली तर उद्यां त्याच्या हातचं बत्तासं खाईन."

पण आजोबांनीं मला नकार दिला. मान डोलावीत साफ सांगून टाकलं "अंहं ! बायकांनीं तमाशा बघायचा नसतो."

"कां ? आणि तुम्ही त्याला काय वाटेल तें देतां तें ? "

"चूप ? पोरासोरांनीं सांगील ते ऐकावं ! "

आजोबांनीं माझ्यावर डोळे वटारले तशी मी हादरलें आणि गुपचूप घरीं निघून आलें--

आणखी एकदा असंच झालं. आमच्या गांवांत एक तमाशांत नाचणारी बाई होती. दिसायला देखणी, चवळीसारखी हालायची. कोकिळेसारखी गायची. साळुंखीसारखी नाचायची. आणि असा नखरा करायची कीं बस्स !

"कोण ? कोण ती ? " माझं बोलणं कुणींतरी मध्येंच अडवलं तशी मी घाबरलें. दीदीकडे बघितलं आणि मग तिनं यावर बोलूं नको अशी मानेनं खूण करतांच खुद्द तिचाच हा विषय बाजूला डावलून मीं वेगळ्या विषया-वर बोलून ती वेळ निभावून नेली.

आणि मग दीदीजवळ बसून उरलेला खेळ मीं पाहिला. कथ्थक नृत्यानं तर मला वेडं करून सोडलं. आणि हरिश्चंद्र राजावरील वगानं तर मला चांगलीच भुरळ घातली.

तरी पण शेवटीं घरीं निघतांना दीदीनं मला पुन्हा एकदा पूर्वीप्रमाणं बजावलं, "सारखी येत जाऊं नको तमाशाला. आणि मेलें तरी मी तुझ्यापुढं नाचायची नाहीं!" त्यामुळं मी तिथल्या मॅनेजरना एवढंच म्हणालें, "मोकळ्या मनानें बायका इथें येऊन हा खेळ बघूं शकतील एवढी कापाकाप केली कीं, बाकीचं तुमचं सर्व ठीक आहे." आणि सरळ घरीं निघून आलें.

पण अख्खी रात्र रंगमंचावरील तो खेळ आणि त्या खेळांत आपणाला बघूं नये म्हणून दीदीनं लहानपणीं माझा केलेला हिरमोड कांहीं केल्या मनांतून जाईना! त्यामुळें माणुसकीनं वागून आपल्या कलेची सेवा करणाऱ्या या दीदीसारख्या तमासगीर मंडळींना थोडं वळण लावलं तर त्यांची ही कला प्रेक्षणीय ठरेल असा विचार माझ्या मनांत प्रकर्षानं घोळूं लागला, म्हणून मी उशालगतचा दिवा मालवण्यापूर्वी दीदीला पत्र टाकून एवढंच विचारलं—

"दीदी, मीं पाहिलेला हा खेळ सगळ्यांना आवडेल, त्यांतील उत्तान शृंगारानं बायका उठून जाणार नाहींत आणि तुमची कला वाढीला लागेल यासाठीं काय करावं तेवढं तूं सांग. आज त्याची फार गरज आहे.—"

आणि मग तमाशा पाहायला जातांना कारण नसतांना भांबावलेली मी निश्चित मनानं झोंपीं गेलें.

● ● ●

अनुक्रम 31538 ...... वि: ......
क्रमांक ...13690...... नों: दि: ......

# गैरसोयींचं आयुष्य

त्या दिवशींची ती आठवण चुकूनमाकून का होईना मनांत आली म्हणजे बाकीच्या भोंवतालच्या साऱ्या जगाचं भान विसरून मी तिच्यांतच गुरफटून जातें. आणि एक प्रकारच्या रुखरुखीनं माझं मन काळवंडून जातं. अशा वेळीं मला कशाचं म्हटलं तर कांहीं सुचत नाहीं. उगाचच मी कमालीची बेचैन होऊन जातें; आणि मग मला दिसून येतं कीं, या साऱ्या अवस्थेला मी स्वतःच कारणीभूत आहें !... माझ्याच मनाची मला सोयिस्कर मांडणी करतां येत नाहीं आणि मी कारण नसतांना 'असं कां घडलं ? काय म्हणून असं असं झालं ?' याचा पडताळा मनाशीं घेत तासन् तास घालवून स्वतःला अस्वस्थ करून सोडतें !...

पण 'हें असं होणं बरं नाहीं' हें कळत असूनहि मला वळत नाहीं ! अशा वेळीं माझा मलाच मनस्वी राग येऊन मी स्वतःशींच बोलून जातें, 'या क्षणापासून मनाची सारी भीड चेपली पाहिजे. कोणी कांहीं म्हणो, आतां कुणाची पर्वा ठेवून स्वतःचं नुकसान करून घ्यायचं नाहीं कीं, मनाचीहि अस्वस्थता वाढूं द्यायची नाहीं !...' आणि कसला तरी पक्का निश्चय करून

समाधानानं कामाला लागतें. पण होतं काय कीं वेळ आली कीं, माझा हा बेत कुठल्या कुठं पार पळून जातो आणि मी 'येरे माझ्या मागल्या' करीत पुन्हा आपली तशीच एखाद्याच्या भिडेला डावलूं शकत नाहीं !

त्या दिवशीं देखील तसंच झालं. मुंबईच्या एका हॉटेलमध्यें मी, माझी मैत्रीण उतरली होती तिथं, रात्रींची झोपलें होतें. आणि चांगला एक वाजून गेला असावा; अशा वेळेला तिथला नोकर 'फोन आहे बाईंचा ! पुण्याचा ट्रंककॉल आहे ! ' अशी मोठ्यानं बडबड करीत दाराला धक्का देत असल्याचं मीं ऐकलं मात्र आणि ताडकन् बिछान्यावरून उठलें. 'काय बातमी असेल नि काय नाहीं' या धास्तीनं छाती दडपून गेली. आवाज आंत ओढला गेला. जागचा पाय हलेना. दिवा लावायला सुचेना. मी भांबावून गेलें... अखेरीस मघासारखाच बाहेरचा आवाज थोडा मोठ्यानं पुन्हा आल्यानं मी दचकलें आणि माझ्या मैत्रिणीला जागी करून भीत भीत दार उघडलं. पाहतें तों एक माणूस डोळे चोळीत जांभई देत खरंच पुटपुटत होता, "फोन आहे...पुण्याचा ! ..."

"चल ! बघूं या तरी." माझ्या मैत्रिणीला घेऊन मीं कसंबसं दार लोटून बाहेरून कडी घातली आणि घाबरत घाबरत रिसीव्हर हातांत घेऊन म्हटलं, "मी प्रतिभा. कोण बोलतं आहे ?" आणि काय उत्तर येईल या धास्तीनं जीव मुठींत धरून ऐकूं लागलें तों फोनमधून उत्तर आलं, "काय चाललंय स्वारीचं?"

मीं तो आवाज ओळखला आणि कांहीं उत्तर न देतां कपाळावर आठ्या चढवीत तशीच गप्प उभी राहिलें. त्यामुळं माझ्याजवळ उभी असलेली माझी मैत्रीण शोभा म्हणाली, "कोण ग ? काय आहे बातमी ?" इतक्यांत फोनमधून आणखी आवाज आला, "तूं खरंच काय ठरवलं आहेस ?" आतां मात्र माझ्या तळपायाची आग मस्तकापर्यंत पोचली. आणि मी उत्तर न देतां रिसीव्हर तसाच खालीं ठेवून शोभाच्या हाताला धरून माघारीं वळत पुटपुटलें,... "हिनं तर माझा पुरता छळ करायचं ठरवलंय् ! ..."

त्यामुळें शोभानं मला आश्चर्यानंच विचारलं, "म्हणजे ? कुणाचा फोन होता ? आणि या वेळीं ? पुण्याचाच कीं..."

मी आपली वैतागून भरा भरा खोलींत आलें आणि दोन्ही हातांनीं डोकें गच्च दाबीत पस्तावा व्हावा तशी बसून राहिलें.

" इश्श ! हें ग काय प्रतिभा ! कुणाचा फोन होता ? " शोभानं हिसडा देऊन माझे हात खालीं केले आणि मला रागारागानं पुन्हा विचारलं, " काय भानगड आहे ! "

आतां मात्र माझं मन मला सावरतां आलं नाहीं. कसलाहि विचार न करतां मी बोलून गेलें, " त्या चंपाराणीचा ! मेलीनं काय ठरवलंय् कळत नाहीं. मला ही झोंपूं देखील देणार आहे कीं नाहीं कुणाला माहीत ! घरांत कटकट नको म्हणून तुझ्याकडे आलें, तर इथंहि गांठलं हिनं !---अस्सा संताप आलाय् म्हणतेस---" माझ्या अंगाला बोलतां बोलतां कापरं भरलं. मी दांत-ओठ खाऊं लागलें---चिडून, संतापून बघूं लागलें---त्यामुळं शोभा थोडीशी दूर सरकली आणि माझ्या दुप्पट आवाज चढवून म्हणाली, " असं आहे तर 'माझ्याशीं बोलत जाऊं नको ' असं कां नाहीं एकदाच सांगून मोकळी होत ? "

तिच्या चढत्या आवाजानं मी भानावर आलें. चपापलें. ओशाळून गेलें. वाटलं उगाच आपण चंपाराणीचा विषय काढला.

" कां ? गप्पशी ? " मला गप्प बसलेली, बावरलेली बघून शोभानं माझ्या दंडाला धरलं.

तिला मी काय उत्तर देऊं ? घरचे आईबाबा, अप्पाकाका, सदाअण्णा सारीजणं मला हिच्या नादीं लागूं नको म्हणाले होते आणि शोभानं तर मला अनेकदा तसा इशारा दिला होता. तरी पण मी कुणाकडेच लक्ष न देतां चंपा-राणीच्या मैत्रीला बळी पडलें होतें. तिचा कितीहि राग आला तरी मी तिचा शब्द डावलूं शकलें नव्हतें. त्यामुळं मला आतां बोलायला तोंड नव्हतं ! आणि मला तसा धीरहि होत नव्हता. मी आपली स्वतःशींच जळफळत माझं कुठं चुकलं होतं याचा अंदाज घेत होतें...

" हें बघ प्रतिभा ! आतां मात्र एकदाच सांगतें. याउपर ऐकणं न ऐकणं तुझ्या मर्जीची गोष्ट. " शोभानं माझ्या दोन्ही खांद्यांवर रेलून माझ्या डोळ्यांत बघितलं. माझ्या अंगांतून सर्रदिशीं एक चमक निघून गेली. मीं एकदम नजर खालीं वळवली आणि म्हणालें, " तुझ्या दुपटीनं मला तिचा संताप येतो. पण मी माणुसकी गमवूं शकत नाहीं. माझ्यामुळं तिच्या जीवनांत आनंद येत असेल तर तो येऊं द्यावा या शुद्ध भावनेनं मी तिच्याजवळ गेलें..." त्यामुळं शोभा शांत व्हावयाच्या ऐवजीं अधिकच भडकली, " हं ! म्हणे माणुसकी

गमवूं शकलें नाहीं ! ...बस कर असली भापा; तूं स्वतःला गमवून बसली आहेस प्रतिभा ! ...त्याचा जाब कुणाला विचारूं ? ..."

" शोभा ! ..." शोभाची तिखट नजर मला झोंबली म्हणून मी दचकलें, तशी मला आपल्या दोन्ही हातांनीं आणखी गच्च आवळून ती म्हणाली, " उद्यां गोड बोलून तिनं तुला मारायचा डाव आंखला तर ?"

" तें शक्य नाहीं ! ..."

" वा ! कां नाहीं शक्य ? ...असलीं माणसं स्वतःची देखील पर्वा न करतां बेफामपणानं वागतात ! ...गोड बोलून एखाद्याचा बरोबर उपयोग करून घेतील स्वतःची प्रतिष्ठा वाढवतांना; पण केव्हां नि कसा कांटा काढतील नेम नाहीं...एवढी तुझ्या गळ्यांत गळा घालून तुला स्वतःजवळचं स्वर्गातलं ऐश्वर्य दाखविणारी ही चंपाराणी तूं एकदम तिला कांहीं लिहून द्यायचा नकार दिल्यावरोबर बिनसली ती ? ...ही कुठल्या मुलुखाची जीव घेणारी माणुसकी ? तुझं नांव तिनं पाळीव कुत्र्यामांजरांना द्यावं नि तूं तें बेशक खपवून घ्यावंस ? ..." शोभाला राहवेना. मनांतली सारी आग ओकून तिनं जळजळीत नजरेनं माझ्याकडे बघून माझ्या कानांत आणखी जी कुजबूज केली ती ऐकून माझं अंग एवढं शहारलं कीं, माणसांतून मलाच उठावं लागणार आहे या कल्पनेनं मी विलक्षण भेदरून गेलें...आणि त्या क्षणाला मीं ठरवून टाकलं कीं, आयुष्यांतील ही गैरसोय आतां एकदम बंद करायची ! ...

पण मीं असं कितीकदा ठरवलं असेल आणि पुन्हा तसं ठरवायची वेळहि कितीदा तरी निर्माण झाली असेल कुणाला माहीत ! हातभर मोठें पत्र लिहून आणि डोळ्यांत पाणी आणून चंपाराणी समोर आली कीं, माझं मन विरघळायचं ! राग निघून जायचा. तिनं 'पुन्हा असं करणार नाहीं' म्हटलं कीं, मी 'जाऊं दे. आतां असं नाहीं व्हायचं' या आशेनं मनांत समाधान येऊं द्यायची आणि आमचं हसतखेळत बोलणं–चालणं पुन्हा पूर्ववत् सुरू राहायचं...

एकदा तर ह्या तिच्या बोलघेवड्या नि वरकरणी स्वभावाचा कडेलोट झाला.

कसल्या कामासाठीं मी मुंबईला गेलें होतें त्या वेळची गोष्ट. मला एकाएकीं फणफणून ताप भरला. सपाटून अंग दुखूं लागलं. छाती भरून आली.

जवळ घरचं कोणी नाहीं. पण शोभानं माझी पराकाष्ठेनें सेवा केली. डॉक्टरांनी "ही एवढी रात्र विलक्षण काळजीची; फार जिकीर आहे. रात्र उलटली कीं, रोगी हातांत येईल." असं म्हटलं तरी धीर धरून मला आराम निर्माण करीत ती डोळ्यांत तेल घालून जवळ बसून राहिली. पण झालं काय कीं, अचानक तिचा भाऊ फार आजारी असल्याची तार आल्यानं ती मला पुण्याला घेऊन जायच्या तयारीला लागली. इतक्यांत "मी सांभाळतें हिला. तूं निष्काळजी राहा." असा चंपाराणीनं आग्रह धरल्यानं नाइलाजानं ती मला सोडून गांवीं गेली आणि चंपाराणीनं उघड्या मोटरींतून मला आपल्या घरीं नेली ! ...पण तिथं प्रत्यक्ष दुखण्यापेक्षां मला त्यामुळं निराळ्याच दुखण्याशीं झगडावं लागलं...

मला झोपवलं होतं त्या खोलीचीं सारीं दारं बाहेरून बंद करून घेऊन ती गेल्याबरोबर जी कुठे गडप झाली ती पहाटेच्या माझ्या मरणप्राय विव्हळण्यानं आंत आली.

तोंवरची सारी रात्र मीं मृत्यूशीं झुंज करण्यांत घालवली. घशाला कोरड पडली तरी प्यायला जवळ पाणी नाहीं, अंग दाबून घेऊन सगळ्या शरीराला लागलेला ठणका घालवावा म्हटलं तरी जवळ कोणी नाहीं. फोन करून डॉक्टरांना 'आतां मी संपत चाललें' असं कळवावं म्हटलं तरी सारीं दारं बंद, आणि सहन करण्याची शिकस्त करावी म्हटलं तरी काळीज हिरमुसलं होऊन शांत व्हायच्या मार्गाला लागल्याची छातींतील दडपण मला बेचैन करूं लागली...माशासारखी मी तडफडलें तेवढी. बाकीचा सारा उपाय शोभाबरोबर निघून गेला आणि माझ्या हिच्या शब्दाला बळी पडणाऱ्या स्वभावानं माघार घेत स्वतःला लाखोली वाहिली—पण सारं आंतल्या आंत ! वाटलं आईबाबापर्यंत पोचेन तरी कीं नाहीं कुणाला माहीत ! ...आणि तिथवर जायची इच्छा बाळगूनच मी जेव्हां पहाटेची किंचाळलें तेव्हां दार उघडलं गेलं—मी माझा सारा जीव एकवटून तिथून चालूं लागलें तशी ती डोळ्यांत पाणी आणून म्हणाली, "मला तूं फार आवडतेस...तुझ्यासाठीं मी वाटेल तें करीन...प्राणदेखील देईन वेळ पडली तर !" आणि तिनं मला अडवलं. तशी ताडदिशी थोबाडींत देऊन तिचं तोंड रंगवावं म्हणून

मोठ्या हिरीरीनं उचललेला माझा हात मीं खालीं घेतला आणि मुकाट्यानं तिथून पाय काढला.

एवढा भयंकर अनुभव आला तरी दुसऱ्याशीं फटकून वागण्याची ताकद माझ्या अंगांत आली नाहीं ! ...दुसऱ्या कुणाला आपल्यापायीं दुखवायचं नाहीं या माझ्या स्वभावानं मात्र माझ्याजवळ विलक्षण गैरसोय करून टाकली आणि मीं चंपाराणीचा नाद सोडला, तरी ह्या स्वभावानं कांहीं मला सोडलं नाहीं.

मी आणि माझ्या ओळखीच्या एक बाई एकदा अशीच कुठंतरी कांहीं काम होतं म्हणून गेल्याचं आठवतं. तिथं चांगले आठ दिवस आम्हीं एका हॉटेलांत एकत्र काढले असतील. पण रोजचा दिवस मात्र भारी कटकटीचा गेला होता. त्या बाईनीं स्वतःचं असं कांहींच सामान बरोबर आणलेलं नसावं. कारण उठलं कीं, माझाच कंगवा घेऊन तिनं वेणी घालावी, माझाच साबण आंघोळीला घ्यावा, माझ्या टॉवेलनं अंग पुसावं, माझ्याच करंड्यांतील कुंकं हवं तसं वापरावं; आणि माझ्याच टॉवेलनं कसलेबसले हात पुसावेत ! मला भारी चीड यायची ! पण मी ती गिळायची. वाटायचं, कशी का असेना, सोबत तर आहे ना, आणि या समजुतीनं मीं तो सारा त्रास गिळला. पण झालं असं कीं, निघायच्या आदल्या रात्रीं मला न सांगतां त्या बाईनं एकदम पोबारा केला आणि सकाळीं उठून पाहतें तों माझ्या परोक्ष तिनं घेतलेल्या दुधाचीं, वापरलेल्या पंख्याचीं, परटाकडील कपड्यांचीं आणि खाल्लेल्या फळांचीं बिलं माझ्या हातांत हजर झालीं ! आतां काय करावं ? मी मोठी दुचींत पडलें. कष्टी झालें. पस्तावलेंहि. पण स्वतःचा आब गमावूं नये म्हणून माझं बिल भागवून हेंहि भागवण्याइतपत जवळ पैसे नव्हते तरी वडिलांच्या मित्रांना फोन करून माझ्यावरच्या त्या आपत्तींतून निसटतां निसटतां जीव नकोसा झाला मला ! ...

एकेक सांगावं तेवढं थोडंच व्हावं इतक्या नाना प्रकारच्या असल्या अनेक प्रसगांनीं माखलेल्या माझ्या आयुष्याची मी जेव्हां अलीकडे मांडणी करून मनासारखं वागतां येईल का हें पाहतें तेव्हां मला स्पष्टपणें दिसून येतें कीं, माझं आयुष्य आतां फार गैरसोयीचं झालं आहे ! त्याला सोयीचं लावून घेणं मला आत्तां कठीण होऊन बसलं आहे...आणि असं कांहीं वाटूं लागलं कीं,

मग मात्र मी एवढी काळवंडून जातें कीं, माझ्याजवळची सारी हिंमत एकत्र गोळा झाली तरी मला लोकांना डावलून वागायचा मार्ग सांपडत नाहीं... आणि मग मी नुसत्या अशा आठवणींनींच मनाला पडणारीं घरं बुजवायचा प्रयत्न कल्पनेनें करीत कितीतरी वेळ शून्य दृष्टीनं नजर जाईल तिथवर मी पाहात बसून राहतें. अशा वेळीं मनाला भारी पस्ताव होतो. तरीपण एका समजुतीनें मनावर चढलेली ही काजळी बाजूला सरकूं पाहते कीं, ' लोकं आपल्याशीं कशींहि वागलीं असलीं तरी आपण त्यांच्याशीं फार सरळपणानं, चांगल्या भावनेनं वागलों ... आणि मग सऱ्याच क्षणाला मन अशाहि काळजीनं पोखरून निघूं लागलं कीं, आयुष्यांतली ही गैरसोय अशीच सहन करीत आपण गेलों तर जग आपल्या भलेपणाचा भलताच फायदा घेत राहील आणि मग आपण स्वतःच्या दृष्टीनं कुठल्याकुठं दूर फेकलें जाऊं त्याचा पत्ताहि लागणार नाहीं ! . .

आणि असं कांहीं फारच झालं म्हणजे मग मात्र मी स्वतःवरच चिडून स्वतःशींच बोलूं लागतें, " भावना जशा जगाला आहेत तशा त्या आपणालाहि आहेत ! ...आपल्या भावनांचा चोळामोळा करून स्वतःच्या भावनांना खत-पाणी घालून वाढवणाऱ्या स्वार्थी माणसांची आपणहि किती किंमत राखायची हें आपल्याला कळलं पाहिजे ! ...आणि तसं तें कळून त्याबरहुकूम जगतां आलं पाहिजे, यासाठीं आपल्या भावना अतिशय सावधगिरीनं आपण शाबूत ठेवण्याची शिकस्त केली पाहिजे ! ..." तेव्हां कुठं मनाला थोडासा विरंगुळा मिळतो. आणि मग झालं–गेलं विसरायचा प्रयत्न करीत मी हातांतल्या कामांत मन गुंतवून रिकामी होतें...

● ● ●

# आमचे आम्ही !

"तुला ह्या नसत्या उठाठेवी सांगितल्यात कुणीं ? मुकाट्यानं हा केर उचल आणि त्या तिथल्या खांबाजवळ फेकून दे ! आटप उचल."

आजीच्या पुढ्यांत मटाराच्या शेंगांच्या फोलकटांचा ढीग होता आणि तो ढीग तिथून उचलून रस्त्यावर नेऊन टाकण्यासाठीं तिनं मला हुकूम सोडला. आमची आजी म्हणजे मुलखाची रागीट बाई ! तिचा शब्द प्रत्येकानं झेललाच पाहिजे असा आमच्या घरचा शिरस्ता. तिनं सांगितलेलं ऐकायचं नाहीं म्हणजे निदान त्या दिवसापुरता तरी सारा कारभार बंद ठेवायची तिची पद्धत ! आजी रागावली कीं चुलीवरचं वरण चुलीवर, बुटींतली भाकरी बुटींत, तांब्यांतलं पाणी तांब्यांत आणि पोटांतली भूक पोटांत, असं समीकरण अगदीं ठरून गेलेलं ! अशा वेळीं कितीहि घाई असली अगर कितीहि भूक लागलेली असली तरी कुणींहि 'ब्र' काढायची सोय नसायची आणि याउप्परहि जर कोणी कांहीं बोललंच तर लाटणं पाठीवर ओढलं गेलंच म्हणून समजा ! —

आणि हें सारं माहीत असूनहि मी आजीवर रागावून म्हणालें, " मुळींच नाहीं उचलणार हा केर ! आणि रस्त्यावर तर नेऊन टाकणं शक्यच नाहीं. तुझा तरी कां ग एवढा अट्टाहास ?— "

" उचलतेस कीं नाहीं ? " आजी भडकली, संतापली. डोळे वटारून तिनं माझ्याकडे पाहिलं. पण कशी कोण जाणे, तिच्या रागाची भीति न वाटतां मींहि तितक्याच रागानें तिच्या नजरेला नजर भिडवली. आजी म्हणते म्हणून त्या टरफलांचा ढीग रस्त्यावर नेऊन टाकायची कल्पना मला मुळींच पसंत नव्हती. रस्त्यावरचा केर काढून नुकतीच झाडूवाली निघून गेली असतांना तिथं कशाला पुन्हा केर टाकायचा ? मग रस्ता स्वच्छ कशाला केला त्या बाईनं, नाहीं का ?—— माझं म्हणणं मीं आजीला पुन्हा एकदा समजावून सांगितलं तेव्हां माझा कान पिरगाळीत ती कडाडली, " रस्त्यावर केर पडला म्हणून तुझ्या बापाची बाभळ तर नाहीं ना बुडत ? झालाच केर तर काढील ती झाडूवाली पुन्हा ! तुला कशाला चोंबडेपणा ग ?—— ती झाडूवाली तुझी आई का बहीण तेव्हां एवढा कळवळा ?— उचलतेस कीं नाहीं ? "

कानाला जोराचा पीळ बसल्यामुळें 'अग अग !' करीत मीं तिथून उठायचा प्रयत्न केला. पण आजीनं कान सोडला आणि हात पकडून म्हटलं, " कां ? एवढा ग हट्ट केर न उचलायचा ? उचल आधीं ! "

आजीच्या इच्छेसाठीं शेवटीं तो टरफलांचा ढीग मीं सुपांत भरून सैंपाकघरांतील अडगळ बाजूला काढली. आजीला तें बघून बरं वाटलं असावं. कारण " अशी जरा सरळ वाग आडमुठेपणा सोडून ! " असा शेरा मारून ती समाधानानं चुलीकडे वळली. त्या संधीचा फायदा घेऊन मीं हळूच तें सूप ओसरीवर नेलं आणि कोपऱ्यांत ठेवलेल्या केराच्या डब्यावर धरून पालथं केलं. तेवढ्यांत कशी कोण जाणे, आजी पाठीमागून येऊन माझ्या हाताला हिसडा देत ओरडली, " कार्टेऽऽऽ इथं केर टाक म्हणून सांगितलं होय ? " आणि तिनं स्वतः तो डबा तिथून उचलून रागारागानं रस्त्यावर नेऊन पालथा केला !

" रस्ता खराब झाला म्हणून तुझ्या बापाचं काय गेलं ? म्युनिसिपालिटीचीं माणसं बघून घेतील ! आम्हांला काय ? " केराचा रिकामा डबा घेऊन

आजी परतली. माझ्या छातींत धस्स झालं. लगबगीनं रस्त्याकडे जात मी घाबरून म्हणालें, "आतां दंड झाला म्हणजे मग ?"

"दंड ?– कसला दंड ?" आजीनं कपाळावर आठ्या चढवल्या. आमच्या शेजारच्या रखमाईनं रस्त्यावर केर नेऊन टाकला म्हणून तिला पांच रुपये दंडाची शिक्षा झाल्याचं मीं नुकतंच ऐकलं होतं. आणि तसा प्रकार आजी केव्हां तरी आपल्या घरांत आणणार याची मला धास्ती होती. पण तसं कधींहि मी घडूं देणार नाहीं, असा निर्वाळा कालच मैत्रिणींजवळ मी देऊन बसलेली ! आणि आजीनं तर लगेच तो मार्ग पत्करला. न जाणो मुकादमानं तिला पाहिलंच तर ?... माझा जीव खालींवर होऊं लागला. घाईघाईनं रस्त्यावर जाऊन मीं डोकावलें. पण सुदैवानं रस्ता रिकामा दिसला. सुटकेचा श्वास टाकून मी मागं फिरलें. आणि मग आजीला सगळं सांगून म्हणालें, "यांत पांच रुपयांचा प्रश्न नाहीं. इभ्रतीचा आहे !... या कारणासाठीं दंड व्हायचा म्हणजे यापेक्षां नामुष्कीची आणखी कोणती गोष्ट !–– छे ! आजी तुला कधीं ग कळणार या गोष्टी ?"

"काय ?– कालची पोर नि मला शिकवते !– काय ग, वडील माणसांची कांहीं मर्यादा ?" आजी माझं ऐकून घ्यायच्याऐवजीं माझ्यावरच कडाडली. आतां काय सांगावं हिला ? कशा कळायच्या तिला ह्या गोष्टी ? पटवून तरी कसं द्यायचं ? मला कांहींच सुचेना. शेवटीं डोक्यांत एक कल्पना चमकून गेल्यामुळं आजीचा नाद सोडून मी रस्त्यावर आलें. त्या केराच्या ढिगाकडे नजर लावली. गाय–म्हैस येण्याचं चिन्ह दिसेना म्हणून मग घरांतून टोपली आणून तो केर तिथून उचलून जवळपासच्या केराच्या कोंडाळ्यांत टाकायचा मला मोह झाला... रस्ता एकदा साफ केल्यानंतर तो स्वच्छ राखणं हें आमचं काम आणि आम्हीं तें अवश्य पार पाडलं पाहिजे असा माझा दृढ विश्वास. त्यामुळंच आजीचा डोळा चुकवून मीं तो केर अखेर केराच्या कोंडाळ्याकडे उचलला. पण त्या जागेवर जाऊन बघतें तों साराच चमत्कार !– कोंडाळ्याच्या बाहेरच केराचा हा मोठा ढीग हातपाय पसरून बसलेला !– दोनचार पावलांनीं का जास्त शीण येणार माणसाला ? एवढं चांगलं कोंडाळं मुद्दाम केरासाठीं ठेवलं असतांना हा कसला बेजबाबदारपणा ? पण त्याची जाणीव व्हायची कुणाला आणि कधीं ?...

माझ्या डोक्यांत विचारचक्र सुरू झालं नाहीं तोंच एक बाई लगबगीनं तिथं येऊन कोंडाळ्याबाहेरच केर फेकून परत निघाली. मीं तिला हटकलं, " हें हो काय बाई ? "

" कां ? " त्या बाईनं मोठ्या कुऱ्यानं माझ्याकडे पाहिलं. " या इथं आंत नाहीं का केर टाकतां येत ? "

" हें बघा बाई !— आमचं आम्ही काय वाटेल तें करूं ! हिला कशाला नसत्या उठाठेवी ? " ती बाई पुटपुटत निघून गेली. मला आश्चर्य वाटलं. स्वतःला कळत नसलं तरी सांगितल्यावरहि माणसाला जाणीव होऊं नये ?– आणि असं जर सगळीकडेच होत असेल तर आजीला तरी काय बोलायचं ? कां तिला एकटीला तरी दोष द्यायचा ?– माझं डोकं सुन्न झालं. मला विचारच करतां येईना !– " आमचं आम्ही काय वाटेल तें करूं " म्हणजे ?– 'आमचं आम्ही ' म्हणजे काय ? कोण आम्ही आणि आमचं काय ?– माझा मलाच या गोष्टीचा उलगडा नीट होईना. त्यामुळं माझ्या हातांतला केर नीट टाकून मी सुस्कारा टाकीत घराकडे वळलें आणि दरवाजां-तून आंत येऊन ठेपलें नाहीं तोंच मला डावलून रस्त्यावर जाऊन डोका-वीत आजी म्हणाली, " पाहिलंस !–जनावरांनीं तीं टरफलं होतीं का नव्हतीं सुद्धां करून टाकलीं एवढ्यांत ! "

मी कांहींच बोललें नाहीं. मुकाट्यानं घरांत शिरलें. काय झालं तें माझं मला माहीत होतं. आजीला सांगून काय उपयोग ?– नाहीं तर परवां सिनेमाला गेलें असतां येतांना रुमाल भरून शेंगांचीं फोलकटं बांधून आणलीं म्हणून आठ दिवस कोण भेटेल त्याच्यापाशीं मला नांवं ठेवणाऱ्या आजीला हें कळलं असतं तर घर डोक्यावर घ्यायला कमी केलं नसतं तिनं !

तसं पाहिलं तर रुमालांतून शेंगांचीं टरफलं घरीं आणलीं ही किती साधी गोष्ट ! पण आजीनं मला नाहीं नाहीं तें बोलून घेतलं त्याबद्दल– तिचं म्हणणं, " ह्या नसत्या उठाठेवी हिला कशाला ? " पण याला उठाठेवी कसं म्हणा-यच ? जिथल्या तिथं केर टाकून जागा स्वच्छ ठेवणं ह्याला उठाठेव म्हणा-यचं म्हणजे जुलूमच आहे ! पण आजीला काय त्याचं ! तिला अमूक एक कर असं म्हणायची सोयच नाहीं.

परवां एकदा मी आणि आजी आमच्या सदाशिव पेठेंतल्या घरांतून तुळशी-बागेकडे जात होतों. मला रिबन्स खरेदी करायच्या होत्या आणि आजीला रामाचं दर्शन घ्यायचं होतं. जातां जातां रस्त्यानं दोन्ही बाजूंनीं म्हणजे समोरा-समोर अशा दोन मोटर लॉऱ्या जोरांत आल्या. साहजिकच रस्त्याच्या अगदीं कडेनं जाणं आम्हांला भाग पडलं. पण गंमत काय झाली कीं, एका घरांतून मोरींतून बाहेर पडणारं पाणी आजीच्या अंगावर पडलं! आजी संतापली. तिनं मान वर करून त्या घराच्या माडीकडे रागानं पाहिलं आणि तिथं एक पोरसवदा बाई उभी असलेली दिसतांच आजी संतापून तिला म्हणाली, "काय ग येऽऽ? दिसत नाहीं होय? रस्त्यानं माणसं जातात येतात तीं काय तुमच्या घरचं हें 'तीर्थ' घ्यावं म्हणून?"

"अं! हें बघा!... आजवर कुण्णी बोललं नाहीं नि या म्हातारीचं तोंड किती सुटलंय?" ती बाई फणकाऱ्यानं आंत निघून गेली. तिचं हें बोलणं आजीच्या कानांवर आल्यानं तिची तळपायाची आग मस्तकांत गेली! — माझ्या हाताला धरून आजीनं खम्‌दिशीं मला मागं ओढली आणि ती म्हणाली, "आतां माघारीं फिर! – आंघोळ करून मग रामाला जाऊं या."

आजीचा मोर्चा मागं वळतांच मलाहि परत फिरणं भाग होतं. आजीचा संताप उडाला होता म्हणून चालतां चालतां मीं तिला विचारलं, "रस्त्यावर असं पाणी पडल्यावर तेवढा तुला राग नि केर टाकतांना कांहींच नाहीं, होय ग?"

"चूप! लहान तोंडीं मोठा घास घेऊं नकोस!" आजीनं रागाचा कटाक्ष फेकला. पण तिकडे दुर्लक्ष करून मी पुन्हा म्हणालें, "अग, पण असं रागावण्या-पेक्षां माझं ऐकून तर घे. हें बघ, आमचे आम्ही, आमचे आम्ही असं जें तूं नेहमीं म्हणतेस अन् बघून घ्यायची भाषा काढतेस याचा अर्थ काय?"

"हं! आमचं आम्ही वाटेल तें करूं म्हणजे काय, करूंच...तुझ्यापेक्षां चांगले पन्नासएक पावसाळे जास्त पाहिलेत मीं!" आजीचा पारा आणखीनच चढला.

"असतील ना! नाहीं कोण म्हणतेंय्?"

"मग! उचलली जीभ कीं लावली टाळ्याला म्हणजे?"

आजीनं अंगावरच्या पातळाचा मघां भिजलेला भाग झटकल्यासारखा केला आणि ती भरभर निघाली.

आजी कितीहि रागावली तरी रस्त्यांत मारणार नाहीं, या खात्रीमुळं मी तिच्या बरोबरीनं चालत म्हणालें, " आणि असं जर प्रत्येकानं आमचं आम्ही बघून घेऊं म्हटलं तर मग सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता राखायची कुणीं ? "

" काय ? " आजीचा आवाज एकदम वर चढला. मीं तिला न भितां पुन्हा विचारलं, " असं झालं तर मग ही स्वच्छता राखणार कोण ? "

' म्युनिसिपालिटीचीं माणसं कशाला नेमलींत मग ?"

" कबूल. पण तीं कांहीं सारखीं नाहींत झाडू घेऊन उभीं. "

" वा ! राहावं त्यांनीं चोवीस तास झाडू घेऊन उभं ! पगार नाहीं मिळत ? "

" अग, हें सगळं खरं असलं तरी आपण नको का त्यांना मदत करायला ? ...रस्त्यावरचा केर, सगळी घाण फार तर सकाळ-संध्याकाळ ते लोक काढतील म्हणून आपण रस्त्यावर केर करायचा मुद्दाम ? "

" एवढा पुळका येत असेल त्या माणसांचा तर जा तूं रस्ते झाडायला ! " घरांत शिरतां शिरतां आजीनं माझ्याकडे तिरस्कारानं पाहिलं आणि दांत-ओठ खात ती निघून गेली. मला मात्र तिनं रागानं आणि चिडून सांगितलेला हा उपाय आवडला. " खरंच, काय बिघडलं असं झालंच तर ? " मी दर-वाजांतच घुटमळलें. माणसांना नीट वळण लावायचें असेल, आपल्या जबाब-दाऱ्या ओळखायला लावायच्या असतील, त्यांना नागरिक या नात्यानं आपलीं कर्तव्यं पटवून द्यायचीं असतील, तर काय हरकत आहे आपण हातांत झाडू घ्यायला ? ...

माझ्या डोक्यांत विचारांनीं धुमाकूळ घालायला सुरुवात केली. एकीकडे आपल्या कर्तव्यांच्या जाणिवेची उत्सुकता तर दुसरीकडे आजीसारख्या नेमकं तें डावलून पुढं जाणाऱ्या माणसांशीं गांठ ! एक प्रकारची रस्सीखेचच नाहीं का ही ! तरी पण मीं मनाचा हिय्या केला आणि गडबडीनं घरांत जाऊन आजीला सांगितलं, " आतां संभाजी पार्कमध्यें फिरायला गेल्यावर तिथं भेळ खाऊन कुणीं वाटेल तिथं कागद फेकून दिले तर ते आपण गोळा करणार ! "

तेवढ्यांत माझे बाबा तिथं येत आजीला उद्देशून म्हणाले, " अग आई, बाहेरच्या ओसरीवरचा केर नाहीं का काढायचा आज ? "

" मग ?...तुझी लेक निघालीय् रस्ते झाडायला, तिला विचार ? मला काय विचारतोस ? " आजी रागानं धुसमुसूं लागली. एवढाला एकेक डोळा करून तिनं माझ्याकडे आणि बाबांच्याकडे पाहिलं. बाबांना तिनं तसं कां म्हणावं तें कळेना. त्यांनींहि माझ्यावर डोळे वटारले ! ... आतां काय करावं ? माझीहि थोडी धांदल उडाली --- पण बाबांनाहि आपलं म्हणणं पटवून देण्यासाठीं मीं झाला प्रकार सांगून टाकला. माझी समजूत होती कीं, बाबांना माझं म्हणणं पटेल. पण ते पडले आजीचेच चिरंजीव ! त्यांनीं मला एकदम हुकूम सोडला, " ह्या नसत्या उठाठेवी कशाला ? ओसरीवरचा केर चटकन् काढून घे. अशीं एकटयादुकटयानं करून का हीं कामं होतात कधीं ?...आपल्यापुरतं आपण बघावं ! लोकांच्या उठाठेवींची जरूर काय ? ज्याला त्रास होईल तो बघून घेईल..."

" म्हणजे काय ?...आपल्या वागण्यानं इतरांना त्रास झाला तर आपण नको विचार करायला ? " माझ्याहि रागानं उसळी घेतली.

" अरेच्या ! पुन्हा तेंच...संभाजी पार्कमध्यें भेळीचे कागद पसरले म्हणून तुझ्या बापाचं काय गेलं त्यांत ?...उद्यां शेजारच्या पोरांनीं दंगा केला तर त्यांना सांभाळण्याचीहि भाषा काढायला लागशील ? "

" जरूर पडली तर तेंहि करायला पाहिजेच ! कां नाहीं...आपल्या ज्या ज्या वागण्यानं इतरांना त्रास होईल नि ज्यामुळं आपल्या नागरिक जीवनावर वाईट परिणाम होण्याची शक्यता दिसेल तिथं तिथं खटपट ही केलीच पाहिजे. " माझ्या परीनं मी बाबांस समजावून देत होतें. पण आजीला तें आवडलें नाहीं. न्हाणीघरांतून स्नान करून बाहेर आल्यानंतर कपाळावरचं पाणी पदरानं टिपून घेत ती म्हणाली, " हे असले थेर माझ्या घरांत नकोत !...आपल्या नवऱ्याच्या घरीं गेल्यावर हवं तें कर. " आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे बाबाहि तिला सामील झाले !...आतां काय करावं ह्या वडील मंडळींना ? त्यांना पटत नाहींत कशा या गोष्टी ?

आतां ह्या लोकांच्या तोंडाला लागण्यांत अर्थ नाहीं अशी मनाची समजूत घालून मीं तिथून पाय काढला. ओसरीवरचा केर काढून मी मैत्रिणीकडे

जायचं निमित्त काढून घराबाहेर पडलें. पण चार दोन घरं ओलांडून मी जातें न जातें तोंच एका घरांतून रस्त्यावर फेकलेल्या वरणाचा लगदा माझ्या पायाशीं येऊन पडला. वाटलं, ज्या घरांतून तो बाहेर आला त्या घरांत जाऊन चांगलं सुनवावं त्या माणसांना. पाहिजे तर सरळ जाबहि विचारावा कीं, माणुसकी म्हणून जी काय चीज आहे, त्याची ओळखपाळख तरी आपल्याला आहे किंवा नाहीं? पण मीं तो मोह टाळला. मला एका प्रसंगाची आठवण झाली. मागं एकदा मिरजेहून पुण्याला येतांना रेल्वेच्या डब्यांत नाना प्रकारची घाण झाली असतां एका स्काउटनं तो डबा साफ केला. डब्यांतील लोकांनीं त्याचे आभार मानण्याऐवजीं त्याची टिंगल केली, " मोठा आलाय् स्वच्छतेचा पुरस्कर्ता! "... तो बिचारा आपल्यापरीनं त्या लोकांना सांगून गप्प बसला... पण दुर्दैवानं तासाभरांतच त्या डब्यांत पूर्वीसारखाच केर जमायला लागल्यावर मुकाट्यानं त्याला पुन्हा केरसुणी घ्यायचा विचार करावा लागला... आपलीहि तीच अवस्था होणार. सरळपणीं ऐकलं तर ठीक, नाहींतर शिव्याची शिदोरी पाठीवर घेऊन पुढं जावं लागेल...घटकाभर मी चालतां चालतां थांबलें—थोडासा विचारहि केला.चारदोनदा त्या घराकडेहि टक लावून पाहिलं. आणि मग मनाशीं निर्णय घेतला कीं, जर " आमचे आम्ही बघून घेऊं कांहीं झालं तर, " असं म्हणणाऱ्या या लोकांना कांहीं समजावून देण्यांत अर्थ नाहीं ...रखमाईला पांच रुपयांचा दंड झाला तरी तिची ती संवय गेली नाहीं ! ... अशा वेळीं आपण जमेल तें स्वतः करणं यांतच समाधान मानलं पाहिजे... आपलं बघून आज ना उद्यां आपल्यालाहि अनुयायी भेटल्याविना राहायचे नाहींत! ...आमचे आम्ही घरांत तरी आधीं सुधारूं या. आणि मग त्याच क्षणाला मी मैत्रिणीच्या घराचा रस्ता सुधारला, तरीपण एकसारखा तोच तो प्रश्न मनांत घोळत असल्यामुळं मन अस्वस्थ झालं. पुढं जायची इच्छाच होईना. आणि म्हणून मग सरळ घरांत येऊनच आजीला काय वाटेल याची फिकीर न करतां बेधडक तिला सांगून टाकलं, " आजपासून आपल्या घरांत तुझी ही तऱ्हा एकदम बंद ! मी म्हणतें तस्संच झालं पाहिजे ! " आणि त्यावर होणारं तिचं रागीट बोलणं कानांवर यायच्या आधींच मीं माझ्या खोलींत पाऊल टाकलं.

● ● ●

# स्वामी विवेकानंदांचा काळ

“दहापांचजणांनीं मिळून संघटित कार्य करावें हा गुण आपल्या प्रकृतींतच नाहीं. या गुणांच्या अभावामुळेंच सध्याच्या हीनावस्थेला आपण पोचलों आहों. आज्ञा पाळावी कशी हें ज्याला कळतें तोच धनी होऊं शकतो. याकरितां आज्ञाधारकपणा पहिल्यानें शीक. पश्चिमेकडील राष्ट्रात स्वातंत्र्याच्या वाऱ्यानें प्रत्येकाला पछाडलेलें असतें. तथापि त्यांच्यांत आज्ञाधारकपणा ओतप्रोत भरलेला असतो. आमच्या इकडे प्रत्येकजण धनी; प्रत्येकजण अहंमन्यमान. तो हुकूम करील पण कोणाचा हुकूम पाळावयाचा नाहीं. यामुळेंच आपल्या इकडे कोणतेंहि काम शेवटास जात नाहीं. मोठें धाडस, अथांग धैर्य, प्रचंड कार्यकारी शक्ति आणि त्याहूनहि विशेषत: अधिक महत्त्वाचा गुण आज्ञाधारकपणा; या गुणांच्या बळावरच व्यक्तीचें अथवा राष्ट्राचें भाग्य उदयाला येतें. आपल्या देशांत या गुणांचा अभाव आहे.... ”

“ जगांतील सारे धर्म म्हणजे नुसती निर्जीव चेष्टा आहे. जगाला शुद्ध दानतीची जरूर आहे. ज्याच्यापाशीं स्वार्थ नुसता नांवालाहि उरला नसेल

आणि ज्याचें जीवन शुद्ध प्रेममय बनलें असेल असा मनुष्य आज जगाला हवा आहे. अशा माणसाचा एकेक शब्द म्हणजे वज्र आहे..."

"खेड्यांतील लोकांना 'ए' अन्नदान करीत आहे. पण त्यावरोबरच कांहीं ज्ञानदान होत असल्याचें ऐकिवात नाहीं. ज्यानें त्यानें स्वतः उद्योग करून आपल्या अडचणी आपण निवारण केल्या पाहिजेत. आपल्या खेडवळांना तुम्ही हें शिक्षण द्या. साऱ्या जगांतील संपत्ति एकत्र केली तरी सुद्धां एका खेड्यांतील आळशी लोकांना ती पुरायची नाहीं. याकरितां आपल्या खेडवळांना स्वावलंबी होण्यास शिकविलें पाहिजे—आपलें मुख्य कार्य शिक्षण हें असावें..."

"आजची स्थिति अशी आहे कीं, ब्राह्मणापेक्षां चांडाळाला शिक्षणाची जरुरी अधिक आहे. ब्राह्मणाच्या मुलाला जेथें एक शिक्षक पुरतो तेथें चांडाळाला दहा लागतात. कारण चांडाळ प्रकृतीचा लाडका नाहीं. ब्राह्मणापेक्षां त्याला तिनें तैलबुद्धीचें दान सढळ हातानें केलेलें नाहीं. अशा स्थितींत अनेक विद्यांच्या शिक्षणाची सोय केवळ ब्राह्मणांपुरती करणें म्हणजे समुद्रांत मीठ टाकणें होय. याकरितां दरिद्री, तुडविले गेलेले, अज्ञ असे लोक हेच आपल्या सेवेला अधिक योग्य आहेत. यांनाच ईश्वर समजून त्यांचें पूजन तुम्ही करा?..."

"ज्यांना तुम्हाला जिंकावयाचें असेल त्यांच्या हितासाठीं आपल्या स्वार्थाची आहुति तुम्हीं दिली पाहिजे. तुमची एवढी तयारी नसेल तर तुमचें म्हणणें त्यांनीं कां ऐकावें?..."

"विचार, उच्चार आणि आचार या त्रयींत तुला एकवाक्यता आणतां आली तर पैशाचा पाऊस पडेल. प्रचंड नदीसारखा अखंड प्रवाह तुझ्या पायीं वाहूं लागेल..."

आमच्या शेजारच्या घरांत दोनतीन आवाजांतून अशा प्रकारचें बोलणें जेव्हां वाढत्या श्रेणीनें निघूं लागलें तेव्हां मी हातांतील काम मागें सारून खिडकीशीं येऊन उभी राहिलें. कोण बोलतें आहे याचा कानोसा घेऊं लागलें. बघतेंय तर शेजारचीं दोनचार जाणतीं कॉलेजांत शिकणारीं मुलें हातांत कागद धरून जोरजोरानें वाचीत होतीं! एकमेकांत कांहीं बजावीत होतीं!

म्हणून मीं खिडकीचें दार नीट उघडलें. मान बाहेर काढली आणि आतां त्या मुलांना कांहीं विचारणार तों एकाचा आवाज पुन्हा खड्या सुरांत आला—

" दुसऱ्याच्या हितासाठीं आपला जीव जाईल तर वरें असा विचार तुमच्या मनांत येईल तो सुदिन. जग म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हे. तें नाचण्याबागडण्याचें अंगण नव्हे. दुसऱ्यांना सुखानें जातां यावें म्हणून स्वतःचें रक्त शिंपून जो कोणी मार्ग तयार करितो, तोच खरा मोठा. आज अनंत काल हाच प्रकार चालत आला आहे. एकजण आपल्या देहाचा पूल बांधतो आणि मग दुसरे हजारों त्याजवरून चालत जाऊन नदीपार होतात..."

आतां मात्र मला धीर निघेना. एवढें चांगलें हीं मुलें आजच कशीं बोलताहेत? मला नवल वाटलें म्हणून मीं टाळी वाजवून त्या मुलांचें लक्ष माझ्याकडे वेधीत विचारलें, " कसलं नाटक पाठ करतांय रे? " तेव्हां एकानें उत्तर दिलें. " नाटक नाहीं, अभ्यास आहे हा. "

" अभ्यास? " मला आणखीनच नवल वाटलें.

" हो हो अभ्यास आहे हा. "

" कोणत्या परीक्षेचा? "

" अप्पाकाका म्हणतात आयुष्याचा म्हणून. "

" असं? कोण रे हे अप्पाकाका? "

" आमचे! काल रागावले. म्हणाले कीं, आजकालचीं मुलें बुद्रुक आहेत. सटरफटर वाचतात. त्यांच्यांत कसलीच जिद्द दिसत नाहीं. खूप बोलले. "

" कारण? "

" आम्ही सारखा रेडिओ लावतों न् सिनेमांतील गाणीं ऐकून पाठ करतों म्हणून! "

" अच्छा! बरं मग? "

" मग काय? ते म्हणाले कीं, कांहीं चांगलं वाचा. आमचं वघा. उत्तमांतलं उत्तम वाचून आमचं मन धष्टपुष्ट झालंथ. आम्ही स्वामी विवेकानंदांच्या काळांतले आहोंत. "

" हं हं! "

" हं हं काय करतां! त्यांनीं दिलेल्या टिपणाच्या वह्या वाचतों आहोंत

आम्ही. आमच्यांत बदल झाला नाहीं तर अप्पाकाका झोडपून काढतील. फार नका बोलूं, पुरे..."

एवढ्या प्रश्नोत्तरावर त्या पोरांनीं मला गप्प बसवलें आणि लगेच आपल्या वाचनाला आरंभ केला. एकजण आपला पोटावरचा शर्ट खालीं ओढीत आणि डोळे मोठाले करीत मोठमोठ्यानें वाचूं लागला—

"बुद्धीला स्वप्नांतहि न आढळून येणाऱ्या गोष्टी अंतःकरणाला दिसतात. यासाठीं जी गोष्ट करावीसें अंतःकरणपूर्वक वाटत असेल ती बिनदिक्कत करीत जा."

आणि मग दुसऱ्यानें पुढचें वाचलें—

"मोठमोठ्या गोष्टी करण्याबद्दल नुसते बेत करीत बसण्यापेक्षां एखाद्या क्षुल्लक गोष्टीसहि एकदम आरंभ करणें श्रेयस्कर आहे. लहानसहान गोष्टींतहि अनेक अनुभव येऊन आत्मविश्वास वाढतो. यासाठीं मोठे बेत करीत न बसतां लहानसहान गोष्टी करण्यास एकदम आरंभ करावा. सदोदित उद्योगरत राहिलें म्हणजे पुढील मार्ग आपोआप दिसूं लागतो."

त्यामुळें मीं त्या मुलांना पुन्हा विचारलें, "हे उतारे कशांतले आहेत?" तशी एकजण मला मधें मधें न बोलण्याबद्दल बजावीत उत्तरला, "स्वामी विवेकानंदांचे हे विचार आहेत. अप्पाकाका म्हणतात असलें वाचावें म्हणजे माणसाच्या जीवनांत अरुणोदय होतो."

आतां माझ्या लक्षांत आलें. अप्पाकाकांचें बोलणें मी आतां समजूं शकलें आणि मग मी त्या मुलांना म्हणालें, "अप्पाकाका बरोबर बोलले हं! स्वामी विवेकानंद मला ठाऊक आहेत." तेव्हां मग सर्वांनीं एकदम माझ्यावर आपल्या नजरा रोखीत म्हटलें, "खरंच?"

"होय, मीं वाचलेत त्यांचे विचार."

"पण...पाठ केलेत का?"

"नाहीं. लक्षांत धरलेत मात्र."

"सांगा बघूं या."

"सांगतें थांबा."

त्या मुलांची जिज्ञासा माझ्या ज्ञानाबद्दल वाढली म्हणून मी आपच्या घरांतून शेजारच्या घरांत हीं मुलें होतीं तिथें गेलें. आणि मग त्यांना म्हणालें,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११५३४

'अरे, आपल्या विचारांना चांगलें वळण लागावं म्हणून तुमचे अप्पाकाका तसं म्हणाले. नुसत्या घोकंपट्टीचा कीं खड्या स्वरांतील वाचनाचा हा भाग नाहीं. स्वामी विवेकानंदांच्या भाषेंतच बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, तोंडानें तुम्ही जें बोलतां त्या भाषेंत आणि तुमच्या कृतींत कधींहि विसंगतपणा येऊं देऊं नका."

"पण हीं मोठ्या माणसांचीं कामें, आम्ही लहान आहोंत."

"छे, छे ! इथं लहानमोठ्या वयाचा प्रश्न नाहीं. माणूस जाणता व्हायला लागला कीं, त्याच्या बुद्धीला न विचारतां वळण लागावं म्हणून हा प्रयत्न आहे. वेळींच चांगलं पेरलं तर उगवतंहि चांगलंच."

"पण हें जड आहे."

"तसं अवघड नाहीं. संवय नाहीं असलं वाचायची म्हणून कठीण वाटतं इतकंच. पण मनन करण्याजोगं खास आहे. स्वामीजींनीं जन्मभर शिक्षकाचं काम केलं. लोकांना तें उत्तमांतलं उत्तम शिकवीत राहिले."

माझ्या बोलण्याबद्दल त्या मुलांना थोडी खात्री झाली असावी, कारण एकजण दुसऱ्याशीं कुजबुजत या वेळीं एक वही खालींवर न्याहाळीत व पान उलगडीत म्हणाला, "एवढं बरोबर बोललांत." आणि मग दुसऱ्यानं मला माझें बोलणें खरें करणारें स्वामीजींचे विचार ऐकवले. तो वाचूं लागला—

"अध्यापन हा माझ्या जीवनाचाच भाग होऊन राहिला आहे. खाणें-पिणें आणि श्वास घेणें हें जितकें आवश्यक तितकेंच शिकविणेंहि मला आवश्यक होऊन राहिलें आहे."

"अगदीं बरोबर." त्या मुलाच्या वाचनाला मीं हुंकार भरला आणि गुरुशिष्याबद्दल स्वामीजींचे विचार लक्षांत घेण्यासारखे आहेत असें सांगून टाकलें. तशी एका मुलानें अप्पाकाकांच्या टांचणाच्या वह्या माझ्या पुढ्यांत टाकल्या आणि सांगाल तें शोधून वाचण्याची मला विनंती केली. मलाहि बरें वाटलें. स्वामीजींचे विचार त्यांच्या वेळच्या लोकांना भारून टाकणारे होते. त्यांचे ग्रंथ वाचणारांना नवी दिशा दाखविणारे होते. म्हणून मीं वाचलेल्याच गोष्टी त्या टांचणांतून धुंडाळीत थोडा वेळ गप्प बसलें. मुलेंहि उत्सुकतेनें भुवया उंचावून समोर थांबलीं आणि मग घटकाभरानें मला हवें तें गवसलें. मीं त्यांना वाचून दाखवूं का म्हणून प्रश्न केला. सर्वांनीं 'होय' म्हटलें. म्हणून घसा

साफ करीत क्षणभर खोकलले आणि आवाज लख्ख करून गुरुशिष्याबद्दलचे स्वामीजींचे विचार त्यांना ऐकवले.

" शास्त्रग्रंथांतील रहस्य जाणण्याचें सामर्थ्य आपल्या भावी गुरूस आहे कीं नाहीं हें आपण प्रथम पाहिलें पाहिजे. बायबल, वेद आणि कुराण या ग्रंथांचें वाचन सारें जग करीत असतें. पण त्या वाचनांत नुसत्या शब्दच्छला-शिवाय अधिक कांहीं सांपडावयाचें नाहीं.

" गुरूची वर्तवणूक अगदीं निष्कलंक असणें अवश्य आहे...जीवात्मा पवित्र झाल्यावांचून परमात्मप्रकाशाचा एक किरणहि त्याजवर पडत नाहीं. याकरितां गुरु होऊं पाहणाराची दानत चोख आहे कीं नाहीं हें आपण प्रथम पाहिलें पाहिजे. तो काय सांगतो याचा विचार मागाहून केल्यास चालेल ...

" गुरूच्या हेतूकडेहि लक्ष पुरवणें अवश्य आहे. शिष्याला ज्ञानदान कर-ण्यांत पैसा, कीर्ति अथवा दुसरा कोणताहि स्वार्थमूलक हेतु गुरूच्या मनांत असतां उपयोगी नाहीं. त्याचा हा उद्योग केवळ प्रेमप्रेरित असला पाहिजे... "

" सुंदर! नाहीं तरी आजचे गुरु घ्या? "...माझें वाचन मध्येंच बंद करून एकजण जोरानें असा बोलला तेव्हां मी त्याला म्हणालें, " ऐकावं पुरतं हं माणसानं! शिष्याबद्दल अजून वाचायचं आहे. " आणि मग उरला भाग वाचला—

" पावित्र्य, ज्ञानाची खरी तृष्णा आणि उद्यमशीलता हे गुण शिष्याच्या अंगीं अवश्य पाहिजेत. अपवित्र जीवात्मा कधींहि धर्मपरायण होऊं शकत नाहीं. ज्या कोणास धर्मपरायण व्हावें असें अंतःकरणपूर्वक वाटत असेल, त्यानें कायिक, वाचिक आणि मानसिक अशा त्रिविध पावित्र्याची जोड मिळविली पाहिजे. आपणास ज्यांबद्दल अत्यंत गरज उत्पन्न होते त्या वस्तूचा लाभ आपणांस होतो, हा अनादिसिद्ध कायदा आहे. ज्ञान मिळवि-ण्याच्या बाबतींतहि हाच कायदा लागू आहे. ज्ञानार्जनाची तृष्णा अत्यंत तीव्र झाल्यावांचून त्याचा लाभ आपणांस होणार नाहीं..."

" ज्ञानाची परिसीमा जें ब्रह्मज्ञान तें विकत घेतां येत नाहीं, किंवा तें ग्रंथां-तूनहि मिळवितां येत नाहीं. तुम्हीं जगाचा कानाकोपरा धुंडाळून पाहिला; तुम्हीं हिमालय, आल्प्स् किंवा कॉकेशस इत्यादि सारे पर्वत पालथे घातले, तुम्हीं साऱ्या

समुद्राचे तळ शोधले आणि गोबीच्या वाळवंटांत अथवा तिबेटांत सारा जन्म फिरून राहिलां तरी तुमच्या अंतःकरणाची तयारी होईपर्यंत आणि तुमचा गुरु तुम्हांस भेटेपर्यंत ब्रह्मज्ञानाची प्राप्ति तुम्हांला होणार नाहीं. ईश्वरानें नेमून दिलेला तुमचा गुरु तुम्हांस मिळाला आणि लहान मुलाप्रमाणें त्याची दृढ विश्वासानें तुम्हीं सेवा केली, म्हणजे तुमचे अंतःकरण उघडेल आणि त्याचे ठिकाणीं परमेश्वर अवतरला आहे, असें तुम्हांस आढळून येईल. अशा प्रकारच्या प्रेमानें आणि पूज्यबुद्धीनें प्रेरित होऊन जे कोणी सत्य शोधावयास निघतील त्यांना सत्य, सौंदर्य आणि चांगुलपणा यांचें उज्ज्वल भांडार परमेश्वर स्वहस्तें खुलें करील ! ..."

"पण काय हो, स्वतः स्वामी विवेकानंदांनीं आपल्या गुरूबद्दल काय म्हटलें आहे ? "

गुरुशिष्यासंबंधींचे स्वामीजींचे विचार ऐकून त्या काळांतील त्यांचे गुरु श्रीरामकृष्ण परमहंस यांचेबद्दल मुलांची उत्सुकता वाढली. तेव्हां माझ्या लक्षांत होती ती यासंबंधींची स्वामीजींची स्वतःबद्दलचीच कल्पना मीं तोंडपाठ म्हणून दाखविली—

' आतां कोणत्याहि महापुरुषाकडे न जाण्याचा माझा निश्चय आहे. ' हे मना, कोणाच्याहि दारापाशीं न जातां आपल्याच ठिकाणीं बसून राहा, तुला जें कांहीं हवें आहे तें बसल्या जागींच मिळेल. तुझ्या अंतःकरणाच्या गूढ भागांत सारा खजिना सांठविला आहे. तेथेंच परिस आहे. तेथेंच कल्पवृक्ष आहे. वांछित फळ तो तुला देईल. तुझ्या हृदयाच्या दाराजवळ असंख्य रत्नें विखुरलेलीं आहेत '... "

आणि मग त्या घटकेला स्वामीजींनीं अमेरिकेंत जाऊन केलेलें महान् कार्य माझ्या नजरेंत तरळूं लागलें. एखादा अद्भुतरम्य चित्रपट नजरेसमोरून सरकावा तसा प्रकार झाला आणि मी समोर कांहीं बघूनच त्याचें वर्णन करावें त्या थाटांत त्या मुलांच्या समोर बोलत राहिलें...

" सोमवार दि. ११ सप्टेंबर १८९३ मधील गोष्ट आहे. सर्वधर्मपरिषदेसाठीं अखिल मानवजात पृथ्वीच्या प्रत्येक भागाचा प्रतिनिधि म्हणून शिकागोला जमा झाली होती. मिचिगन सरोवराच्या कांठावर पाश्चात्त्य

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

संस्कृतीचं स्वरूप एकवटून जमा झालं होतं. आणि त्या संस्कृतीच्या घोळक्यांत हिंदुधर्म मोठ्या दिमाखानं प्रकाशित होत होता...

" त्या वेळीं ' अमेरिकेंतील भगिनींनो आणि बंधूंनो ! ' असा आजवर शिकागोच्या आर्ट पॅलेसच्या भव्य गॅलरींत कधींहि ऐकायला न मिळालेल्या भावनेचा प्रेमळ उच्चार झाला. भारताच्या वाणीनं एकदम भव्यता निर्माण केली. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. देवदूताची आकाशवाणी व्हावी तसा प्रकार झाला. अंगांत लालभडक कफनी घातलेल्या आणि डोक्यावर केशरी रंगाचा सुंदर साफा बांधलेल्या पाणीदार डोळ्यांच्या स्वामी विवेकानंदांचें मोठ्या प्रेमानें स्वागत झालें...' सर्व धर्म व्यापक दृष्टीनें एकच आहेत व सर्वांचें अंतिम साध्यहि एकच आहे ' या जोरदार विचारसरणीनं त्या भव्य दिवाणखान्यांत जादूची अद्‌भुतरम्य नवलाई प्रकट झाली...

"...' ज्याप्रमाणें मोतीं सूत्रामध्यें ओवलेलीं असतात त्याप्रमाणें ते सर्व माझ्या ठिकाणीं ओवलेले आहेत, व जेथें जेथें विशेष पावित्र्य दिसेल अगर मनुष्यजातीला उन्नत करण्याचं आमर्थ्य आढळून येईल तेथें तेथें माझा वास आहे असें समज ' असें सांगणाऱ्या भगवान् श्रीकृष्णाचा उज्ज्वल संदेश आपल्यासमोर मी घेऊन आलों आहें असं प्रारंभींच श्रोत्यांना स्वामीजींनीं बजावून टाकलं...या आत्मविश्वासानं पाश्चात्त्यांचीं मस्तकं नम्र झालीं... स्वामीजींनीं एकदम जगाला जिंकून टाकलें..."

" म्हणजे परदेशचे लोकहि स्वामीजींच्या विचारांनीं शहाणे झाले का ? "

माझं बोलणं थांबलं तसं त्या मुलांनीं मोठ्या आश्चर्यानं मला प्रश्न केला. त्यांची उत्सुकता वाढली. अप्पाकाका म्हणतात म्हणूनच स्वामी विवेकानंदांच्या रूपानें प्रकट झालेले त्यांच्या काळचे विचार वाचण्यापेक्षां ते जीवनाच्या अभ्यासासाठीं वाचणें आवश्यक असल्याचा भाव त्यांच्या चेहऱ्यावर प्रकट झाला. आणि मग बराच वेळ आम्ही असें बोलत राहिलों. नवे नवे शोधीत राहिलों. स्वामी विवेकानंदांच्या काळाचा मागोवा घेऊं लागलों. आणि मग अखेर शेवटीं या विषयावर पुन्हा भेटायचें ठरवीत आम्ही आमच्या या चर्चेचा शेवट करतांना अप्पाकाकांच्या वहीवरील पहिल्या पानावरचे स्वामीजींचे पुढील विचार ऐकून आपआपल्या घरीं गेलों...

" मनुष्य पापांतून पुण्याकडे प्रवेश करीत नाहीं, दुःखांतून सुखाकडे जात नाहीं, अथवा असत्यांतून सत्यांत प्रवेश करीत नाहीं; तर कमी पुण्यांतून अधिक पुण्यांत, कमी सुखांतून अधिक सुखांत व अंधुक सत्यांतून पूर्ण प्रकाशमान सत्यांत प्रवेश करतो. चैतन्याचा अनुभव घेऊन तो स्वतः पूर्ण चैतन्यस्वरूप होतो. ज्या दिवशीं मनुष्यप्राणी स्वतः सच्चिदानंदरूप होईल, त्या दिवशींच त्याच्या धर्मजीवनाचा शेवट झाला, असें म्हणता येईल. सकल विश्वांत मृत्यूचें साम्राज्य असतां अविनाशीं स्वरूप सांपडणें, विश्वाच्या स्वरूपांत दरक्षणीं बदल होत असतां, त्याच्या स्थिर अधिष्ठानावर आपण आरूढ होणें व अनेकतेनें भासमान होणाऱ्या विश्वचैतन्याची एकतानता अनुभवणें ही जीविताची इतिकर्तव्यता आहे. "

# आमची जडण-घडण

रोजनिशींत मनांत येणाऱ्या गोष्टींची नोंद करतांना आजच्यासारखं मला कधीं अडखळल्याचं आठवत नाहीं आणि गमतीची गोष्ट अशी कीं, आज गुरुजी भेटले, शाळेंतल्या गप्पागोष्टी झाल्या, जुनं नवं चर्चिलं गेलं. तेव्हां नेहमींपेक्षांहि सहजसुलभ रीतीनें रोजनिशी लिहिली जाईल या भावनेनेंच मीं लेखणी हातांत घेतली होती. पण लिहायला सुरुवात करावी म्हणून लेखणीनं कागदाला स्पर्श केल्यापासूनच हा सोपा वाटलेला मजकूर अवघड वाटणाऱ्या सदरांत दाखल होऊन गेला आहे ! ...

आणि त्याला कारणहि तसंच घडलं आहे यांत शंका नाहीं. आमचे गुरुजी फार दिवसांनीं भेटले, तेव्हां म्हटलं आजकालच्या शिक्षणासंबंधीं आपलीं आणि त्यांचीं मतं कितपत जुळतात हें पाहावं. म्हणूनच 'आमच्या वेळीं असं नव्हतं बुवा!' असा शेरा त्यांनीं मारतांक्षणींच मीं माझी बाजू पुढं मांडण्याचा प्रयत्न केला होता. पण ज्या क्षणीं "आजचे विद्यार्थी पूर्वींसारखे अभ्यासू नाहींत, खोलवर विचार करायची त्यांच्यांत ताकद नाहीं" असं कांहीं ते म्हणाले, त्या क्षणीं मात्र विजेचा धक्का देऊन शरीरांतल्या रक्तवाहिन्या कंपित झाल्या म्हणजे एकदा निकामी वाटणारा भाग सुधारण्याची डॉक्टरांना आशा

वाटावी, तशा प्रकारच्या कांहींशा संवेदना मनाला झाल्या. त्यामुळें मीहि मग त्यांना बोलून गेलें, " गुरुजी, असं नका बोलूं. आम्हा विद्यार्थ्यांचीं कोवळीं, अजाण मनं तुमच्या ताब्यांत देतात आमचे आईबाप, तेव्हां आमची जडण-घडण तुमच्या हातांत असते. आमचें मन तुम्हीं घडवायचं असतं...असं असतांना केवळ भल्याबुऱ्याचा दोष आमच्या माथीं मारून कसं चालेल ? "

पण त्यांना तें आवडलं नाहीं. लहानपणीं जोरजोरानें शिकवून तो तो विशिष्ट विषय आमच्या डोक्यांत शिरावा म्हणून ते मोठ्यानं बोलायचे, समजावून सांगतांना हातवारे करायचे, तसे ते म्हणाले, " मुळींच नाहीं ! आम्ही बरोबर शिकवीत आलों आणि शिकवीतहि राहणार ! येणं न येणं हा तुमच्या अकलेचा प्रश्न आहे ...हो ! ..."

" नाहीं गुरुजी. काळ बदलला आहे ! "

" बदलूं दे ! बेशक बदलूं दे ! म्हणून आम्ही चुकतोंय का ? "

" अगदींच ! ..." माझ्या अगदीं ओठावर असं उत्तर आलं पण त्यांना उलट दिल्यासारखं होईल म्हणून मी म्हणालें, " –गुरुजी, विद्यार्थ्यांनीं स्वतंत्र भारताचे नागरिक, उद्यांच्या राष्ट्राचे पाईक म्हणून आपली मानसिक उंची वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे असं जें आपण मघाशीं म्हणालांत तें तुम्ही शिकवल्याशिवाय कसं व्हावं ? उगीचच ? आपोआप ? "

" –मग ? साऱ्या गोष्टी शिकवायच्या असतात ? पंडित जवाहरलाल नेहरूं-पासून सारेजण नवसमाज निर्माण झाला पाहिजे म्हणून घोषणा करतात त्या बातम्या वर्तमानपत्रांतून वाचतां येत नाहींत ?...सिनेमे कसे रे लेको वाचतां न सांगतां शिकवतां ? ..." गुरुजींनीं किंचित् चिडून आपला चष्मा पुसला आणि नाकावर ठेवीत माझ्याकडे रोखून पाहिलं, पण त्यांच्या डोळ्यांत मी मावणार नाहीं याची खात्री वाटल्यानं त्यांना न भितां मींहि उत्तर दिलं, " कोण म्हणतो वर्तमानपत्रं आम्ही वाचीत नाहीं म्हणून ? ... आणि सिनेमाचं सोपं असतं. नुसती करमणुकीची बाब. हें सारं डोक्यांत शिरायचं, मग घोळायचं आणि नंतर आमचीं मतं तयार व्हायचीं म्हणजे लहानपणापासून तसं शिक्षण पाहिजे ! ...नुसती पृथ्वी वाटोळी असते म्हणून प्रयोग केल्याशिवाय आम्हांला पटत नाहीं तसेंच हेंहि ! " " वा वा ! ...अगदीं मानसशास्त्र शिकवूं लागलीस कीं ! ...पण लक्षांत ठेव. चार उन्हाळे मीं

जास्त काढलेत! शिकवायचं कसं हें पोरांनीं सांगायचं नाहीं! आम्हांला चांगलं समजतं! ...राष्ट्रीयीकरण, हिंदुकोड बिल, भूदान चळवळ या गोष्टी आज निघाल्या म्हणून आम्हांला कळत नाहींत असं नाहीं! ...पण तें सारं वर्गांत कशाला? तुमचं तुम्ही कळून घ्यायचं मोठेपणीं."

"छे! लहानपणींच इतर विषय शिकवतांना वर्गांत तुम्ही गुरुजींनीं सहज सुलभ रीतीनं आमच्या कानांवर या गोष्टी घातल्या पाहिजेत!"

"मग त्यासाठीं निराळ्या वेळापत्रकाची आंखणी करावी लागेल!"

"नाहीं! ...काय जरूर आहे? विषय शिकवतांना उदाहरणंच अशीं असायचीं कीं बस्स! आतां साधी गोष्ट सांगतें कीं, आतां जमीनदारी नष्ट झाली. राजेराजवाडे गेले. सारख्या दर्जानं सर्वांना जगतां यावं म्हणून ह्या गोष्टी समजावून देतांना लहान मुलांच्या देखील काळजाला हात घालूं शकतां. अमक्या पोरींच्या अंगावर खूप दागिने म्हणून मलाहि हवेत हा एखाद्या पोरीला उगाचच वाटणाऱ्या हव्यासाला तरी तुम्ही बांध घालूं शकाल? किंवा मुलांना जास्त शिकवायचं नी मुलींना शिकवतांना घरच्या बेरीज-वजाबाकीचा विचार करायचा ही गोष्ट आतां सोडून दिली पाहिजे, हें तुम्हांला हिंदुकोड-बिल सोपं करून सांगायला उपयोगी नाहीं का पडायचं?"

"पडेल तर! नाहीं कसं? पण हें करीत बसलों तर इतर अभ्यास संपायचा केव्हां?"

"नाहीं संपला तरी चालेल मी म्हणतें गुरुजी! पण आधीं हें सामान्यज्ञान आमच्या हाडींमांसीं उतरायला हवंच आजकाल! घरांत आलं कीं, आजी आजोबा नव्या नव्या बातम्यांची चौकशी करितात आमच्याजवळ आणि मग आमच्या मास्तरांनीं आम्हांला हें नाहीं शिकवलं म्हणून हिरमुसलं व्हावं लागतं! म्हणून म्हणतें रोज आमच्या गुरुजींनीं चौकसपणानं नवा भूगोल अवलोकन करून आमच्या पदरांत टाकावा! इतिहासजमा झालेल्या गोष्टी भूगोल म्हणून कशाला शोधीत बसायच्या मागाहून?"

"म्हणजे मास्तरांनींहि रोज अभ्यास करावा म्हण कीं!"

"अर्थात्! शिक्षकानं डोळे उघडून समाजांत वावरलं पाहिजे आणि डोळसपणानं समाजाकडे बघायची दृष्टि आम्हाला मिळवून दिली पाहिजे! ...

आमच्या घटनेनं समानतेचा हक्क आम्हांला मिळवून दिला हें त्याखेरीज नुसत्या मतदानानं आम्हांला कळायचं नाहीं. आम्हीं भरपूर श्रम केल्याशिवाय जगायचा आम्हांला हक्क नाहीं हें तुम्हीं आम्हांला शिकवलं पाहिजे आपल्या वागण्यानें! आम्हांला आईबापांपेक्षां 'मास्तर म्हणतात तें बरोबर' असं मानायची चांगली संवय जडली आहे. त्या संवयीची जोपासना नव्या जमान्यांत व्हावयाची तर असं जरूरीचं नाहीं वाटत तुम्हांला?"

गुरुजींच्यापुढं मीं माझे विचार मनांत येतील तसें मांडले. ते ऐकतांना कधीं ते गंभीर झाले, कधीं ते गहिंवरले तर कधीं आश्चर्यचकितहि झाले. पण मी जशी बोलायची बंद झालें आणि आपल्या बोलण्याचा त्यांच्यावर काय परिणाम झाला आहे हें अजमाविण्यांत गुंतलें तशी त्यांची दृष्टि माझ्यावर एकवटली. त्यांना नेमकं काय म्हणायचं होतं कुणाला माहीत पण त्यांच्या त्या वेळच्या नजरेंतून मला जें दिसलं तें अस होतं कीं, माझ्या ठायीं एवढा तरी विचार करायची ताकद आली ती केवळ त्यांच्याच शिकवण्यामुळं असं त्यांना म्हणायचं असावं! पण मला फार वेळ बुचकळ्यांत न पाडतां गुरुजी एकदम हसले आणि नेहमींच्या संवयीप्रमाणें खिशांतली खडूची कांडी काढून दोन्ही हातांच्यामध्यें बोळवीत म्हणाले, " अमले चोखंदळ विद्यार्थी भेटले म्हणजे गुरुजी आपोआप नव्या जगाचा अभ्यास करीत राहतो. तुमच्या प्रत्येक शंकेला तुमची खात्री पटविणारीं उत्तरं त्यांच्या तोंडावर घोळतात तें उगीच नाहीं! शिकवायचं काय नि कसं हें तुमच्यापेक्षां आम्हांला चांगलं समजतं! आमच्या अनुरेणूंतून ती गोष्ट भिनली आहे!" आणि त्यांना कुठं तरी निकडीनं जायचं होतं म्हणून निघूनहि गेले.

फार दिवसांनीं गुरुजी अचानक भेटले आणि आमची ही चर्चा त्यांच्या जाण्यानं अर्धवटच राहिली. या दोन्हीहि गोष्टी थोड्या मनाला खटकल्या म्हणून मी किंचित् अस्वस्थ झालें. वाटलं, एकतर गुरुजींनीं आधीं न कळवतां एवढ्या घाईगर्दीनं यायला नको होतं आणि हा विषय असा अर्धवट सोडून जायला नको होतं. दोन्हीहि गोष्टी माझ्या कक्षेंतील नसल्यामुळें ही रुखरुख मनांत रेंगाळली तेव्हां मनांत आलं, " गुरुजीप्रमाणं आईबापहि आमच्या मनाची

जडण-घडण करीत असतातच. मग त्यांनींहि नव्या जगाचा अभ्यास करायला हवा कीं काय?"

मला वाटतं याहि प्रश्नाचं उत्तर 'होय' म्हणूनच द्यावं लागेल. निदान माझा तरी तसा अनुभव आहे.

स्वतःचं स्वतःला नवीन वाचनाच्या द्वारें समजून उमजून घेण्याची पात्रता आली तरी देखील अजूनहि मी माझ्या वडिलांना, अण्णा, अमूक अमूक गोष्टीचा अर्थ काय म्हणून विचारीत असतें आणि त्या प्रश्नांची मनाला समाधान देणारीं उत्तरें देतां यावींत म्हणून कीं काय माझ्यापेक्षां दुप्पट वेगानं वडिलांचा अभ्यास चालू असतो!

काव्य हा माझ्या आवडीचा विषय. लहानपणापासून त्या विषयाच्या गाभ्यांत शिरायची माझी धडपड चाललेली आहे आणि माझी त्या बाबतींत संपूर्ण इच्छा तृप्ति व्हावी म्हणून केवळ मराठींतच नव्हे तर इतर भाषा-मधीलहि काव्यचर्चेची ओळख करून देण्याची वडिलांची शिकस्त चालू आहे. कै. रवींद्रनाथांचं काव्य भाषांतरित न देतां मूळ बंगालींतून समजावून दिलं तर त्याचा अर्थ मनांत अगदीं परिणामकारक रीतीनं कळूं शकेल ही वडिलांची भावना आहे.

अशा वेळीं वाटतं आईवडील हेहि एकपरी गुरुजीच आहेत आणि गुरुजी-देखील एकपरी आपले आईवडीलच आहेत! आणि आपण स्वतः आजन्म विद्यार्थी आहांत! गुरुजींनीं ज्ञान संपादण्याचा मार्ग दाखवावयाचा आणि आपण त्या रस्त्याची वाटचाल करीत करीत स्वतःची मानसिक उंची वाढवि-ण्याची पराकाष्ठा करीतच इतरांच्या गुरूच्या जागीं नकळत जाऊन बसाव-याचें! हरघडीं जें जें नवं सापडेल तें तें आधाशीपणानं टिपून घेऊन, पचवून नव्या जगासमोर ठेवायचं हेंच खऱ्या विद्यार्जनाचं लक्षण आणि तशी मनाची सुरुवातीपासून घडण करीत राहायचं हेंच खऱ्या गुरूचंहि कार्य!

पण हें सारं एवढं व्यापक आणि एवढं खोल स्वरूपाचं आहे कीं, माझ्या रोजनिशींत त्याची मर्यादित नोंद कशी करावी याचं मला कोडं पडलं आहे. समोर रोजची वही आहे, कोरा कागद आहे, हातांत लेखणी आहे आणि

विचारहि मनांत घोळतो आहे, पण त्याचा आविष्कार नेमका करून देणारे शब्द अजून माझ्या ओठांवर आलेले नाहींत ! मोठ्या मांणसांबद्दल नेहमींच वाटणारा संकोच तर त्यांना आड येत नसेल ? कीं मोठ्या लोकांच्या बरोबर स्वत:चाहि उल्लेख त्यांत होणार म्हणून विनयानं त्यांची मान विनम्र झाली आहे कुणाला माहीत ?

● ● ●

# काव्यानंद मीमांसा !

बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. अंगणांत गुडघाभर पाणी वाहात होतं. वळचणीखालीं पांखरं जमलीं होतीं. रस्त्यावर काळं कुत्रंदेखील दिसत नव्हतं. पाण्यानं रस्ता माखला होता. थंडीनं माणूस कांकडत होतं. घराच्या दारं खिडक्या बंद केल्या होत्या. दार उघडून बाहेर जायची सोय नव्हती. तरीपण घर सोडून बाहेर जाणं मला भाग होतं. आगाऊ ठरलेला कार्यक्रम मी बाजूला डावलूं शकत नव्हतें. वाटेल त्या परिस्थितींत मला वनिता मंडळाचं सभागृह गांठायचं होतं. दिलेला शब्द पाळायचा होता म्हणून नव्हे, तर मनांतील ईर्षा पुरी करायची संधि साधायची होती म्हणून. ज्या संधीची मी गेले कितीक दिवस वाट पाहात होतें ती आयती चालून आल्यानं मला साधायची होती. त्या कारणानं एवढ्या पावसांत कुणी येईल कीं नाहीं याची चर्चा करून मनाला शिणवत न बसतां मीं छत्री घेतली आणि दार उघडलं. सरळ घराबाहेर पडलें.

रस्त्यांत अमाप पाणी होतं. चिक्कार पाऊस होता. त्यामुळं पाऊल नीट उचलत नव्हतं. रस्ता जणू मागं सरायचा तो मधेंच रेंगाळत होता. आळ-सावलेल्या माणसाप्रमाणं त्याची गति झाली होती. त्या कारणानं दहावीस

पावलांवरच मी ओलीचिंब झालें. छत्रीनं भागलं नाहीं. डोकं शाबूत राहिलं तरी मी भरपूर भिजलें. अगदीं लुगडं चिंब भिजून अंगाशीं चिकटून गेलं...

परंतु पावसाशीं झुंज खेळत मी हळूहळू आणि कशीबशी का होईना एकदाची ठरल्या ठिकाणीं जाऊन पोंचलें. पण बघतेंय तर बाहेर शुकशुकाट. दरवाजा पुढं केलेला. कुणी आलं आहे कीं नाहीं कांहींच कळेना; त्यामुळं आल्या-पावलीं परत निघावं म्हणून एका मनानं कौल दिला, तर आंत जाऊन तर पाहा म्हणून दुसऱ्या मनानं हेका घेतला. घटकाभर चलबिचल झाली. दारांतच घुटमळलें. पण दुसऱ्या मनाची सरशी होऊन मीं भीतभीतच दार उघडलं. तशी कुणाचा तरी आवाज आला, ' विद्याताईंचा पत्ता कसा नाहीं अजून ? ' मनाला धीर आला. छत्री मिटवून मी तडक सभेच्या जागीं गेलें. चारदोन तरी बायका भेटतील म्हटलं. पण बघतेंय तर ती जागा भरून गेलेली. दाटीवाटीनं बायका जमलेल्या. पावसानं भिजून गेलेल्या. तोंडावरचं, हातावरचं, अंगावरचं पाणी टिपत असलेल्या. त्यांना बघून मला आनंद झाला. दरवाजाबाहेर चपला काढून ठेवून मीं आंत पाऊल टाकलं.

आणि त्याच घटकेला उदबत्त्यांचा सुवास सर्वत्र दरवळला. चारदोन वाद्यांचे मंगल स्वर बाहेर पडले. पाठोपाठ समाधान कानावर आलं आणि ' करूं या भारत जयजयकार...' या गाण्यानं एका क्षणांत वातावरण प्रसन्न झालं. मी हारखलें. चिंब भिजलें होतें तरी, थंडीनें काकडलें होतें तरी मोठ्या आनंदानं आंत जाऊन बसलें. माझ्या मनाला हुषारी आली. माझं गाणं आतां खात्रीनं रंगणार याची खात्री वाटली. माझ्या चेहऱ्यावर आनंद उसळला. ओंठावर गाणं खेळूं लागलं...

आपलं असलं गाणं कुणाला आवडेल किंवा नाहीं कुणाला माहीत अशी शंका आल्याकारणानं मीं भीतभीतच पहिलं गाणं गाऊन दाखविलं. तसं करतांना माझ्या आवाजाला कंप आला. गीतांतील भावना डोळ्यांत आली. पण त्याचा परिणाम बरा झाला. माझ्या गाण्याची छाप सर्वांच्यावर पडली. " आणखी एक गाणं म्हणा. " बायकांनीं गलका केला. माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. मला फार बरं वाटलं. मोठ्या सुखद संवेदना मीं घटकाभर अनुभवल्या. माझ्या कल्पनेचा विजय झाला. मीं म्हटलेलं गाणं एक लोकगीत होतं ! सभेच्या ठिकाणीं कधीं कुणीं सन्मानानं न केलेली ती करा-

मत होती. सुधारणेच्या जगांत झपाट्यानं मागं पडलेलं तें भावगीत होतं. पिढ्यान् पिढ्यांनीं प्रेमानं उराशीं धरून बाळगलेला तो भोळा भाव होता. तो जुना होता. पण बायकांना पटला. कुणाला थोडाफार ओळखीचा म्हणून. कुणाला आपल्याच आयुष्यांतील वाटला म्हणून. कुणाला गाण्याची चाल आवडली म्हणून. कुणाला त्यामागची भावना जिव्हाळ्याची वाटली म्हणून. अशा नाना कारणांनीं मीं गाइलेल्या भावनेचं स्वागत झालं. एखादं जिवाभावाचं माणूस फार दिवसांनीं भेटावं तशा बायका हरखल्या. मला बरं वाटलं. गौरीच्या रूपानं माहेरीं येणाऱ्या मुलीचं तिच्या आईनं केलेलं स्वागत मीं म्हटलेल्या लोकगीतानं बोलून दाखविलं होतं. ही माहेरची गोष्ट बायकांना आवडली. जणू आपणच माहेरीं गेलों आहोंत अशी त्यांची भावना झाली ! त्या भावनेंत त्या एकरूप होऊन गेल्या. त्या कारणानं त्यांचे डोळे माझ्याशीं बोलले, हसले, आनंदले, कौतुकले. मला विलक्षण समाधान झालं..." असलीं गाणीं बायका ऐकून घेणार नाहींत. नव्या काळांत हें जुनं काय कामाचं ? " असल्या प्रश्नांनीं माझ्या कल्पनेला बाजूला फेकूं पाहणाऱ्या माझ्या मैत्रिणींची मला याद आली. पण त्यांचा पराजय झालेला बघून मी खुशींत आलें. वाटलं, " सामान्य मनाची पारख त्यांना नाहीं म्हणून त्या तशा बोलल्या असल्या पाहिजेत. एरव्हीं अशा गाण्यांची त्यांना बेफिकिरी वाटती ना ! ..." पण फार वेळ स्वतःशीं विचार करीत बसायला मला वेळ नव्हता. " आणखी म्हणा. " असा बायकांनीं एकमेकींना जोरानं डिवचीत आणि एकमेकींत कुजबुजत मला तगादा केला. तशी मलाहि हुरूप आला. एक सोडून चांगलीं पांच सात गाणीं मी लागोपाठ म्हणालें. त्यांच्यांत माझा जीव ओतून म्हणालें. आठ आठ दिवस एकेक गाणं शिकतांना खर्ची घातलेली सारी पुण्याई पणाला लावून म्हणालें...

त्यामुळं सारं वातावरण एकदम प्रसन्न झालं. पारिजातकाच्या ताज्या फुलांप्रमाणं सर्वत्र समाधान दरवळलं !... उत्साह शिगोशीग भरून वर आला. आशा फुलली, मन उजळलं. माझ्या भावनेंत आणि गीतांतील कल्पनेंत माझ्याभोंवतालची दुनिया विसावली. मला ब्रह्मानंद झाला...

संसारांतील सुखदुःखांनीं नटलेल्या लोकगीतांनीं बायकांचीं मनं हेलावलीं, भारावलीं, आनंदलीं. आपल्याच मनांतील भावना कुणींतरी शब्दांनीं गुंफिली

याचा त्यांना आनंद वाटला. समाधानानं त्यांचे डोळे पाणावले. घटकाभर ओळखीच्या भावना बोलून दाखविणाऱ्या त्या गीतांनीं त्यांना जणू बेहोष केलं...

आणि माझ्या कल्पनेला बहर आला. माझ्या अपेक्षेपेक्षांहि तिला यश मिळालं. चांगल्या फळाफुलांनीं ती सजली. प्रेमळ आणि जिव्हाळ्याच्या भावनेनं उमललेल्या सुंदर फुलांच्या वेण्या तिनं जणू प्रत्येकीला वहाल केल्या...मनाला विलक्षण उभारी आली...

खरं म्हणजे त्या वेळीं मीं मोठं धाडसच केलं. नभोवाणीच्या चालकांनीं आपली इच्छा व्यक्त केली म्हणून मीं नव्या धर्तीवर नभोवाणीसाठीं लिहायचा बेत केला. नागपंचमी जवळ येत चालली होती. म्हणून 'नागपंचमी'-वर श्रुतिका लिहायची मीं कबुली दिली. पहिल्यांदा हें काम मला सोपं वाटलं. पण लिहायला बसलें तशी मनांत भीति उभी राहिली. "लोकगीतांनीं सजविलेली नागपंचमी त्या लोकांनीं पसंत केली नाहीं तर?..." आणि माझी ही भीति जेव्हां खरंच रास्त ठरली तेव्हां तर माझा अगदींच हिरमोड झाला पण मीं माघार घेतली नाहीं. माझी लेखणी यशस्वी होईल या आत्मविश्वासावर मीं स्वतःवर सारी जिम्मेदारी घेतली. यशापयशाचं ओझं मीं आपल्या अंगावर घेतलं, आणि माझ्या कल्पनेप्रमाणं लिहायला बसलें.

लहानपणापासून दरवर्षी आमच्या लहानग्या गांवांत एकेक महिना मीं खेळलेली पंचमी माझ्या नजरेंत आली. ओल्या अंगणांतील फुगडी, झिम्म्याचा खेळ, तासन् तास चालणारा बायकांचा फेर, पोरांना घेऊन गरगर फिरणारा जीग, उंच उंच आभाळाला हात लावायला शिकवणारा झोपाळा, निरनिराळ्या प्रकारचीं खेळांचीं गाणीं वगैरे वगैरे आवर्जून माझ्या मनांत गोळा झालं. आणि नागोबाची पुंगी तर अक्षरशः कानांत घुमत राहिली...फुगडीचा पिंगा तर बेशक ओंठावर आला...सभोंवतीं माझ्या बरोबरीच्या सगळ्याजणी जमल्या आहेत या भावनेनं माझं मन नाचूं लागलं...आणि त्या नादांत मीं माझी लेखणी खालीं केव्हां ठेवली याचं मात्र मला भान राहिलं नाहीं!

पंचमी केव्हां येणार, कधीं आली, लेकीला सांगावा कसा धाडला, लेक माहेरीं कशी आली व वारुळाला कशी गेली, तिनं काय काय दागिने घातले, नणंदा भावजया कशा खेळल्या, नागाची पूजा कशी झाली इत्यादि सगळ्या

भावनांनीं सजलेलीं गाणीं माझ्या श्रुतिकेंत घालून मीं खेड्यांतील 'पंचीम' माझ्या लेखणीनं साजरी केली !

तरीपण नभोवाणीवर प्रत्यक्षांत तिचं ध्वनिक्षेपण होईपर्यंत माझ्या जिवांत जीव नव्हता. माझ्या हातांतील गोष्ट आतां अनेकांच्या हातांत गेली होती ! आणि त्या सर्वांच्यावर भरंवसा ठेवून राहण्याइतपत मला कुणाची फारशी माहिती नव्हती ! त्यामुळं मला भारी काळजी लागली. मनाला चटका लागून राहिला... माशासारखा जीव तडफडूं लागला...आणि मी इतकी अस्वस्थ झालें कीं, या पंचमीचे तीन तेरा वाजण्यापेक्षां या फंदांत आपण पडायलाच नको होतं अशी माझ्या मनानं उचल खाल्ली !...अखेरशेवटीं नभोवाणीच्या लोकांच्या जवळ या श्रुतिकेच्या यशापयशाची चर्चा केली आणि प्रत्यक्ष मीं स्वतः त्यांत भाग घ्यायचा ठरला तेव्हां माझा जीव खालीं पडला.

त्या उमेदींत मीं माझ्या चाली दिल्या. डोळ्यांदेखत श्रुतिका चांगली बसल्याचं पाहिलं. पण प्रत्यक्ष तिच्या ध्वनिक्षेपणाचा दिवस म्हणजे नागपंचमी जव्हां खरोखरच उजाडली तेव्हां मात्र काळजांतील आंतल्या कप्प्यांत पुन्हां भीतीनं मान वर केली ? कुणाला माहीत ऐनवेळीं काय होईल ? मला धास्ती वाटली...पण मी माघार घ्यायला राजी झालें नाहीं. दुप्पट हिंमत मनांत धरूनच नभोवाणी केंद्रावर कार्यक्रमासाठीं गेलें...अगदीं 'पंचीम' खेळायला जावं त्याप्रमाणं नवी साडी नेसून आणि नव्या बांगड्या घालून गेलें...

आणि स्टुडिओमधील तांबडा दिवा लागून प्रत्यक्ष झिम्म्याच्या खेळानं जेव्हां खऱ्या कार्यक्रमाला सुरुवात झाली तेव्हां तर हें प्रत्यक्ष आपल्या अंगणांतच चाललंय या कल्पनेनं माझ्या नसानसांतून लहानपणाप्रमाणं 'पंचीम' खेळूं लागली ... माझ्या बरोबरीच्या मंडळींनाहि तोच साक्षात्कार झाला. एक दिलानं सारी भावना पुढं सरकत चालली. फुगडीच्या पकव्यानं तर धमालच करून सोडली अगदीं !...जणू बेभान होऊनच फुगडी झिम्मा रंगून गेली... पण फेराच्या गाण्याला सुरुवात झाली आणि समोरच्या घड्याळाकडे नजर गेली तशीं पांच सात मिनिटं उरलेलीं दिसलीं ! सगळं लौकर आटपायला हवं होतं याची मला जाणीव झाली. पण बाकीचे सारे आप-

त्याच नादांत होते. त्यामुळें कुणाला चुकूनहि पत्ता लागणार नाहीं एवढ्या बेमालूमपणानं मीं थोडी कापाकाप केली आणि शेवटचं पिंग्याचं गाणं म्हणून अगदीं ठरलेल्या वेळीं सारं संपवून टाकलं ! ...

पण स्टुडिओंतून बाहेर पडतांना मात्र जिवांत जीव येईना ! सगळं कसं झालं आणि कुणाला किती पटलं या शंकेनं मी बेचैन झालें. माझ्या कावऱ्या-बावऱ्या नजरेनं जवळपासच्या लोकांचीं मनं पारखलीं. सर्वांच्या चेहऱ्यांवर आनंद उजळलेला बघून मला हायसं वाटलं. मी हसलें. आणि चार दोघींनीं हस्तांदोलन करीत माझ्या पाठीवर थोपटून शाबासकी दिली, तेव्हां तर आनंदाच्या पलीकडे आणखी कांहीं तरी वाटलं ! प्रसन्न मनानं मीं घर गांठलं. घरच्या माणसांनीं तर मला एवढी शाबासकी दिली कीं, शब्दांनीं तिचं वर्णन करणं अशक्य आहे.

परंतु त्याहिपेक्षां माझ्या मनाची समाधानानं जी चलबिचल झाली ती परगांवाहून त्या दिवशीं आलेल्या माझ्या ओळखीच्या लोकांच्या टेलिफोनमुळं आणि गांवांतील माझ्या स्नेह्यांनीं केलेल्या टेलिफोनवरील अभिनंदनामुळं ! ... घटकाभर खरंच मला वेड्यासारखं झालं. जुन्या काळीं जें होतं तें मीं आज फक्त माझ्या परीनं लोकांना सादर केलं होतं. यापलीकडे त्यांत माझं म्हणून कांहीं निराळं नव्हतं ! त्यामुळं मी भांबावून गेलें...लोकांना हवं तें मिळालं कीं, त्यांना किती आनंद होतो याचा मला साक्षात्कार झाला... आणि माझ्या कल्पनेला यशस्वी करणाऱ्या माझ्याच आनंदाला उधाण आलं...

त्या दिवशीं अंगणांत लख्ख चांदणं पडलं होतं. जेवणवेळ टळून गेली होती. घरचं कामधाम मागं सरलं होतं. तान्हुलीं पाळण्यांत निजलीं होतीं. गोठ्यां-तील गाईवासरांना वैरण टाकली होती. बायका रिकामपणाच्या गोष्टी करा-यला माझ्याभोंवतीं जमल्या होत्या. तुळशीच्या कट्ट्यावर बसून मी त्यांच्याशीं गोष्टी करीत होतें. समोरासमोर आम्ही बसलेल्या.

तर कशावरून तरी बोलण्यावरून बोलणं निघालं. एकजण म्हणाली, " आतां हें विरळाच. " आणि तिनं एक गोष्ट सांगावयाला सुरुवात केली. म्हणाली, " एक गांव होतं. तिथं एक आई न् एक लेक राहायची. तर एकदा काय झालं कीं, आई न् लेक दोघींनाबी दिवस गेले. दोघी संगतच बाळंत

झाल्या... " तशी कोण हंशा पिकला विचारूं नका. " काय ग बाई आक्रित तरी ? " एकीनं हसून हसून मुरकुंडी वळली म्हणून आपलं आश्चर्य व्यक्त केलं. पण गोष्ट सांगणारीण म्हणाली, " हसूं नका. खरी गोष्ट पुढंच आहे. " त्यामुळं हसूं आवरीत आम्हीं कान तिला. ती सांगूं लागली, "तर काय झालं बघा कीं, चार दोन महिन्याचं पोरगं लेकीच्या हवालीं करून आई मरून गेली. पोटच्या पोरावाणी सांभाळ म्हणाली. पाठचा भाऊ जतन कर म्हणाली.

" होतां होतां वर्ष लोटलं. लेकीचा नवरा देवीची पूजा करूं म्हणाला. देवीला नदींत पोर सोडूं म्हणाला. तशी हिचं काळीज करपलं. भावावर नवऱ्याचा दांत आहे हें तिनं ओळखलं. तिनं बेत केला. देवीला निवद केला. स्वतःचं पोर पाठीला बांधलं. आपला भाऊ पोटाला बांधला. नवऱ्याबरोबर निघाली. नदींत तिनं आपलं पाठीचं पोर सोडून दिलं. मन घट्ट करून देवाला म्हणाली, ' सांबाळ बावा. माजं पोट पिकूं दे. ' घरीं आली. भावाला मुलाच्या जागीं सांभाळूं लागली. नवऱ्याला कशाचीच दाद नाहीं. तो आपला हिचा भाऊ नदींत सोडला ह्याच नादांत.

" तर आणखी कितीक दिवस असेच आले न् गेले. हिला ओळीनं पांच मुलगे झाले. भावाचं हिनं लग्न केलं. हौस केली. मानपान केलं. त्याला मुलगा समजूनच नवरा लग्नांत आरवला मिरवला. पण एक दिवस काय झालं कीं, ही दळण दळतांना भावावरच्या ओव्या गाऊं लागली. तशी नवरा हसला. म्हणाला, ' कुठाय ग ओव्या गायला ? ' तशी हीहि हसली. म्हणाली, ' तो कोण आहे मग ? ' तेव्हां सगळा उलगडा झाला. तर अशी आहे भावाबहिणींची कथा ! ...आज कोण कुणाला नुसतं विचारायला देखील राजी नाहीं ! "

बोलतां बोलतां ती बाई गहिंवरली. तिच्या डोळ्यांतून आसवं गळालीं. बाकीच्या बायकाहि गंभीर झाल्या. बहिणीनं भावासाठीं केलेल्या त्यागाची किंमत त्यांना जाणवली असावी. त्यांनीं नुसतं एकमेकींच्याकडे डोकावून पाहिलं. म्हणून मी म्हणालें, " जुन्या काळीं अशा गोष्टी फार होत्या. लोक त्या गोष्टींना कहाण्या म्हणायचे. रोज नित्य नियमानं वडीलमाणसं मुलाबाळांना कहाण्या सांगायचीं. त्यापासून धडा शिकवायचीं. आतां तसं नाहीं...आणि त्या वेळचीं

माणसं पण बोलावं तसं वागायचीं. अमाप त्याग करायचीं. ईर्षेनं जगायचीं "...

आणि मग कितीतरी वेळ अशा गोष्टी आळीपाळीनं सांगत बसून व त्यावरून धडा काय घ्यावा याची चर्चा करून आम्हीं काढली. मध्यान्ह उलटून गेली तरी आम्हांला उठवेना. जणू आमचीं मनं ब्रह्मानंदीं टाळी लागावी तशीं या कहाण्यांत गुंगून गेलीं...पंचपक्वान्नं खाऊन पोट तुडुंब भरावं आणि तोंडाला चव यावी तसं आमचं झालं ! ...कणगीचं तोंड उघडलं कीं, आंतले ठेचून भरलेले दाण भराभर बाहेर यावेत अशा थाटानं आमच्या कहाण्या आमच्या ओंठावर आल्या...आणि मग त्या नादांत आम्ही ज्या बसलों त्या पार एकेकीच्या घरचा तगादा आला तेव्हां कुठं नाइलाज म्हणून उठलों !

• • •

# घरगुती माणसं

आपण कधीं काळीं लांबच्या प्रवासाला गेलों आणि त्या नव्या जगांतलं सौंदर्य कितीहि मनाला भुरळ घालणारं असलं तरी घरच्या माणसांच्या आठवणींत जसे वरचेवर गुंगून जातों, त्याचप्रमाणं अधूनमधून कामांचा ढीग शिगोशीग भरत चालला म्हणजेहि कांहीं लोकांच्या आठवणींन मन रेंगाळल्याशिवाय राहात नाहीं. निदान माझं तरी तसं होतं. आणि मग मी माझ्या हातांत येऊं पाहणारं काम बाजूला करीत तें आपण स्वत: उरकून टाकणाऱ्या माणसांची आठवण मनांत घोळीत बसतें. अगदीं परीक्षेसाठीं मनन केलेला, अभ्यासिलेला एखादा सुंदर उतारा मनांत सांठवून ठेवीत आठवायचा प्रयत्न करावा त्याच पद्धतीनं म्हटलं तरी चालेल.

आयुष्याच्या प्रवासाची चढण चढत असतांना अशा प्रकारच्या माणसांशीं आपली जी संगत जडत असते त्या माणसांना मी घरगुती माणसं समजतें. या माणसांचा आपल्या जीवनांत संबंध येतो तो केवळ घरगुती प्रसंगापुरता. एरव्हीं त्यांचं नि आपलं जग निराळं असतं. कांहीं काम निघेल तेव्हांच त्यांचं नि आपलं दर्शनं घडायचं अशी वस्तुस्थिति असते.

माझ्या आयुष्यांत पहिल्यांदा ठळकपणें असं जें घरगुती माणूस आलं तें एखादा हक्काचा नातलग घरांत वावरावा नि त्यानं लहान पोरांना दटावीत ताब्यांत घ्यावं त्या थाटांत !

माझे वडील त्या वेळीं असिस्टंट डेप्युटी होते आणि त्यांचा शिपाई म्हणून येसू आमच्या घरांत आलेला होता. त्याचं खरं नांव यशवंत, पण आम्ही सारींजणं त्याला येसूच म्हणत असूं. आणि त्याला स्वतःला तर या 'येसू'-तच विशेष खुमारी वाटत असे असं तो कितीदा तरी बोलून दाखवी.

येसू दिसायला तसा काळासावळाच, पण कामाला भारी चलाख. पडेल तें काम त्यानं आपल्या घरांतलं समजून करावं असं त्याचं वागणं. जेव्हां माझा एकुलता एक धाकटा भाऊ वारला आणि त्या धक्क्यानं आई अंथरुणाला खिळली, त्या वेळीं मी परकरांत देखील न शिरलेली. घरचं सैंपाकपाणी, माझं होय नाहीं कुणीं पाहायचं हा मोठाच प्रश्न होता. पण या येसूनं सारं घर चुटकीसरशीं आपल्या ताब्यांत घेतलं आणि चुलीला पोतेरं घालण्यापासून तों मला नवा झगा घालून शाळेला वेळेवर पोंचविण्यापर्यंत त्यानं सारं एखाद्या सराईत सुगृहिणीसारखं उरकून टाकलं ! एवढंच नव्हे तर घरांत कांहीं आहे नाहीं हें आई पाहायची त्याप्रमाणं त्यानं माझ्या वडिलांना धोतरं खरेदी करण्यापासून तों थेट आईच्या चोळीलुगडयापर्यंत आपल्या आवडीनिवडीप्रमाणं आणायला सुरुवात केली ! !... त्या वेळीं मी येसूला म्हटल्याचं आठवतं, "तूं कसं रे सारं मनासारखं करतोस आपल्या ? जसा कांहीं आमच्याच घरचा तूं !" त्यावर त्यानं दिलेलं उत्तरहि आठवतं, "हो, मी तुमच्याच घरचा. लोकांचीं माणसं घरांत कामं करतात ? अशी तुला मांडीवर घेऊन ऊनऊन दूधभात जेवायला वाढतात ? साहेब गांवाला गेले, तरी तुझ्यासाठीं घरांत राहून पाठीवर तुला घेत घोडा घोडा करतात ?..."

त्या वेळीं येसूला मीं "नाहीं !" असं सांगून तो घरांतला असल्याचं कबूल केलं होतं. आणि आज त्याची एकेक आठवण आली कीं, या क्षणाला देखील मी तशीच नकारार्थी मान हालवून तो घरगुती कसा होता याचा विचार करीत बसतें-...

काळ बदलेल त्याप्रमाणं जग बदलतं म्हणतात. त्याप्रमाणं आयुष्य पुढं चालेल तशीं अनेक माणसंहि आपल्याला सोबत देऊं करतात ही गोष्ट खोटी

नाहीं. याचं प्रत्यंतर आम्ही इस्लामपूरला बदलून गेल्यावर घरांतल्या कामासाठीं आलेल्या कोंडीबरोबर गजगे खेळतांना मला आल्याविना राहिलं नाहीं.

येसूची बदली झाली आणि आपल्या पदरचा पहिला नवा परकर-पोलका मला शिवून तो हुंदक्यानं दाटला असतां फिरून फरून मागं पाहात गांवाला गेला तसं मला वाटलं होतं कीं, जिव्हाळ्याचं माणूस निघून गेलं आपलं! पण कोंडीनं येसूची जागा घेतली आणि माझं तें वाटणं हळूहळू नाहीसं होत म्हणा कीं रेंगाळत म्हणा, मला बरचसं सोडून गेलं खरं!

कोंडी माझ्यापेक्षां वयानं खूपच मोठी. चांगली तरणी बाई होती ती. दिसायला गोरीपान. डोळे सुंदर. पण मेलीचं नाक अगदीं बसलेलं! तरीपण रोज मी उठायच्या आधीं वेणीफणी करून, स्नान करून ती आमच्या घरांतलं काम सुरू करायची. त्यामुळं मला ती विशेष वाटे. आमच्या परड्यांतल्या बोअरिंगचा दांडा भराभर हालवून ती घागर भरायची आणि चटकन् माडीवर घेऊन यायची. हें पाहिलं कीं मी तिच्या दंडावर रुतून बसलेल्या चोळींत बोट खुपसून म्हणायची, " काय खातेस ग ?"

माझा हा प्रश्न ऐकून कोंडी मोठ्यांदा हसायची आणि म्हणायची, "तुझी आई देईल ती भाकरी आणिक चटणी. "

तिचं हें बोलणं लक्षांत ठेवून आई तिला काय देते यावर मी पाळत ठेवायची आणि मग कोंडी नको नको म्हणाली तरी तिच्या घरीं जाऊन तिच्या पुढ्यांत बसून तें खात म्हणायची, " माझा दंड मोठा होईल का ग ? मग मी पण पाणी हापशीन! घागर आणीन! "

कोंडीला तें पटायचं नाहीं. "येडी का खुळी ? " म्हणून मला पोटाशीं धरीत ती माझा मुका घ्यायची आणि मग लगेच ती पुढं नि मी मागं अशा थाटांत पुन्हा आमच्या घरांत हजर व्हायच्या! हवं तेवढं पाणी ती मला द्यायची बादलींत ओतून, पण माझ्या भावलीला आंघोळ घालायला आणि भातुकलीच्या डावांतलीं भांडीं विसळायला आईची मनाई असल्यानं मी चिमणीसारखं तोंड करून त्या पाण्याकडं पाहात राहायची!

एकच दिवस कुठंतरी आई बाहेर गेलेली बघून कोंडीनं आणि मी आमच्या मनासारखं पाणी वापरलं, गजगे खेळलों, भातुकलीचा खेळ मांडून सैंपाकपाणी

करून जेवलों. त्या वेळीं अचानक आमच्याकडे कोणीतरी पाहुणा आला. कोंडीनं तें पाहिलं आणि ती माझ्या कानांत कुजबुजली, "ही कोण असं त्या पाहुण्यांनीं विचारलं तर म्हणावं मैत्रीण आहे! मोलकरीण आहे म्हणूं नको हं!"

कोंडीचं त्या वेळचं हें बोलणं आज आठवलं कीं, मनाची कालवाकालव होते. वाटतं, त्या वेळीं हें कळायला हवं होतं. कारण एवढं जिवापाड कोंडी आमच्यासाठीं सारं उरकीत होती तरी ती म्हणाली तसं मी न बोलल्यामुळें कोंडी आमचं काम सोडून जायला तयार झाली होती! तिला हवी होती ती माणुसकी माझ्याजवळ न सांपडल्यामुळें माझ्याबरोबर मांडलेला खेळाचा डाव ती उधळून टाकायला राजी झाली होती! ..."आम्ही तुमच्या घरीं मोलाचीं माणसं असलों तरी आम्हांला पण काळीज असतं आणिक म्हणून तर मी जीव लावून तुमचीच एक समजून माझा हात घरांत फिरूं देतें..." कोंडीनं मला कान धरून ही शिकवण दिली होती. त्याची आठवण आली कीं खरंच तिची माया पोटांत मावेनाशी होते! ... आणि मग मी आजच्या घडीला ती माणुसकी गवसली नाहीं कीं पार उदास होऊन जातें.

चांगल्या माणसांच्या संगतीनं आयुष्य माखलं जातं त्याचप्रमाणं वाईट माणसांची संगतहि टाळून टळत नाहीं याचा अनुभव दहा वर्षांमागं मला आला.

मला वाटतं ४२ च्या लढयाच्या धामधुमींतील ही गोष्ट असावी.

कॉलेजमध्यें नुकतं पाऊल टाकलेलं. धड लहान नाहीं धड जाणतंहि नाहीं अशा परिस्थितींतल्या वयाला घेऊन मी चाललेली. तशांत सात नवसाचा माझ्या अंगाखांद्यावर खेळलेला माझा एकुलता एक भाऊ गेला आणि आईनं फार काळ अंथरुणाला पाठ टेकली. घरांत दोन अगदींच चिमुरडया बहिणी. वडील सतत फिरतीवर असलेले. प्रपंचाचं सारं माझ्याच अंगावर. मी अगदीं भांबावून गेलेली. माझ्या या गैरसावधपणाचा फायदा घेऊन आमच्या त्या वेळच्या राधा मोलकरणीनं सुरुवातीला दाखवलेला समंजसपणा सोडला. रोज घरांत ती मन लावून सारं करीत असे असं वाटायचं तें नाटकी होतं याची चाहूल सुरू झाली आणि तिनं सारं घर साफ धुवायचा चंग बांधला! हाताला लागेल तें तिनं आपलं म्हटलं. अगदीं चुलीपुढचं सरपण नि काडयाची पेटीदेखील तिनं घरांत

टिकूं दिली नाहीं. एवढंच नव्हे तर येईल त्या माणसाचा खिसा रिकामा करायचा सपाटा तिनं लावला ! ... जगांतली माणुसकी मेल्याचं तिनं जणू जाहीर केलं; म्हणून मी सारीं कामं माझ्या ताब्यांत घेऊन तिला अखेरचा नमस्कार केला. मन अगदीं पिचून गेलं म्हणून मी कोंडीला तार करून पुण्याला बोलावली. पण समजलं कीं लग्न करून ती सासरीं गेली आहे! माझी उमेद जणू खचून गेली.

पण देवानं गाऱ्हाणं ऐकून धावत यावं म्हणतात त्याप्रमाणं टिकली बाबूनं आमच्या घरांत शिपाई म्हणून प्रवेश केला. आपल्या बायकोला घरच्या कामाला बोलावून त्यानं झाडलोट आपल्याकडे घेतली आणि माझ्या अंगावर आलेलं ओझं नाहींसं केलं. परंतु आळवावरच्या पाण्यासारखी या माणसांची सोबत घडली. बाबूची बदली झाली नि त्यानं आमचं घर सोडलं.

आणि मग लक्ष्मण कार्वे आमच्या घरांत आला. पोरगेलासाच माणूस, पण मोठा हुशार. नुकतं त्यानं लग्न केलं होतं. पण बायको अगदींच लहान होती म्हणून आईकडून सैंपाक करायला तो शिकत असे. त्यामुळं माझी मोठी सोडवणूक झाली होती नि मनांत आलं होतं कीं, " जग कांहीं सारंच वाईट नाहीं आतांचंहि ! "

हा लक्ष्मण म्हणजे मुलखाचा द्वाड होता. काम सारं करायचा परंतु त्याला आमच्या बरोबरीनं खाणंपिणं हवं असायचं. पण तेवढ्यानं भागायचं नाहीं, तर आमच्यावर भारी हक्क दाखवायची त्याला खोड होती! माझ्या बहिणींना तर एखादा पाहुणा आल्यावर कसा नमस्कार करावा हें शिकवण्यापासून तों जेवल्याबरोबर ताटांत हात न धुतां मोरींत जाऊन दांत नि हात स्वच्छ कसे करावेत याचे तो कडक शिस्त दाखवून धडे द्यायचा. आणि रामायण महाभारत त्यानं वाचलेलं असल्यामुळं उठतां बसतां त्यांतल्या गोष्टी सांगून माझ्या अभ्यासांत व्यत्यय आणल्याखेरीज त्याला जमायचंच नाहीं ! ...

लक्ष्मण असला तरी धुण्याभांड्याला बाई हवीच होती, म्हणून गोपीला आम्ही घरीं कामाधामाला बोलावलं. ती बया आली ती " काय गो ऽऽ, ह्यो कोन घरांत हाय ? " असं लक्ष्मणाकडे बघून कानठळ्या बसाव्यात अशी ओरडलच ! त्या नादांत लक्ष्मण विळीवर कांदा चिरीत होता तो असा द च

कला कीं, त्याचं बोट पार आरपार कापून गेलं आणि ह्या बयाचा सर्वांनाच हादरा बसला. . .

गोपी इतर कोंकणी नोकरांसारखी प्रामाणिक होती, तरी तिला भारी तोंड होतं. घरांत एकजात साऱ्या माणसांना तीअरे जारे म्हणायला लागली म्हणजे आमच्या तोंडाचा चंबू होऊन जायचा ! कांहींतरी जगावेगळं आपण ऐकतों आहोंत असं वाटायचं. पण कुणीं कितीहि सांगितलं तरी तो तिचा ठेका कायमच ! बरं, धुणंभांडीं स्वच्छ धूत होती म्हणावं तर तीं नेमकीं कमी, थोडीं पडतील तेव्हां. एरव्हीं एका बादलींत सारीं भांडीं बुचकळून निघायचीं आणि धुण्याच्या पिळ्याला अंगभर पाणी कधीं भेटेल तर शपथ ! एखादा पाहुणा आला नि धुणभांडीं थोडीं जास्त वाढलेलीं दिसलीं कीं ती गरजलीच, "कोन गो आलांव आज ? सारका कसा येतांव पावना ?" आणि मग तिच्या-मागून आलेल्या तिच्या लहान लहान पोरांनीं एकेक भांडं उचलून जिन्या-वरून गडगडत नेलंच म्हणून समजावं !

पण इतकं करूनहि गरजवंताला अक्कल नसते म्हणतात या न्यायाला स्मरून आम्ही गोपीला सांभाळली होती. तथापि तिचं तोंड फारच सुटत चाललं तेव्हां एक दिवस मीं तिला काम बंद झाल्याची नोटीस दिली आणि धुण्याची बादली घेऊन स्वतः नळ गांठला.

परंतु तसे दिवस फार राहिले नाहींत. आईनं एका शेजारच्या बाईला गरज होती म्हणून पूर्वीपेक्षां पगारवाढ करून घरीं बोलावली आणि दिवस थोडे बरे आले आहेत असं वाटावं एवढं ती मन लावून काम करूं लागली.

तिचं नांव लक्ष्मी होतं. नांवाप्रमाणेंच होती ती. अगदीं सदा शांत. आवाज म्हणून नाहीं. पडेल तें करावं आणि जातांना विचारून जावं. अंगावर चिंध्या होत चाललेलं लुगडं, पण कधीं कुरकूर नाहीं कीं 'द्या'चा तगादा नाहीं. घरचं कोणी नव्हतं म्हणे तिला. म्हणून हातपाय दुखस्तोंवर ती काम करायची आणि पोट भरायची. पण तिनं नुसते पैसे पै पैनं गोळा केले नाहींत तर माणसंहि त्याच हिशोबानं जोडलीं. आमच्या घरीं तिनं आपल्या गुणानं पाय रोवला. निर्धास्त वाटावं एवढं लख्ख काम तिनं सुरू ठेवलं. म्हातारं माणूस पण चपळाई तरुणाला लाजवील एवढी ! मी पीएच्. डी. झालें त्या दिवशीं कडोसरीचा सारा खर्च भागून उरलेला एक आणा तिनं पेढ्यापायीं खर्चून

अनुक्रम 39९3६ दि: ... क्रमांक ...

माझं तोंड गोड करीत मला पोटाशीं धरली. मींहि तिला वडीलधाऱ्या माणसाला नमस्कार करावा तसा वांकून नमस्कार केला. लक्ष्मीला आभाळ ठेंगणं वाटलं. मला समोर उभी करून तिनं डोळे भरून पाहिली आणि एखादा देव घरीं यावा त्या थाटामाटांत आपल्या घरीं नेऊन तिनं मला बाजरीची भाकरी आणि आळण जेवूं घातलं...

लक्ष्मी दिवसेंदिवस थकत चालली म्हणून, तिच्या पैशांत कपात न करतां दुसरी एक बाई जोडीला बोलवावी म्हणून आह्मी विचार करीत होतों. एवढ्यांत तिच्या एका दूरच्या नातलगानं तिला आपल्या घरीं गांवाकडे नेली आणि मग सरळ दुसरी बाई कामाला पाहणं आम्हांला भाग पडलं.

दुसरी बाई चंद्रा सध्यां घरांत आहे, पण लक्ष्मीची सर तिला नाहीं. चंद्रा चांगली वयस्कर आहे. जाणती आहे. पण कामापुरता मामा नुसता ! सांगावं तेवढंच करील. आपुलकीचं नांव नाहीं. दरवर्षी बाळंतपणाची तिची रजा चुकायची नाहीं. आणि तिच्या पोराबाळांनीं तिच्या अपरोक्ष येऊन 'आई सैंपाक करतीया' असं सांगून अगर 'पाव्हण' आल्याची वर्दी देऊन कसंबसं उरकलेलं काम डोळ्यासमोर राहूं दिल्याशिवाय आम्हांलाहि भागत नाहीं. केवळ ती उलट बोलत नाहीं. करील तेवढं तरी प्रामाणिकपणानं चोख करते म्हणून आम्ही गप्प राहतों. वेळ पडली तर आमचं आम्ही शेजारच्या लोकांच्या बायांचं गबाळं नि घाणेरडं पैशानं मोजलं जाणारं काम बघून त्यापेक्षां लाख पटीनं आमचं चांगलं आहे या समजुतीनं घरीहि सारं उरकून घेतों....

आजकाल या घरगुती माणसांचा तोंडावळाच असा घडवला जातो आहे कीं, जणू आम्हांलाच त्यांची गरज आहे ! त्यांना काय, हें नाहीं तर दुसरं घर !!

तरीपण माणसामाणसांतल्या तऱ्हेचा एकेक नमुना ठळक नजरेंत भरला तो इथें मीं नोंदवला आहे.

रोजच्या कामांतून डोकं वर निघालं कीं ह्या बऱ्यावाईट आठवणी मनांत थैमान् घातल्याविना राहात नाहींत आणि मग नाजुक तराजूमध्यें सोनंनाणं जोखावं त्याप्रमाणं दरवेळीं कमीजास्त दुखावलेली अगर सुखावलेली भावनामापक स्मरणसांखळी हातांत घेऊन बसावं असं अभूनमधून जें घडतं आहे त्याला इलाज नाहीं.

• • •

# शेजारधर्म

रोज वीसपंचवीस मिनिटांत आमच्या धुण्याची वाट लावणारी मोलकरीण, आज तास होऊन गेला तरी नळावर रेंगाळलेली बघून मला आश्चर्य वाटलें. म्हणून जेवणं झाल्यावरची सैंपाकघरांतली आवराआवर न करतां हातांवर पाणी पडल्याबरोबर मी पहिल्यांदा गच्चींत आलें आणि नळाकडे डोकावलें. बघतेंय तर चिमी खालीं मान घालून खास खास धुणं धूत असलेली ! आहे काय हा प्रकार ? मला चैन पडेना. मीं चिमीला हांक दिली आणि सरळ विचारलं, " आज धुणं फार लांबलं ग चिमे ? " तशी तिनं बोलावं कीं नाहीं ? आमच्या शेजारणीनं मधेंच तोंड खुपसलं, " कां ? घरचं धुणं काढलंय तिनं. मीच आणीत जा म्हणालेंय. "

त्यामुळं मी फुसफुसत माघारीं घरांत वळलें. शेजारणीनं काल मीं तिला पैसे दिले नाहींत त्याचा वचपा काढला होता ! मोलकरणींनीं आमच्या घरीं आपलं धुणं आणूं नये हें माझं म्हणणं ठाऊक असतांनाहि तिनं मुद्दाम ही गोष्ट केली होती. मला चीड आली. आदळआपट करीत मीं कसंबसं सैंपाकघर आवरलं आणि मुकाटयानं पलंगावर येऊन झोपलें. वा...

आज उठल्यापासून फार हातपाय हाललेत तेव्हां झोप येईल. पण कुठली झोप यायला ? जिवाची नुसती उलघाल होत गेली. कसलाच विचार मनाला झेपेनासा झाला. डोकं उठलं. दुखायला लागलं. म्हणून झोपलें व उठलें आणि बाम लावावा यासाठीं बामची बाटली हातांत घेतली. पण ती गोष्ट एकाएकीं मनांत घुसली तशी बामची बाटली मीं फेकून दिली; आणि वैतागानं स्वत:वरच ओरडलें, " आजपासनं शेजाऱ्यांचं बघशील तर याद राखून ऐस ! झाला येवढा खेळखंडोबा रग्गड रग्गड झाला ! " माझं डोकं जास्तच भडकलं तशी मीं दार दाण्दिशीं पायानं पुढं ढकललं आणि आंतून कडी लावून घेत स्वत:लाच लाखोली मोजली !

माझा फाजील आपलेपणा मला भोवला होता. शेजारणीला आपली घरची मानून मी हक्कानं वागवायला गेलें होतें तें माझ्या गळ्याशीं आलं होतं. नसता अपमान तिनं मला गिळायला लावला होता, आणि स्वत: आपण मात्र वर तोंड करून मेली माझ्यावर उलटली होती ! असूं दे. हेहि दिवस जातील. मग गोरीचं गोरेपण कळेल म्हणावं. बापजन्मीं माझ्यासारखी मोकळ्या मनाची भेटणार नाहीं हिला. पण तिला कुठं आहे माझी खातर ? स्वार्थी मेली ! नाहींतर काय आमच्या घरांतल्या कुणाच्या लग्नांत तरी मी एवढी हाललें असतें का ? पण हिच्या लेकीच्या लग्नांत बघा ! जशी काय वरमाय नाहींतर करवली मीच ! पापड काय पुढें होऊन केले, सांडगे काय घातले, कुरडई पापड्या रंगारंगाच्या काय केल्या, खारवडे काय तोडले, बाजारांत तीनतीनदा जाऊन कापडचोपड काय आणलं, वेळ पडली तर पदरमोड काय केली, पैपाहुण्यांचा आदरसत्कार काय केला...म्हणजे घर बाजूला सारून रोजच्या चौपट अंगमेहनत केली. पण तिला कांहीं त्याचं आहे ? साध्या बांगड्यांच्या पैशावरून बिघडावं ? म्हणजे मला हिरव्या बांगड्या भरायला हिला सांगितल्याच मुळीं कुणीं ? माझं मी कांहींहि केलं असतं. बरं, घातल्या ते घातल्या वर मग गप्प राहावं कीं नाहीं तें राहिलंच. मेली बांगडीचे पैसे दिले नाहींत म्हणून गांवभर टिमकी वाजवीत फिरतेय ती ? इश्य ! कांहीं लाज ?

नाहीं. मी म्हणतें हिला पैसे द्यायचे तरी किती कुठवर? मला घरांत विचारणारं कुणीच नाहीं कीं काय तरी? आमच्या घरांतलीं माणसं वाघ

आहेत म्हणावं. गप्प आहेत तोंवर ठीक, एकदा का बिनसलीं म्हणजे फाडून खातील. आहांत कुठं?

पण मीच मेली लोचट. कशाला उगाच ओळख करायला धडपडतें आणि आपलेपणा जोडतें? मलाच माणसांची हाव ना? मग कर्माचीं फळं भोगेना तर सांगणार कुणाला?

पण खरं सांगायचं तर आतां नाहीं निभत. सहनशक्तीला तरी मर्यादा असतेच कीं! ही कोण एवढी लागून गेली म्हणून हिचा एवढा तोरा?... पण माझ्या ह्या चिडचिडीचा आतां काय उपयोग? ती केव्हांच माझ्या डोक्यावर मिरें वाटून राहिलीय!

हिला बरं वाटावं आणि हिच्या मनाची हौस व्हावी म्हणून हिच्या नवऱ्याला पसंत नव्हतं तरी मीं जवळ सांठवलेले तीनशें रुपये सराफाच्या हातावर ठेवले! आणि मोत्यांच्या बांगडचा व माळ आणली. त्याचं उट्टं काढतीय काय ही असं वागून? बराय बराय! बोरी तिथल्याच बाभळी पण आहेत म्हणावं. फुक्कट मरशील मीं कळ काढली तर?

परंतु तिनं माझं ओळखलंय. मी कुणाचं वाटोळं करायला कधीं निघायचीच नाहीं. तिथं मग हिच्या वाईटावर तरी कशी जाईन? माझं काळीज ज्याच्या त्याच्या मायेनं भरलंयना? द्वेषाला तिथं थाराच कुठला?

गोष्ट खरी आहे. चारदोघींच्याकडून हिच्याबद्दल ऐकलं होतं तरी तें खोटं मानून ती शेजारी आली तशी मीं जिव्हाळा उभा केला. सुरुवातीला तिखटा-मिठापासून तों ज्वारी-बाजरीच्या पिठापर्यंत मीं तिला मदत केली. म्हटलं चार मुलं पदरांत हिच्या, तेव्हां खोळंबा नको. आणील केव्हां न् करून खाईल केव्हां ही माझी भावना, आणि ह्या भावनेला हुंकार भरला. मला बरं वाटलं.

पण गंमत काय झाली कीं, तिनं माझं अवसान ओळखलं आणि मधून मधून कुठं नवं पातळच नेसायला माग, कुठं एखादा दागिनाच माग, तर कुठं पैसेच माग असा कारभार तिनं सुरू केला! पहिल्यांदा मीं एकदोन वेळीं तिच्या म्हणण्याप्रमाणं केलं. पण घेतलेला जिन्नस परत करायची भाषा तिच्या ध्यानीं-मनीं निघेना, तेव्हां आमच्या घरच्यांना तें खपेना. ज्यानं त्यानं माझ्यावर तोंड सोडून मला हैराण करावं! पण मी म्हणायची, देईल ती; आणि दोन-

तीनदा तिच्यामागं खटखट केल्यावर ती द्यायची पण. हो, एखाद्यावर उगाच खोटा आळ कशाला घेऊं पटलं नसलं म्हणून ?

तरी पण मला भारी वाईट वाटतं. आपण एवढा हिच्यावर जीव ओतावा आणि हिच्या मनांत दुष्टपणा ? कां ग बाई असं ? एकमेकांची अडचण बघितली पाहिजे, वेळप्रसंगीं मदत केली पाहिजे, हें का मला कळत नाहीं? तुझ्या लेकीच्या लग्नांत तूं सगळ्या वाड्याला बांगड्या भरल्यास. कां तर हौस उतूं आली म्हणून ! आणिक बांगड्यांचं बिल मीं द्यायचं म्हणजे ? हा कुठला न्याय ? शेजार-धर्म करायचा म्हणजे असला ? म्हणजे मग मला घरांत ठेवील का कोणी ? पण हिला कुठला त्याचा विचार ! स्वतःचं साधलं कीं बास ! म्हणजे नेहमीं हिचं ऐकून एक वेळ मीं नकार दिला तर मी वाईट का ? अगदीं पार बोलणं बंद करीपर्यंत ? आणि नोकराकडून मला आवडत नाहीं तें करीपर्यंत ? शाबास !

म्हणजे खरा दोष हिचा आणि जो भेटेल त्याला खरंखोटं करीत बसायचं मीं ! चांगला न्याय आहे—हिचं असलं वागणं बघितलं कीं वाटतं हिनं घात-लेल्या बांगड्या काढून तिच्यापुढं आपटाव्यात ! पण मन आवरतें. शोभा व्हायची ती अशा वेळीं दोघींचीहि व्हायची ! आणि झाकली मूठ चव्हाटयावर उघडी व्हायची. म्हणजे एवढी उठाठेव कराच कां ? पण गप्प बसायचंहि जिवावर येतं. बांगड्या हाताला बोचतात. काढून ठेवाव्या म्हटल्या तर एक वेळ हातांत वेगळा रंग दिसला तरी हिनं गल्ली गोळा केली नाहीं नाहीं तें बोलून ! गरीब श्रीमंती काढली ! आतां काय म्हणावं बाई हिला ?

तीच आमची दुसरी शेजारीण बघा. कुणाच्या वाटेला जायची नाहीं. कामापुरतीच बाहेर दिसेल. एरव्हीं दाराआड घरांत ! नख नजरेला पडायचं नाहीं तें ? बोलणं बसणं मग लांबच. पण माणसानं एवढं नाहीं करूं. असला माणूसघाणी स्वभावहि उपयोगी नाहीं. चार माणसांत आलं पाहिजे, गेलं पाहिजे, देवघेव केली पाहिजे. एकटीच राहीन म्हटलं तर ऐन वेळीं कोण धावून येईल ?

आतां परवांचंच बघा कीं ! हिच्या पोटांत दुखायला लागलं. पहिलटकरीण. जवळ कोणी नाहीं. घरच्या कुणाला बोलावणं नाहीं. सगळा नवराबायकोचा कारभार. शेजाऱ्यांशीं सोईरसुतक मुळींच नाहीं. मग आम्ही तरी कशाला जा नको—त्या वाटेला ? पण काय झालं कीं, नवरा सकाळींच नोकरीनिमित्त

बाहेर गेलेला, आणि हिचं पोट तर फार दुखायला लागलेलं. बरं तर सांगावं कीं नाहीं? दार बंद करूनच 'आई ग! न् उई ग!' विव्हळणं ऐकून जीव राहतोय का माझ्यासारखीचा? नाक मुठींत धरून झक मारीत गेलें. चौकशी केली. टांगा आणला. दवाखान्यांत नेली. आणिक बेटी बाळंतपणाच्या कॉटवर ठेवल्यावर मला जा म्हणते? आहे कीं नाहीं? कां तर म्हणे नवरा पाहिजे. पाठवून द्या! गेली मेली हिची अक्कल चुलींत ती! नवरा काय करणार कपाळ? मी आलें बाई वाद न घालतां माघारीं. कोण बसतंय तोंड दुखवीत?

पण घरांत येऊन तरी चैन पडतेय का? कुठली आलीय्! सारखी दाराशीं येऊन डोकावूं लागलें. कोणी येऊन कांहीं सांगतेंय का बघूं लागलें...

● ● ●

# आपली तपासणी

परवां एक फारच जरुरीचें काम निघालें म्हणून मी एका मोठ्या गृहस्थांच्याकडे गेलें होतें. इतर ठिकाणीं आपल्या नांवाचें कार्ड देऊन आपण आल्याची वर्दी द्यायची संवय म्हणून मीं त्या वेळींहि माझ्या नांवाचें कार्ड त्यांच्याकडे पाठविलें. त्यांचा माणूस माझें कार्ड घेऊन त्यांच्या खोलींत गेला. मला वाटलें, लवकरच कांहींतरी निरोप घेऊन तो येईल. पण चांगलीं सातआठ मिनिटें झालीं तरी त्याचा पत्ताच नाहीं. त्यामुळें मनांत आलें, ते गृहस्थ बरेच कामांत असावेत आणि आपण तासाभरानें पुन्हा यावें. म्हणून मी स्वतःला फार वेळ बुचकळ्यांत न पाडतां पाऊल उचललें आणि ज्या वेगानें आलें होतें त्याच वेगानें परत निघालें. एवढ्यांत तो माणूस भरभर त्या खोलीबाहेर येऊन मला 'अहो बाई ऽऽ' असें पुकारीत पुढें आला. माझी समजूत मला त्या गृहस्थानें आंत या म्हटलें असेल; एरवीं तो कशाला एवढी हांक मारील ? आणि त्याच कल्पनेनें मीं घाईघाईनें त्याला विचारलें, " आतां लगेच या म्हणालेत का रे ? " पण त्यानें असें कांहीं चमत्कारिक तोंड करून ' नाहीं ' म्हटलें कीं, धरणीकंपाचा हादरा बसावा तसें माझें काळीज हादरलें ! पण त्याच क्षणाला, " साहेब तपासणी करताहेत "

असें चटकन् तो बोलून गेल्यानें भानावर येऊन मीं विचारलें, " तपासणी ? ...कसली रे ?..." त्यावर चंबूसारखें तोंड करीत तो पुटपुटला, " कुणाला माहीत ! साहेबांचे डोळे तारवटलेत. पापणी देखील हालत नाहीं. मी पुढं गेलों, तुम्ही आलाय म्हणालों तरी हूं कीं चूं नाहीं...आपले गप्पच ! ... शेवटाला मीच म्हणालों कीं, साहेब तपासणी चाललीय म्हणूं का ? तशी नुसती मान हलवली !...फाइली तपासतांना असंच होतं कधीं कधीं---" तें ऐकून मला वाटलें ते फार कामांत असावेत. घटकाभर थांबावें म्हणजे काम संपतांच भेट होईल. पुन्हा पुन्हा जा ये कशाला करा ?

आणि म्हणूनच मी त्या खोलीबाहेरच्या एका प्रशस्त बाकावर बसून राहिलें. पण चारदोन मिनिटांतच एक शंका आली म्हणून माझ्यासमोर उभ्या असलेल्या त्या माणसाला मीं विचारलें, " दुसरी कोणी यायची, भेटायची वेळ ठरवलेली नाहीं ना रे पण ? " तशी मान हालवून त्यानें नकार दर्शविला. त्यामुळें ' मग असूं दे. आत्तां संपेल काम ' या भावनेनें मी हातांतल्या पिशवींत ठेवलेलें एक पुस्तक काढलें आणि वाचावें म्हणून नजरेसमोर धरलें.

पण कांहीं केल्या वाचनांत लक्ष लागेना. मनालाहि वाचत बसावें हें पटेना. सारखें मनांत यायला लागलें, " आपण ह्या गृहस्थाकडे काम घेऊन आलों हें चुकलें कीं बरोबर ? पूर्वींची ना ओळख ना देख. कुणाला माहीत स्वभाव कसा आहे तो? बरा असेल तर धडपणें ' या ' म्हणून नीट बातचीत, विचारपूस व्हायची, नाहींतर द्यायचा ' वेळ नाहीं आतां ' अशी सबब ठोकून ! हो कुणी सांगावं ?..." आणि त्यामुळें कारण नसतांना मनाची अस्वस्थता वाढत चालली---नाहीं नाहीं तें उगाचच लक्षांत येत गेलें---

मागें आमच्या शेजारीं एका नव्यानेंच आलेल्या बिऱ्हाडांत एक बाई राहात होत्या. दिसायला चांगल्या सभ्य, चारचौघांत वाढलेल्या, खाऊनपिऊन बऱ्यापैकीं, पेशा मास्तरकीचा, घरीं चार लोकांची सतत वर्दळ; तर आपली माझी समजूत कीं, ह्या बाई स्वभावानें फारच चांगल्या असणार, म्हणून मी आपली ओळख करून घ्यावी म्हणून सहज एक दिवस गेलें. निमित्त म्हणून आमच्या शिवबाला कोणत्या शाळेंत घालावा ह्या बाबतीचा सल्ला पुढें केला. वाटलें, स्वतः मास्तरीणबाई, तेव्हां सांगतील सारें खरेंखोटें, बरेंवाईट. पण गंमत अशी झाली कीं, माझ्या अंगावरचें किंचित् फाटलेलें पातळ डोक्यांत

सांठवीत आणि हातांतल्या काचेच्याच असलेल्या बांगडयांकडे बघत म्हणाल्या कीं, " तुम्ही कोण ? " मी आपलें अमूक अमूक असें येण्याच्या कारणांसहित उत्तर दिलें. पण तें ऐकून फणकाऱ्यानें दूर जात त्या पुटपुटल्या, " मी शाळा-मास्तरीण नाहीं. शिवण क्लास असतो माझा. " आणि क्लासचा पत्ता माझ्या तोंडावर फेकून " गरज असेल तर तिकडे या " म्हणून मान फिरवून त्यांनीं मीं आल्याबद्दल नापसंती दर्शविली.

त्या दिवशीं कुठून तिथें जायची बुद्धि झाली म्हणून दहादा तरी मी स्वतःला बोलन घेतलें असेल. पण तेवढयानें माझ्या चुरगळून गेलेल्या भावनेला मला साफसूफ करतां आलें नाहीं. ती जास्तच चुरगळून जाईल कीं काय याची धास्ती मनांत कायमचें घर करून बसावी असाच एकेक प्रसंग घडत गेला...

एक दिवस मी अशीच कुणाला तरी पत्र लिहीत बसलें होतें. शेजारची एक मोलकरीण आपल्या दूर देशच्या लेकीचा पत्ता आणून मला " हं , तिला म्हनावं कीं, मी बरी हाय... तूं मातुर लौकर ये...पंचीम गाठून बरं का... पोराला नीट संभाळीत जा म्हनावं. येसबंदाचा तुकडा घिऊन दिष्ट काढावी म्हन सांगा...धारंचं भांडं धून पुसून घ्याला लागतं म्हन सांगा...येळच्या येळला सैंपाक करीत जा म्हनावं...मर्जीमाप राहा म्हनावं सव्यांच्या...आनिक ह्यो कागुद पोचलार पोचला कीं, लगोलग तुझाबी येऊं दे म्हन घाला त्यांत..." असलें कांहीं तेंच तेंच माझी पाठ व्हायची वेळ येईपर्यंत बडबडत आणि मी लिहीत असलेल्या कागदाकडे अधाशीपणानें बघत माझ्यासमोर बसली होती. आणि तिचें बोलणें व ' हं हं ' करीत माझें लिहिणें ऐन रंगांत आलें असतांना नेमक्या त्याच क्षणाला त्या बाईच्या घरच्या पोरानें दौतीला हातांतल्या दांडूनें टोला देऊन त्याच कागदावर उपडी केली... " आर मेल्या " करून अंगावर धावून जात त्या बाईनें त्या खटयाळ पोराच्या मुस्काटांत भडकावली... आणि तिच्या अघळपघळ बोलण्याची गोळाबेरीज मनांत जुळवून ती कागदावर ठेवणारें माझें मनहि एवढ्या प्रयासानें तयार केलेल्या पत्रावर तरंगणाऱ्या शाईकडे बघत आकसून गेलें... " पोर आहेस कीं कोण रे ? " मला राहवलें नाहीं म्हणून मीं त्याच्यावर चिडून डोळा मोठा केला तों ती बाई, " थोडी मानुसकी असूं दे म्हटलं मानसाजवळ... पोरं लोकांचीं असलीं तरी

झाडाला नाहींत म्हटलं लागत ! " असें पुटपुटत लढाईच्या पवित्र्यांत समोर येऊन दाखल झाली !

माझ्या माणुसकीचा उच्चार तिनें केला त्या क्षणापासून खरोखरच तिला उत्तर द्यायच्या भानगडींत न पडतां मी माझ्याजवळच्या माणुसकीचा शोध लावण्यांत गुंतून राहिलें...

आणि जसाजसा एकेक विचार माझ्या मनांत येत गेला तशीतशी मी कसकशी आजवर इतरांशीं वागत आलें याचा आरसा नजरेंत मावत चालला...

आमच्या घराशेजारचीं दोन घरें सोडून पलीकडे असलेल्या घरांत एक मोलमजुरी करणारी बाई राहात होती. तिला चौथा पांचवा महिना असतांनाच एक दिवस तिला विलक्षण त्रास होऊं लागला. ती अगदीं कासावीस झाली. तिला कमालीचा थकवा वाटूं लागला व ती पांढरीफट्ट पडत चालली. म्हणून मीं घाईघाईनें टांगा करून तिला दवाखान्यांत नेली. शस्त्रक्रियेची जरूर आहे असें डॉक्टरांनीं सांगतांच तिच्या नवऱ्याला बोलावून सारें व्यवस्थित रीतीनें पार पाडण्याची शिकस्त केली. एवढेंच नव्हे, तर तिच्याजवळ डॉक्टरांना द्यायला पैसे नाहींत असें तिचा नवरा पुटपुटला म्हणून मीं हातांतील एक सोन्याची बांगडी काढून आगाऊ रकमेदाखल डॉक्टरांसमोर ठेवायलासुद्धां मागेंपुढें पाहिलें नाहीं ! ...पण जिला वांचवायची शिकस्त केली ती हीच बाई बरी झाल्यावर नुसती धडपणें बोलायलाहि राजी झाली नाहीं; उलट मुलाबाळांच्या खेळांतील धुसपुशीचा आवाच्या सवा बाऊ करून ती भांडायला उठली...शेजारधर्माची *ओळख* तिनें अशी दाखवली...

आणि ओळख मामुलीची झालेल्या एका बोहारणीनें ह्या बाईजवळ मला न गवसलेली माणुसकी कारण नसतांना अचानकपणें एक दिवस माझ्या पुढ्यांत ठेवल्यानें मी अगदींच गोंधळून गेलें ! ... त्याचें असें झालें कीं, मी एक मोठी परीक्षा पास झालें होतें. घरांत कौतुक मावत नव्हतें. म्हणून मीं घटकाभर मैत्रिणीकडे जावें या निमित्तानें घराबाहेर पडलें तों एक दोनदा जुने कपडे घेऊन पितळेचा नवा डबा दिलेली बोहारीण रस्त्यांत हसतमुखानें सामोरी आली. तिनें मला पाहतांच लगबगीनें डोक्यावरची भांड्यांची पाटी खालीं ठेवली आणि दंडावरच्या चोळींत पैसे मुडपून ठेवावेत तसा ठेवलेला एक पेढा काढून माझ्या तोंडांत कौतुकानें घालीत अलाबला घेऊन कान-

शिलावर बोटें मोडीत म्हटलें, "काळीज सुपाएवढं झालं. आनंद वाटला. वेस झालं पास झालीस तें ... डोंगराएवढी मोठी हो बाई ... "

त्या बाईच्या या आगळ्या कौतुकानें मन गुदमरून गेलें. वाटलें, जगांत माणुसकीचा वापर होतो आहे. ना घेणें ना देणें. पण मनांतला आनंद तिनें एवढ्या आपुलकीनें व्यक्त करावा ही कल्पनाच मला तरी हृद्य वाटली आणि मनांत आलें कीं, वाईट अनुभवाच्या जोडीला चांगलाहि येतोच ... खऱ्या-खोटयाची परीक्षा जाणत्या मनाला झाल्याविना राहात नाहीं. फक्त त्या मनाची गांठ पडणें मुष्किलीचें होऊन बसतें इतकेंच काय तें...

" अहो बाई, साहेब बोलावताहेत... " माझ्या समोर येऊन त्या माणसानें मला अचानक अशी बातमी दिल्यानें माझी विचारमालिका एकदम धावत्या मोटारीला ब्रेक लागल्यानें ती थांबावी तशी थांबली आणि मी सरळ त्या गृहस्थाकडे गेलें.

" फार कांहीं काम नाहीं; पण पांच मिनिटं तरी आपलीं द्यावीं लागतील. " आंत जातांच मी खुर्चीवर बसतांना नमस्कार करीत त्या गृहस्थांशीं बोललें. त्यामुळें माझ्या नमस्काराचा स्वीकार करून त्यांनीं उलट नमस्कार करीत म्हटलें, "कामाचं मग बघूं या...तुम्हांला जगाचा अनुभव कसा काय ? "

त्यांचा हा प्रश्न ऐकून मी दचकलें, गोंधळलें. काय बोलावें सुचेना. नुसतीच 'आ' वासून बघत राहिलें. त्यामुळेंच तेच गृहस्थ म्हणाले, " आजकाल माणुसकीचा पत्ता लागत नाहीं कुठं...नुसतीं वैयक्तिक कामं झालीं कीं बस्स...आणि एखादं का न होईल तर संपलं...खलास तुम्ही. अगदीं माणसांतून उठलांत म्हणून समजा ... " तरीहि त्यांच्या बोलण्याचा रोख नीट न ध्यानांत आल्यानें आपण येथें काम घेऊन येण्यांत चूक तर केली नाहीं या शंकेनें काळीज हादरून गेलें... आंतला शब्द आंतच घुटमळला. वाटलें चटकन् निघून जावें, आणि म्हणून मी उठून उभी राहिलें तशी तेहि गृहस्थ जागचे उठले आणि म्हणाले, " बसा ना ... " त्यामुळें मी मुकाटयानें खालीं बसलें आणि पुढचें ऐकावें म्हणून कान दिला.

" ...परवां अशीच एक गोष्ट घडली. माझा एक जुना मित्र. जिवलग, अगदीं गळ्यांत गळा घालून असायचे आम्ही. कोण कुणाला फसवील हें

स्वप्नांतदेखील खरं वाटायचं नाहीं. पण तो स्वप्नभंग झाला. उभी ह्यात मी ज्याचं मन सांभाळावं म्हणून स्वतःचं मन बाजूला सारीत आलों त्या माझ्या मित्रानं आमचे एका कामाबावतचे सारे कागदपत्र चुलींत टाकले. राखरांगोळी केली त्या कागदांची ... आणि पंधरावीस हजाराला मी गमावून बसलों... उजळ माथ्यानं त्यानं माझा कांहीं संबंध नाहीं म्हणून सांगितलं. वाटलं, एवढी माणुसकी यानं गहाण टाकलीन् तरी कुठं ? पण... पण तो नुसता फिदीफिदी हसला ... माझ्याजवळच्या भावनेचा, प्रेमाचा, माणुसकीचा त्यानं बेमालूम उपयोग करून घेऊन स्वतःचं पोट भरलं ... मला माझं पोट रिकामं राहिलंय म्हणून दिक्कत नाहीं वाटत; पण...मी एवढा फसलों कसा, विश्वासलों कसा याचंच नवल वाटतं. माझी मलाच एवढी परीक्षा कशी झाली नाहीं? एवढं मुर्दाड कसं झालं माझं मन, न ओळखतां जीव लावण्यासारखं ?... माणूस एकटा जगूंच शकत नाहीं. स्वतःच्या भावनेला इतरांच्याहि भावना जोडीत तो पुढं जातो... "

त्या गृहस्थांनीं कपाळावर आठ्या चढवून चिडक्या आवाजांत आपलें मन मोकळें केलें आणि दोन्ही हातांनीं कपाळ गच्च दाबून धरीत मला विचारलें, "तुम्ही नशीबवान असाल... असलं जीव घेणारं प्रेम तुमच्या वांट्याला आलं नसेल..."

मी एवढा वेळ नुसती ऐकत होतें. आतां त्यांनीं विचारलेंच म्हणून तोंड उघडणें भाग होतें, म्हणून मी पुटपुटलें, "हा नसला तरी याला शोभेल असा अनुभव मलाहि चुकलेला नाहीं... तरी पण आपण जें केलं तें आपल्या भावनेनं, मदतीच्या ईर्षेनं, एवढं समाधान मात्र उराशीं घेऊन बसलें आहे ! "

"नुसत्या पोकळ समाधानावर जगत नाहीं माणूस. एकदा साद घातला कीं प्रतिसाद आला तरच ती भावना जगते, फोफावते, लहानाची मोठी होते."

"अगदीं बरोबर. पण नेहमींच नाहीं जमत तसं. आपल्या भलेपणाची आपुलकीची किंमत जाणणारी दुनिया भेटली नाहीं तर सारं गप गिळून कर्तव्य केल्याच्या समाधानांत शांत राहणं भाग पडतं."

" पण जीव चरफडतो हो... स्वतःच्या बावळटपणाची, भोळेपणाची चीड येते...नागरिकशास्त्र, बंधुभाव, ममता, प्रेम, स्नेह, आपुलकी, कर्तव्य हे शब्द एकेरी नाहींत. संबंधित लोकांशीं त्या त्या शब्दामागची भावना जोडलेली असते. आणि त्यामुळेंच निष्काम कर्म करणाराला नुसत्या प्रेमळ शब्दांचा तरी स्वार्थी मोह टाळणं अशक्य होतं..."

ते गृहस्थ कल्पनेबाहेर जिवाला पडणारा पीळ आपल्या परीनें व्यक्त करीत होते. मला त्यांतला नीट उमज होत नव्हता तरी त्यांची भूमिका पटत होती. म्हणून त्यांचें बोलणें थांबलें तेव्हां मी एवढेंच म्हणालें, " दुसऱ्याचे दोष काढण्यापेक्षां आपण स्वतःलाच आधीं तपासून बघावं. समाजांत जगायला, इतरांना मदत करायला आपण स्वतःच लायक आहोंत कीं नाहीं हें आधीं पारखून घ्यावं." आणि फार वेळ घेतला तर उगाच त्या गृहस्थांचा गैरसमज होईल ह्या भावनेनें माझ्या कामाबद्दल शब्द काढला तेव्हां किंचित् चिडक्या आवाजांत त्यांनीं म्हटलें, " हेंच तें. काम झालं कीं संपलं. दुसऱ्याच्या मनाची, भावनेची किंमत नाहीं; जीवनाबद्दल निष्ठाच नाहीं आजच्या जगांत... काम आजचें उद्यां होईल. पण जाऊं पाहणारी माणुसकी वेळींच जगवली नाहीं तर कायमची गमावून बसण्याची शक्यता फार. नुसते सहानुभूतीचे शब्द कशाला महाग होऊं देतां ? " त्यामुळें पुन्हा मूळ मुद्याकडे वळून मीं काम बाजूला सारलें आणि माणुसकीच्या बाबतींत मनांत घोळणारा सारा अनुभव त्यांच्या पुढें ठेवीत शेवटीं म्हणालें, " प्रत्येकाला वेगळा अनुभव येतो. म्हणून सारें सोडून भागत नाहीं... शेजार चुकत नाहीं, टळत नाहीं. त्यामुळें त्यांच्या दोषांवर पांघरूण घालून माणुसकीची ओळख त्यांना हळूहळू का होईना करून देणं ही देखील माणुसकीच ठरेल... स्वतः नागरिक म्हणून जगायचं तर कधीं पैशाचा त्याग तर कधीं भावनेचाहि त्याग करणं भाग आहे...खरी माणुसकी त्यागमय जीवनांत आहे, कर्तव्यपालनांत आहे. आपण जमेल तेवढं अंगचुकारपणा न करतां केलं यापरता दुसरा भव्य आनंद नाहीं जीवनांत... " आणि पुन्हा याबाबत भेटायचें, चर्चा करायचें ठरवून घरीं निघून आलें.

पण मला त्या वेळेपासून दर क्षणाला, आतां या घटकेला देखील, मनापासून वाटतें आहे कीं, हा चर्चेचा विषय नाहीं. ही न संपणारी बाब आहे.

अनुभवाखेरीज तिची पारख नाहीं. आणि त्यामुळेंच कीं काय, रिकामा वेळ सांपडला कीं माझें मन आपलीच तपासणी करण्यांत, स्मरणसांखळी गुंफीत असतांना त्यांतले वेचक प्रसंग मनावर कोरून ठेवण्यांत गर्क होऊन जातें. कारण स्वतःचीच तपासणी करतांना जो एक विलोभनीय असा अनुभव मन उप-भोगतें तो व्यक्त करायला शब्दांची दुनिया अपुरी आहे...ज्याची तोच खरी अशी भलीबुरी परीक्षा करूं जाणे...त्याची सर इतरांना येणें नाहीं.

● ● ●

# ज्ञानदेवी आणि मी !

माझ्या लहानपणीं त्या दिवशीं घडलेला तो प्रसंग आठवला म्हणजे माझं मन आनंदानं भरून येतं. हातांतील काम अशा वेळीं बाजूला सारून तो प्रसंग नजरेंत घोळवीत बसतें. त्या वेळीं झालं गेलं सारं आठवीत मी बराच वेळ एकटी बसून राहतें. मला तो एकान्त मनापासून आवडतो आणि पूर्णांशानें तो मिळाला कीं माझं मन नव्या उत्साहानं न्हाऊन ताजेतवानं होतं. मीं खुशीनं मागं सारलेलं काम हातांत घेऊन पुन्हा तें करूं लागतें. कामाच्या मागं हात धावतात. आठवणींत मन रेंगाळतं, उत्साहाला मात्र नवी पालवी फुटते.

आणि असें आजवर अनेकदा झालं आहे. कदाचित् पुढेंहि तसें होत राहील. कुणीं सांगावं ? पण माझी इच्छा मात्र तसं सारखं व्हावं आणि होत राहावं अशीच आहे. कारण त्याशिवाय मला कधींच बरं वाटायचं नाहीं. त्या आठवणींत तशी मोठी जादू आहे अशी माझी वेडी समजूत आहे.

आम्ही त्या वेळीं इस्लामपूरला राहात होतों. आणि ज्या वाड्यांत आम्ही राहात असूं तिथं धार्मिक भावनेनं वेडीं झालेलीं माणसं राहावयाचीं. त्यांचं आपलं रोज कथा, कीर्तन आणि देव देव चालायचा ! मला ही नित्य

नियमांतीलच गोष्ट असल्यानें त्या वेळीं कधीं त्याबद्दल फिकीर वाटली नाहीं त्या कारणानं कधीं मीं या देवभक्तांच्या सांवलीला देखील स्वतःला पडूं दिलं नाहीं.

पण एक दिवस मात्र त्या वेळीं असा उजाडला कीं, मी कशी कोण जाणे उजाडल्यापासूनच त्या लोकांच्या घोळक्यांत अधून मधून वावरूं लागलें. आणि संध्याकाळीं तर मी नवा परकरपोलका घालून व आलकटपालकट घालून एका खोलींत बसून राहिलें. मला चुकून देखील कंटाळा आला नाहीं, कीं मी हूं कीं चूं देखील केलं नाहीं ! माझं मलाच नवल वाटलं या गोष्टीचं. पण तसं झालं खरं.

आणि तसं व्हायला माझ्या दृष्टीनें कारणहि जबरदस्त होतं. एका सुंदर अशा नक्षीकाम केलेल्या चौरंगावर एक नवं कोरं पुस्तक रेशमी फडक्यांत गुंडाळून ठेवलं होतं. त्या पुस्तकाचीं सोनेरी पानं त्या फडक्यांतून चकाकलेलीं दिसत होतीं. शिवाय त्या पुस्तकावर ठेवलेल्या दोन टपोऱ्या गुलाबाच्या फुलांनीं पण माझं देहभान हरपून टाकलं होतं. याखेरीज त्या चौरंगाभोंवताल्च्या चार तेवत्या समया आणि दहावीस सुवासिक उदबत्त्यांचा मजेदार धूर यांनींसुद्धां मला वेडं केलं होतं तें निराळंच...मी आपली टक लावून त्या पुस्तकाकडे पाहात होतें. कारण त्याचीं पानं चकाकत होतीं हें एक आणि दुसरं म्हणजे माझ्याजवळच्या सगळ्या पुस्तकांच्या एकावर एक रचलेल्या ढिगापेक्षांहि तें जाडजूड होतं ! त्यामुळं मला हातांत घेऊन तें बघायची तीव्र इच्छा झाली होती, पण त्या चौरंगाकडे मला कुणी फिरकूं देखील देईना. त्या कारणानं जागच्याजागींच बसून तें वाचणाऱ्या माणसाजवळ तें बघायची गोष्ट करावी या इराद्यानं मी गप्प बसून राहिलें. चांगली अर्धापाऊण तास तरी तशीच तिष्ठत राहिलें. शेवटीं एकदाचा एक माणूस आला. माझ्याभोंवतीं बसलेलीं सगळींजणं उठलीं म्हणून मीहि उठून उभी राहिलें आणि सगळीं पुन्हा खालीं बसलीं म्हणून मीहि खालीं बसलें. समोर बघतेंय तों एक कपाळभर गंध माखलेला मोठा जाडजूड माणूस चौरंगाशेजारच्या पाटावर बसलेला ! मी त्याच्याकडे बघतच राहिलें ! तो होताच तसा. बसकं नाक. पिचपिचे डोळे. मोठं पोट. सारं कांहीं जगावेगळं !

पण घटकाभरानं त्या माणसानं रेशमी फडकं सोडून तें आंतील पुस्तक उघडलं तेव्हां मात्र सर्वांनीं एकदम 'पुंडलीक वर दे' ची घोषणा केली आणि जमिनीला डोकं टेकून नमस्कारहि घातला ! मला तें कांहीं समजलं नाहीं. मी बसून राहिलें. त्यामुळें माझ्याशेजारीं बसलेल्या आमच्या घरमालकिणीनं मला माझी मान धरून खालीं वांकविली आणि 'ज्ञानेश्वरीला नमस्कार करावा, शहाणपण येतं' असं पुटपुटत मला नीट कान द्यायला डोळ्यांनीं खुणावलं...आणि मग मला त्या वेळीं अक्षरहि न समजलेल्या ज्ञानेश्वरीचं त्या दिवसाचं वाचन मीं शांतपणानं ऐकून घेतलं...अधूनमधून त्या माणसाच्या वाचनासरशीं माझेहि ओठ हलायचे ! यापलीकडे मीं अगदीं देवासारखी बसून त्या सोनेरी कडांच्या पानांची ज्ञानेश्वरी बराच वेळ ऐकली...

ज्ञानदेवांच्या ज्ञानदेवीला मीं जवळून पाहिली तो हा पहिला प्रसंग. आणिक तिची माझी सोबत जुळली ती देखील ही पहिलीच खेप. पण पहिल्या भेटींतच तिचं आणि माझं जिवाभावाचं सूत जमलं आहे. आणि त्याला कारण म्हणजे तिच्या आकर्षक आणि गोंडस स्वरूपाप्रमाणेंच तिनं केलेली भाषा.

> " तेथ महेषान्वय संभूतें । श्री निवृत्ति नाथ सुतें ।
> केलें ज्ञानदेवें गीतें । देशीकार लेणें ॥ "

ज्ञानदेवानं नेवासें येथील आदिनाथ शंकर यांच्या परंपरेमधील श्रीनिवृत्तिनाथांचे शिष्य म्हणून आपली ओळख करून देतांना, आपण गीतेवर देशी भाषेचा म्हणजे मराठी ठीकेचा अलंकार चढविला आहे असा अठराव्या अध्यायाच्या अखेरीस ( ओ. १८०५ ) ज्ञानदेवीमध्यें केलेला उल्लेख माझ्या मनावर फार ठसला आहे ! मराठीमध्यें ज्ञावदेवानं फार मोठा ग्रंथ लिहिला ही कल्पना मला उमजली तेव्हांपासून ही ओवी माझ्या मनावर एकसारखा नि नित्य नवा परिणाम करते आहे. ही ओवी आणि विशेषतः देशीकार लेण्याचा त्यामधील उल्लेख माझ्या ओठांवर घोळायला लागला कीं वाटतं, आपल्यालाहि असं देशीकार लेणं घडवितां आलं तर काय बहार होईल! पण मग मी लगेच विचार करतें कीं, ज्ञानदेवाची बरोबरी कुणाला करतां यावी, म्हणजे हा केवळ कल्पनाविलास आहे. त्यापेक्षां असं श्रेष्ठ साहित्य निर्माण करण्यासाठीं ज्ञानदेवीच्या रूपानं ज्ञानदेव सांगतो आहे तें अभ्यासिलें तर त्याहूनहि बहारीचें होणें शक्य आहे !

आणि माझ्या सुदैवानं केवळ धार्मिक भावना उराशीं बाळगून ज्ञानदेवीचीं पारायणं करीत न बसतां तिचा अभ्यास करायचा योग बी. ए. व एम्. ए. परीक्षेच्या निमित्तानं माझ्या आयुष्यांत आला. माझ्या दृष्टीनं माझ्या जीवनांतील हा एक अपूर्व योग आहे असं मी मानतें.

त्या वेळीं मी पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयांत एम्.ए.चा अभ्यास करीत होतें; आणि परीक्षेला ज्ञानेश्वरीचा तेरावा अध्याय नेमलेला होता म्हणून दररोज माझ्या टेबलावर ज्ञानेश्वरी होती. त्यामुळें नित्य नियमानं मी ज्ञानेश्वरीचं एखादं तरी पान वाचायची, पण खरं सांगायचं म्हणजे मला ज्ञानदेवाच्या या भाषेचा नीटसा अर्थ कळायचा नाहीं. म्हणजे परीक्षेसाठीं हवं होतं तेवढं भरपूर समजत होतं, परंतु मनाची शांति व्हावी आणि सारं कांहीं समजून उमजून इतरांना सांगतां यावं असं माझ्या मनासारखं व्हायचं नाहीं. तशांत आम्हाला ज्यांच्याकडून या विषयावर थोडंफार शिकायला मिळालं त्यांच्याकडूनहि विशेष कांहीं फायदा होण्याचं लक्षण दिसेना ! एम्. ए. च्या विद्यार्थींना फारसं खोलांत जाऊन शिकविण्यांत येत नसे ! आम्हांला आतां सगळं स्वावलंबनानं आलं पाहिजे ही अपेक्षा. म्हणून मग मी एक दिवस आमच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे गेलें. ज्ञानेश्वरी चांगली समजून द्यावी म्हणून त्यांना विनंती केली कीं, ‘ तुम्ही आम्हाला ज्ञानदेवी शिकवा ’. माझी कल्पना चटकन् होकार मिळेल, पण तसं घडलं नाहीं. मला आमच्या प्राचार्यांनीं विचारलं, “ तुम्हाला ज्ञानेश्वरी समजते का ? ” मी मनांत पुटपुटलें, “ समजत असती तर तुमच्याकडे कशाला आलें असतें ? ” पण मोठ्यानं बोलायचं धारिष्टच होईना आणि गप्प बसणंहि योग्य नव्हतं. म्हणून केवळ वेळ मारून नेण्यासाठीं मी गुरुजींना म्हणालें, “ हो ”.

मग मात्र त्यांना आनंद झाला. तें मनापासून आनंदले. हसले. म्हणाले, “ उत्तम. नाहींतर माझ्या विद्यार्थ्यांना ज्ञानेश्वरी येत नाहीं हें मला कमीपणाचं आहे ! तेव्हां बोला आतां काय पाहिजे तुम्हाला ? ”

आतां बरीक मला खूप धीर आला, आणि मीं त्यांना माझ्या मनांतील सांगून टाकलं. म्हणालें, “ तुम्ही एक वेळ शिकवा हा तेरावा अध्याय. आम्ही खूप गुण मिळवूं परीक्षेंत. ”

आणि मग अनेक प्रश्नोत्तरं व सर्व प्रकारची चांचणी परीक्षा होऊन अखेरीस माझी इच्छा पुरी झाली. मला मोठी धन्यता वाटली. केवळ ज्ञानेश्वरी शिकायला जमलं म्हणून नव्हे तर ती शिकवायलाहि ज्ञानदेवाचे महान् भक्त लाभले म्हणून !

आमचे हे गुरुजी म्हणजे प्राचार्य सोनोपंत दांडेकर. त्यांच्या जिभेवर अखंड असलेली ज्ञानदेवी त्यांनीं आम्हांला एवढी चांगल्या रीतीनं समजावून दिली कीं, ज्ञानामृताचं प्राशन करणं ही चीज काय असते याचा उत्कृष्ट अनुभव यावा...

" मूळ ग्रंथीचिया संस्कृता– । वरि मऱ्हाटी नीट पढता ।
अभिप्राय मानलिया उचिता । कवण भूमि हे न चोजवें ।।
जैसे अंगाचेनि सुंदरपणें । लेणिया आंगचि होय लेणें ।
तेथ अलंकारिलें कवण कवणें । हें निर्वचेना ।। "

( अ. १०–४३–४४ )

म्हणजे 'दागिना घालणारें शरीर सुंदर आहे व दागिनाहि उत्कृष्ट आहे' अशा स्थितींत कोणी कोणाला शोभा आणली हें सांगणें कठीण आहे. त्याचप्रमाणें मूळ संस्कृतांतील गीता उत्तम आहेच आहे व तिच्यावरील साहित्यानें नटलेली माझी देशी टीका हीहि तेवढीच उत्तम आहे. तेव्हां या दोन्ही एवढ्या सारख्या सारख्या असलेल्या गोष्टींची तुलना करतांना एखाद्याला क्षणभर असं वाटेल कीं, मूळ संस्कृत आहे त्यावर देशी टीका आहे, कीं मूळ देशी व त्यावर संस्कृत टीका आहे? तेव्हां मूळचं काय आहे हें ठरविणंच जड जाईल !

अशा प्रकारच्या आत्मविश्वासानं लिहायला बसलेले ज्ञानदेव हा ग्रंथ कशासाठीं लिहितात म्हणून मी जेव्हां अधिक बारकाईनं वाचूं लागलें, तों मला उत्तर सांपडलें—

" आणि माझें तंव आंघवें । ग्रथन येणेंचि भावें ।
जे तुम्हीं संतीं होआवें । सन्मुख सदा ।। "

( अ. १३–३२८ )

म्हणजे ज्ञानदेवांनीं संतमंडळींना असं सांगून टाकलं कीं, माझं ग्रंथलेखन हें याच हेतूनं आहे कीं, तुम्हीं संतांनीं नेहमीं प्रसन्न असावं.

संतमंडळींचा सहवास मिळावा म्हणून ज्ञानदेवांनीं ज्ञानदेवी लिहायला घेतली ही ज्ञानदेवांची भूमिका पाहिली म्हणजे लक्षांत येतें कीं, 'हा एवढा मोठा माणूस, कुशाग्र बुद्धीचा, कल्पनावैभव लीलेनं पुढं ठेवणारा, पण किती विनयशील आहे!' आणि मग त्यांच्या थोरपणाबद्दल अचंबा वाटायला लागतो. एवढंच नव्हे तर देवांचं साह्य करणं हा ज्याचा स्वभाव आहे, लोकांचं संगोपन करणं ही ज्याची लीला आहे, शरण आलेल्यांचा प्रतिपाळ करणं हा ज्याचा खेळ आहे, जो भक्तांच्याविषयीं मायाळू आहे व जो प्रेमळ जनांना सोपा आहे आणि ज्या परमात्म्याकडे जाण्यास सत्य हाच पूल आहे व जो कलांचा ठेवा आहे, तो भक्तांचा सार्वभौम राजा व वैकुंठाचा परमात्मा श्रीकृष्ण सांगत आहे व भाग्यवान् अर्जुन ऐकत आहे. ( अ. १२–४२, ४४ ). अशा प्रकारचं प्रसंगचित्र निर्माण करून गीता समजावून देत आपली भाषा पुढं ठेवणारा ज्ञानदेव खुद्द श्रीकृष्ण झाला आहे व आपण अर्जुनाच्या भूमिकेंतून वावरत आहोंत अशी कल्पना मनाला स्पर्श करून गेल्याशिवाय राहात नाहीं! निदान मला तरी तसं वाटतं व क्षणभर मग मीहि ज्ञानदेवीच्या सहवासांत स्वतःला विसरून जातें.

मानवी हृदयाच्या अगदीं आंतल्या गाभ्यांत उमटणारे संस्कार हे फक्त धर्मासंबंधींचे असतात आणि अंतिम सत्याचा शोध लावावयाचा झाला तर तो धार्मिक संस्कारांतून लावतां येतो. या सत्याची जाणीव उराशीं बाळगून ज्ञानदेवानें मराठी मनाला ज्ञानदेवीच्या रूपानें संस्कृतांतील धार्मिक तत्त्वज्ञान समजावून सांगितलें आणि बहुजन समाजाला एक प्रकारच्या नव्या जगाची ओळख करून दिली, ही वस्तुस्थिति लक्षांत आली म्हणजे मग ज्ञानदेवीकडे मी अधिकच आकर्षिली जातें...आणि सामाजिक क्रांति घडवून आणणाऱ्या ज्ञानदेवानें धार्मिक मन हें इतर कोणत्याहि सामाजिक प्रश्नापेक्षां अतिशय खोल असतें हें ओळखून, नामदेवासारखा कीर्तनकार हाताशीं धरून विठ्ठलाच्या दारीं बहुजन समाजामध्यें एक प्रकारची अभिनव जागृति करून माणुसकीचा महान् मंत्र शिकविला हें सत्य माझ्या मनांत घोळायला लागलं, म्हणजे मग तर मी साईन संगीत हा देखावा नजरेसमोर आणीत ज्ञानदेवी वाचूं लागतें...आणि मग अशा वेळीं :—

"ज्ञानदेव म्हणे तुम्ही । संत वोळगावेति आम्ही ।
हें पढविलों जी स्वामी । निवृत्तिदेवी ॥"

(अ. १२-२४७)

ज्ञानदेवानं आपला विनय दाखवीत ' प्रभु निवृत्तिदेवानं आपल्याला हें शिकविलं आहे कीं, आम्हीं तुम्हां संतांची सेवा करावी ' अशा प्रकारची भाषा करीत आपल्या लेखनाला आरंभ केला, या गोष्टीचं आकर्षण माझ्या मनाला एवढं जबरदस्त होऊं लागतं कीं, अशी भाषा करणारा हा ज्ञानदेव साहित्याविषयीं काय काय सांगत असेल याचा तपास लावीत तासन् तास मी ज्ञानदेवी चाळीत बसतें...अशा वेळीं :--

"साहित्य सोनियाचिया खाणी । उघडवीं देशियेचिया आक्षोणी ।
विवेकवेलीची लावणी । हों देई सैंघ ॥
नवरसां भरवीं सागरु । करवीं उचित रत्नांचे आगरु ।
भावार्थाचे गिरिवरु । निफजवीं मायें ॥"

(अ. १२-११, १२)

ज्ञानदेवानं गुरुरूपी मातेजवळ मागितलेलं हें मागणं माझ्या नजरेंत अखंड तरळूं लागतं......ज्ञानदेवानं केलेल्या या मागणीमध्यें या मातेजवळ असं म्हटलं आहे कीं, "शांत अद्भुतादि नवरसांचे समुद्र माझ्या भाषेंत भरती आलेले राहतील असें कर. योग्य अशा अलंकाररूपी रत्नांची माझें निरूपण हें खाणच होऊन राहील असें कर. हे माउली, गीतेंतील मतलबांचे मोठमोठे पर्वत तयार होतील असें कर. मराठी भाषारूपी पृथ्वीमध्यें अलंकाररूपी सोन्याच्या खाणी उघड आणि आत्मानात्मविचाररूपी वेलींची लावणी जिकडे तिकडे होऊं दे. याशिवाय ज्ञानदेवानं याच मातेजवळ मराठी भाषेच्या गांत आत्मज्ञानाची रेलचेल कर व या जगाला केवळ ब्रह्मसुखाचेंच घेणें-देणें दे असं विनवितांना म्हटलं आहे :--

"इये मऱ्हाटियेचे नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी ।
घेणें देणें सुखचिवरी । हो देई या जगा ॥"

(अ. १२-१५)

आपल्या मायबोलीवावत ज्ञानदेवाला वाटणारी ही आपुलकी पहिल्यांदा जेव्हां मला माझ्या शक्तीप्रमाणें उमजली, तेव्हां माझ्या मनाला एक विचार असा जोरानं धक्का देऊन गेला कीं, मराठीच्या सामर्थ्याची ही पारख आजच्या जगाला आणि आजच्या मराठी मनाला होणं अतिशय जरूरीचं आहे. एवढेंच नव्हे तर —

" माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजासी जिके ।
ऐसी अक्षरें रसिकें । मेळवीन ॥
जियें कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे ।
वेधें परिमळाचे बीक मोडे । जयाचेनि ॥
ऐका रसाळ पणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा ।
बोले इंद्रिया लागे कळंभा । एकमेकां ॥ "

( अ. ६–१४,१५, १६ )

मराठीचा अभिमान धरून ज्ञानदेवानं आपला आत्मविश्वास प्रकट करतांना मारलेली ही कल्पनेची भरारी आणि विचारांची ठेवण या घटकेलाहि अगत्याची आहे, असं निश्चयपूर्वक मला वाटायला लागतं. भाषेच्या आधारावर विभागल्या जाणाऱ्या प्रांतरचनेंतील मराठी मनाला ज्ञानदेवांचा हा अभिमान जरूर समजला पाहिजे, यासाठीं माझ्या मनाला विलक्षण तळमळ वाटू लागते. अशा वेळीं अमृतालाहि लीलेनें पण प्रतिज्ञापूर्वक जिकणारी रसभरित शब्दरचना करून ज्ञानदेवानें मराठीचा केलेला गौरव अभिमानानें उराशीं धरून आम जनतेला सांगावेंसें वाटतें कीं, " ही माझ्या मराठी मुलखाची भाषा ऐका. मग आज याहि घटकेला रसाळपणाच्या लोभानें कानाला जिभा फुटतील व शब्दांच्या योगानें इंद्रियांमध्यें भांडण लागेल व हा चमत्कार घडून आलेला दिसेल ! कारण ज्ञानदेव म्हणतो त्याप्रमाणें मराठीच्या अक्षरांच्या अस्वरपणाच्या मानानें पाहिलें असतां, सुस्वरांचे विविध प्रकार कमजोर होतील व अक्षरां आकर्षणानें सुवासाचं सामर्थ्यहि कमी होईल ! "

" वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व ।
रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्शु जैसा ॥ "

( अ. १८–४७

मराठी ग्रंथ ... अनुक्रम 39८3.6 वि: ... क्रमांक 23.120 नों. दि. ...

आपलें सर्व प्रकारचें लेखन पद्यामध्यें करणाऱ्या ज्ञानदेवानें सत्काव्याची दिलेली ही कल्पना ज्ञानदेवीला तंतोतंत लागू पडते आहे याची प्रचिती ज्ञान देवीच्या सहवासानें मला जेव्हां आली, तेव्हां काव्याच्या वेगवेगळ्या व्याख्या शोधायच्या भानगडींत गुंतलेलें माझें मन मीं त्या विषयांतून बाहेर काढून घेतलें, आणि अशा प्रकारचें काव्यलक्षण सांगितलेल्या ज्ञानदेवाचें काव्य वाचीत वेगवेगळ्या प्रकारच्या ज्ञानाची कल्पना पाठ करीत बसून राहिलें... आणि मग —

"आरिसा पाहों जातां कोडें । जैसे पाहातेंचि कां रिगे पुढें ।
तैसें ज्ञेय लोटोनि पडे । ज्ञाताचिजें ॥ "

सात्त्विक ज्ञानाच्या कल्पनेप्रमाणें या माझ्याजवळ सांठत चाललेल्या ज्ञानाचा मागोसा घ्यायची इच्छा माझ्या मनांत डोकावली. त्या वेळीं मात्र भगवान् श्रीकृष्णानें अर्जुनाशीं बोलतांना सांगितलेली पुढील कल्पना माझ्या डोक्यांत एकदम पुढें आली.

"सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ "

आणि मला क्षणभर जोरानं असं वाटलं कीं, सर्व धर्माचा त्याग करून मला एकट्याला शरण ये असं सांगणारे श्रीकृष्ण ज्ञानदेवाच्या रूपानं पुन्हा अवतरले तर नसतील ना? त्याखेरीज एवढं सुंदर काव्य ज्ञानदेव लिहिता ना!

पण मग माझं मलाच कळून चुकलं कीं, ज्ञानदेवी ही गीतेवरील टीका असली तरी तो एक स्वतंत्र ग्रंथ आहे. गीता ही येथें जणू निमित्तमात्र झाली आहे! आणि तिनं एक स्वतंत्र अशी वेगळी सृष्टि निर्माण केली आहे आणि मुख्य म्हणजे ज्ञानदेवाची टीका ही लोकांच्यामध्यें ज्ञानाचा प्रसार करावा व गीतेची ओळख त्यांना करून द्यावी म्हणून जन्माला आली आहे. तेव्हां 'आकाशांत चंद्राचा उदय झाला म्हणजे घरांतील चंद्रविलासिनी प्रफुल्लित झाल्या असतां ज्यांना तो अनुराग समजतो त्यांना गीता समजूं शकेल' असं मी कुठं तरी, केव्हां तरी, कुणाच्या तरी तोंडून ऐकल्याचं स्मरणांत आलं तशी किंचित् हसलें आणि पुटपुटलें कीं, "स्त्रियांच्या बाबतींत हें म्हणणं उलटं कसं मांडतां येईल?" पण हा विनोदाचा भाग सोडला तरी एक गोष्ट

खरी कीं, ज्ञानदेवीचें अस्तित्व हें अगदीं स्वतंत्र आहे एवढी तिची थोरवी सांगतां येईल. कारण गीतेवरील आपली टीका लिहितांना खुद्द ज्ञानदेवानेंच आपली भूमिका अशी स्पष्ट केली आहे कीं —

" श्रीगुरुकृपा काय नोहे । ज्ञानदेवो म्हणे ।।
यां कारणें मियां । श्रीगीतार्थ मऱ्हाठिया ।
केला लोका ययां । दिठीचा विषो ।।
परी मऱ्हाटे बोलरंगें । कवळितां पै गीतांगें ।
तैं गातयाचेनि पांगें । हें काडता नोहे ।।
म्हणोनि गीता गावो म्हणे । तैं गाणिवें होती लेणें ।
ना मोकळे तरी उणें । गीता ही आणीत ।।
सुंदर आंगीं लेणें न सूयें । तैं ती मोकळा शृंगारु होयें ।
ना लेइलें तरि आहे । तैसें के उचित ।।
कां मोतियांची जैसी जाती । सोनयाही मान देती ।
ना तरी मानविती । अंगेचि सडी ।।
नाना गुंफिली कां मोकळीं । उणीं न होती परिमळीं ।
वसंतागमींचीं वाटोळीं । मोगरीं जैसीं ।।
तैसा गणिवेनें मिरवी । गीतेवीण ही रंगु दावी ।
तो लाभाचा प्रबंधु ओंवी । केला मियां ।। "

( ओ. १७–३४–४१ )

ज्ञानदेवानं केवळ गुरुकृपेच्या आधारावर प्रकट केलेला केवढा दांडगा हा आत्मविश्वास ! त्यांचं म्हणणं असं कीं, " गुरुकृपा माझ्यावर असल्यानं मीं लोकांना समजेल असा स्पष्ट रीतीनं संस्कृतांतील गीतार्थ मराठींत आणला. संस्कृताची जोड नसेल व माझी नुसती टीका पाहून गीतार्थ समजून घेण्याचा कोणी प्रयत्न करील तर त्याला संस्कृत येत नाहीं या उणीवेमुळें गीतार्थ कळायचा राहील असें नाहीं. नुसती माझी टीका वाचूनहि त्याला गीतार्थ कळेल. म्हणून संस्कृत गीतेचा अर्थ सांगून माझी मराठी टीका जर सांगितली, तर संस्कृत गीतेवरून अर्थ सांगण्याला माझी मराठी टीका दागिना होईल; म्हणजे संस्कृतांतील अर्थ अधिक खुलवील. अथवा माझी नुसती मराठी टीका

जरी सांगितली तरी ती संस्कृत गीतेवरून अर्थ सांगण्यालाहि मागें टाकील. सुंदर अंगावर नाहीं घातला तरी तो नुसता दागिना शोभतोच. बरें, सुंदर अंगावर घातला तरी त्यापेक्षां अधिक चांगलें काय होणार आहे ? जशीं मोतीं सोन्यालाहि शोभिवंत करतात; पण मोकळीं असलीं तरी आपल्या अंगच्या सौंदर्यानें शोभिवंतच दिसतात. अथवा वसंत ऋतूच्या आरंभींचीं मोगरीचीं वाटोळीं फुलें गुंफलेलीं असोत वा मोकळीं असोत, वासाच्या दृष्टीनें त्यांत कांहीं कमीपणा नसतो. त्याचप्रमाणें संस्कृत गीतेसह माझी टीका सांगितली तरी गीतेला शोभा आणील अथवा गीता न सांगतां केवळ माझी मराठी टीकाच सांगितली तरी ती शोभा देणारच. असा दोन्ही प्रकारांनीं लाभ देणारा ओवीबद्ध ग्रंथ मी केला.

ज्ञानदेवीच्या सहवासांत असतांना तिच्या निर्मितीमागची ज्ञानदेवाची ही भूमिका लक्षांत आली म्हणजे वाटायला लागतं कीं, ज्ञानदेवाची आणि त्याच्या ज्ञानदेवीची खरी ओळखीची करून घ्यावयाची म्हणजे जणू उभ्या जन्माचं तें काम आहे! कारण जों जों ज्ञानदेवी पुन्हा पुन्हा वाचावी तों तों "नित्य नूतन देखिजे । गीतातत्त्व ।" असं जें ज्ञानदेवानं गीतेबद्दल म्हटलं आहे तें खरं म्हणजे ज्ञानदेवीलाच अधिक लागू पडेल असा अनुभव येऊं लागतो ! तिचा महिमाच तसा अगाध आहे. तिच्या संगतींत रोज नवं शिकायला मिळतं. तिची भाषा नित्य नवा प्रकाश दाखविते. तिचं अंतरंग सदोदित कांहींतरी नवी नवलाई दाखवितं...त्यामुळं हरघडी माझ्या मनांत विचार एकच येतो कीं, म्हणूनच तर माझी आई मला ज्ञानेश्वरी वाच असा नेहमी तगादा करीत नसेल ?

99438

# जुनी श्रद्धा

परवां मोठी गंमत झाली. माझ्याभोंवतीं नाना प्रकारचे आवाज घुमत होते. अंगणांत भोरड्या ओरडाव्यात त्याप्रमाणें चिमण्या मोठमोठ्यानं चिवचिवीत होत्या. दारावर टांगलेला पोपट येईल ते सारे शब्द जोरजोरानें घोकीत होता. ओसरीवरच्या मुलांनीं तोंडानें शिट्टी घालीत आणि बाजा व टाळ घेऊन सारी आळी गोळा केली होती. आणि अशा हैदोसधुल्ल्यांत एका खोलींत बसून एका म्हातारीचें जुनें गाणें जेव्हां मीं ध्वनिमुद्रित केलें आणि लगेच तें तिला वाजवूनहि दाखविलें, तेव्हां माझ्या हातून मोठी अद्‌भुत किमया घडली या भावनेनें त्या म्हातारीनें आलाबला घेऊन माझी माया केली. म्हणाली, " थांब बाई दिष्ट काढून टाकतें." आणि खरोखरच एखाद्या लहान मुलाची दृष्ट काढावी त्याप्रमाणें तिनें शेणीचा तुकडा, गुंतवळ, मीठ, मोहऱ्या, येसबंद मिरच्या असें काय काय आणून चांगली पांचदां तरी ही सारी मंडळी तिनं माझ्या तोंडावरून खालींवर करीत म्हटलें, " आल्याची, गेल्याची,...साऱ्यांच्या डोळ्यांत खाराकुट्टाची राख पडू बे ! "

त्या वेळीं मला भारी हसूं आलें. मी म्हणालें, "आतां मी का लहान म्हणून हा सोपस्कार ?" तशी म्हातारी म्हणाली, "ल्हान मोठ्याची गोष्ट नाही इथं. गुण लई केलं कीं दिष्ट होऊन दिली नसली पाइजे. दिष्ट झाल्याली लई वंगाळ. काय हुईल नि काय न्हाई ह्याचा नेम न्हाई बाई ! येळ सांगून न्हाई येत. म्हणून आपलं मनाच्या शांतीचं करून तवाच मोकळं व्हावं हें चांगलं. काय ? खरं का खोटं ?" आतां मात्र मी कांहींच बोललें नाहीं. फक्त मना-पासून हसलें आणि माझ्या कामाला लागलें. त्यामुळें ती म्हातारीच पुन्हा म्हणाली, "जुन्या मानसांचं पटलं न्हाई तरी त्यामागची भावना पारखावी मानसानं. अगदींच वंगाळ म्हणून सांदीला न्हाई टाकूं !" त्या कारणानें मला बोलणें भाग पडलें. म्हणून मीं म्हटलें, "तुमचं खरं आहे. माझी आई पण असंच करते नेहमीं." तेव्हां वरीक म्हातारी हसली. कौतुकली. आनंदानें उठली. तिनें तें दृष्टीचें सामान चुलींत नेऊन टाकलें. मला चुलीचा अंगारा आणून लावला. आणि मग ती चहा करून आणायला म्हणून सैंपाकघरांत निघून गेली.

माझ्यापुढून म्हातारी बाजूला झाली खरी. पण तिची भावना मात्र माझ्या-जवळच रेंगाळली. तिच्या या भोळ्या श्रद्धेनें मला जिंकलें. माझ्या मनांत विचार आला कीं, ही श्रद्धा महत्त्वाची नसली तरी दृष्टिआड करण्याजोगीहि नाहीं. तिच्यामागें वात्सल्यामुळें निर्माण होणाऱ्या भीतीची भावना आहे. गुणांचें कौतुक आहे. आणि त्या कौतुकाला बाध येऊं नये म्हणून भोळ्या भावनेनें परंपरागत चालत आलेलें निराकरणहि आहे. म्हणून मला वाटलें कीं, हा गुण घेण्यासारखा आहे. मग तो प्रकट करण्याचा मार्ग वेगळा असला तरी हरकत नाहीं. कारण प्रत्येक मानवी मनामध्यें ही भावना कमीजास्त प्रमाणांत का होईना, असल्याखेरीज ही दृष्ट काढायची चाल सगळीकडे फैला-वती ना !

अशा प्रकारची ही जुनी श्रद्धा केवळ दृष्ट काढण्यापुरतीच थांबत नाहीं. तिचा पसारा फार मोठा. तिचा प्रत्येक प्रकार वेगळा. तरी पण मनाची शांति ही त्यामागची भावना मात्र एकच असते.

मध्यंतरीं मी आमच्या आजोळीं गेलें होतें. ऐन मध्यरात्रीची वेळ. माझी मामेबहीण आणि मी घरगुती गोष्टी करीत बसलों होतों. आमचें गुज फारा

दिवसांच्या भेटीमुळें वाढतच होतें. दिव्याची वात वारंवार वर सरत होती. आमचें बोलणें संपत नव्हतें. चालूंच होतें. एखाद्या झऱ्यांतील पाणी भरून घ्यावें आणखी तरीहि तें संपूं नये तसें. तर काय गंमत झाली कीं, त्या वेळीं एकाएकीं पाल कुचकुचली. मला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. पण माझी मामेबहीण मात्र घाबरली. तिच्या मनांत शंका आली. तिनें मला विचारलें, "माझ्या शकीला कसं असेल ग ? " आणि मी कांहीं बोलायच्या आधींच पुन्हा एकवार तीच पाल कुचकुचल्यामुळें " कृष्ण ! कृष्ण ! " करीत तिनें मोठ्या आसुसलेल्या नजरेनें माझ्यावर नजर रोखली. तेव्हां मी तिला म्हणालें, "पालीचं काय घेऊन बसलीस ग एवढं ? ती आपल्या भाषेंत कांहीं बोलली असेल ! आपण कशाला तें लक्षांत घ्या उगाचच ! " पण तिला माझें बोलणें पटलें नाहीं. ती म्हणाली, " वाटेल तेव्हां पाल नाहीं बडबडत. पूर्वी दाखला आलाय् म्हणून म्हणतें. माझी पोर चांगली असूं दे. असें घडावें म्हणून मीं कृष्णदेवाचं नांव घेतलं. सगळ्या बायका असंच करतात. " मग मात्र मी गप्प राहिलें. कारण सगळ्या बायका खेड्यांत असेंच करतात हें मला माहीत होतें! आणि दुसरें असें कीं, आमच्या घरावरून मागें एकदा टिटवी ओरडत गेल्यावेळीं माझा चिमुकला भाऊ मरून गेला होता याचीहि मला आठवण झाली. माझें अंग एकदम शहारलें. त्या वेळीं टिटवीच्या ओरडण्यानें घाबरलेल्या आईला मी लक्ष देऊं नको म्हणालें होतें आणि विपरीत घडलें होतें म्हणून मीहि मलासुद्धां नकळत " कृष्ण ! कृष्ण " असें पुटपुटत तिची शकी बरी असेल असा आशावाद तिच्यापुढें व्यक्त केला. एवढेंच नव्हे तर पुन्हा कांहीं खटखट व्हायला नको म्हणून झोप आली नव्हती तरी तिला झोपायला सांगून मीं दिवा मालविला आणि मग स्वतःहि त्या पालीचा विचार करीत झोपून गेलें...

जुन्या श्रद्धेवर माझा विश्वास बळकट करणारीं अशीं कित्येक उदाहरणें आणि कितीतरी प्रसंग माझ्या आजवरच्या आयुष्यांत आले आहेत. मात्र त्या सगळ्यांनीं जोरानें उचल खाल्ली ती मुख्यतः मी खेडोपाडीं वावरेन त्या वेळींच. एरव्हीं अशा कल्पनांचा फारसा मागमूसहि शहरांत मला कधीं लागला नाहीं.

मागें एकदा अशीच मी ऐन दिवाळींत आमच्या आत्याकडे गेलेली त्या वेळीं रोज सकाळीं उठल्याबरोबर आमची आत्या आमच्या घराप्रमाणेंच आपल्या अंगणांतील तुळशीवृंदावनासमोर शेणाच्या गौळणी घालायची. आणि मुख्य

म्हणजे या गौळणींचा जामानिमा रोज निराळा ! कधीं पांच गौळणी एक-मेकींना चिकटून बसलेल्या, कधीं डोंगरावर चढणाऱ्या, कधीं बाजारांत धान्य विकत बसलेल्या, कधीं आडाचं पाणी काढीत उभ्या असलेल्या, कधीं सैंपाक करीत बसलेल्या तर कधीं दळत बसलेल्या, अशा माणसाच्या आयुष्यांतील सगळ्या हालचाली दर्शविणाऱ्या. शेवटच्या दिवशीं तर हा सगळा संसार एक-दम उभा राहिला. शिवाय त्यांत भर पडली ती बळीरामाची आणि द्रौपदीसह पांची पांडवांच्या आगमनाची. ही सगळी मांडामांड केली तेव्हां एखादें लहा-नगें, एका पेठेचें, गांव वसावें तसा प्रकार दिसला. आणि सारें उरकायला दोन तीन तास तब्बल लागले. म्हणून मी आत्याला सहज म्हणालें, " कुणी सांगितलं ग ऽऽ बाई ही खटपट करायला ? माझ्याच्यानी नाहीं व्हायची हं ! माझ्या राज्यांत हें मी बंद करीन बघ. " हें ऐकून आत्या माझ्यावर एवढ्या जोरानें खेकसली कीं, मी चांगलीच हादरलें..." आणि द्वाडवानी असंग कीं. सवाष्णीन असं नाही बोलू. खात्यापित्या, नांदत्या घराला ह्याशिवाय शोभा नसते..." आत्यानें माझ्यावर एवढाला एकेक डोळा करीत ही भाषा केली तेव्हां तर माझी पार बोबडी वळून गेली. आत्याचा राग एवढा मोठा झाला होता कीं, तिला उत्तर द्यायची मला हिंमत झाली नाहीं.

पण त्या रात्रीं तिनें जेव्हां समजुतीनें मला साऱ्या गोष्टी सांगितल्या तेव्हां मी उगाच तसें बोलल्याचा पस्तावा मला झाला. कारण ह्या सौभाग्याच्या भावने-मागें जुन्या काळच्या कथा चित्ररूपानें मांडून जुनी गोष्ट नव्या पिढीला सांग-ण्याची जी कल्पना होती ती फार अपूर्वाईची होती. पण हें मला समजलें फार उशिरां. माझी मलाच या अज्ञानाची लाज वाटली. आणि मग मी अंगणांत जाऊन नक्षत्रमाळाखालच्या चिमुकल्या मांडवांत बसलेल्या पांडवांना व द्रौपदीला चांगलें न्याहाळलें. खालीं रुंदावलेल्या पण वर निमुळत्या होऊन एका चकतीवर खुबीनें मान वळविलेला चिटकोबा ठेवलेल्या शेणाच्या पांडवांत बघण्यासारखें तसें कांहीं नव्हतें. पण त्यामागची भावना भव्य होती. कल्पना श्रेष्ठ होती. शेणाच्या या चित्रांनीं जुना इतिहास आपल्या परीनें उभा केला होता.

माझ्या मनावर ह्या भावनेनें चांगलाच परिणाम केला. त्या दिवशीं मी असल्या आणखी कितीक गोष्टी शोधीत बसून राहिलें. माझ्या आठवणींत

पहिल्यांदा नुकताच होऊन गेलेला दसरा आला. दरवर्षी माझी आजी देव्हाऱ्यांतल्या पत्रावळीवर काळी माती घालून व तींत धान्य पेरून त्याचे कोंब कां आणते व 'तसं करावंच लागतं' असें कां म्हणते याचा मला उलगडा झाला. धान्य पेरणें, धान्य शिजविण्यासाठीं विस्तव तयार करणें, धान्य शिजवून खाणें, शिकार जिंकून येणें, घरच्या बायकांच्याकडून विजयीश्रीबद्दल शाबासकी मिळवितांना त्यांना सोनेंनाणें भेटीदाखल देणें इत्यादि प्रकारचा जुना इतिहास आज पूजेच्या रूपानें पुन्हा स्मरणांत आणणें ही फार अभिनव गोष्ट आहे याची मला कल्पना आली. एवढेंच नव्हे तर लढाईला जाण्यासाठीं पूर्वी हत्यारें पाजळीत असत याची आठवण जवळच्या सर्व उपयोगाच्या साधनांना धुऊन व पुसून सजविण्यानें राखली जाते. ही गोष्टहि मला हृद्य वाटली. म्हणून पुढच्या दसऱ्याच्या वेळीं पूर्वजांच्या या पराक्रमाची पूजा करायची ठरवून मी आत्याकडे गेलें. निजतांना म्हणालें, " आत्या, तुम्ही मोठ्या बायका संक्रांतीला ववसा पूजतां तो ग कशाला ? "

त्यावर कौतुकानें माझ्याकडे पाहात तिनें सांगितलें, " एकमेकींना ववसायचं म्हणजे एकमेकींना नव्या धान्याची भेट द्यायची. " आणि मग नव्यानें घडविलेल्या बुडकुल्यांची व सुगडांची तारीफ करीत जुन्या काळच्या मडकें घडविणें व त्यावर सुंदर नक्षीकाम करणें या लोककलेची माहिती देतां देतां तिनें आपल्या शेतांत नव्यानेंच आलेल्या गहूं, हरभरा, भुईमूग, ऊस, पावटा, गाजर, वाटाणा, तीळ, गूळ इत्यादि सर्वांची नामावळ ऐकवून मला जुन्या काळीं कौरव-पांडवांच्या आया हत्तीवरील सोन्याच्या अंबारींत बसून घरोघरीं ववसायला जात असत ती गोष्ट गाण्याच्या रूपानें सांगितली. ती ऐकून मला नवल वाटलें. एकमेकींच्या सौभाग्याचा अभिमान एकमेकींच्याजवळ प्रकट करण्यासाठीं घरच्या नव्या धान्याची भेट देण्याची ही जुनी चाल मला भारी अभिनव वाटली. म्हणून मी त्या दिवशीं संक्रांतीच्या हलव्याची मनोमनीं तयारी करीत झोपीं गेलें...

पण गंमतीची गोष्ट ही कीं, अशा रीतीनें मी झोपीं गेलें तरी खरें म्हणजे मला नीट झोप लागत नाहीं. अर्धवट झोपेंत मी असलें कांहीं आठवीत असतें याचा सुगावा मला पडणाऱ्या स्वप्नावरून मला लागतो.

मधें एकदा तसेंच झालें. नागपंचमीचे दिवस होते. माझी कल्पना, एवढा मोठा वर्षाचा सण तेव्हां पोरी खेळायला म्हणून घर चक्क केलें पाहिजे. हेतु एवढाच कीं, आपल्या घराला सर्वांनीं वाखाणावें. म्हणून उठल्याबरोबर मी आमच्या गोठ्यांतील हिरवें शेण, चांगले चारपांच पोवट्या होईल एवढें घेऊन सोपा सारवयाला बसलें. पण तेवढ्यांत माझ्या ह्या हालचालीचा सुगावा आईला लागला. ती मोठ्या घाईनें धावत येऊन माझ्यावर ओरडली, " अग अग कार्टे ऽऽऽ हो मागं. आज सारवूं नाहीं ! वाईट कीं ग तें ! " आणि खसकन् माझ्या दंडाला धरून तिनें मला बाजूला ओढली. मला एकदम भेदरल्यासारखं झालें. आई असें कां करीत होती हेंच कळेना. आपली कावरी-बावरी होऊन तिच्याकडे बघतच राहिलें. तेव्हां कांहीं बोलायची छाती झाली नाहीं. जणू दांतखिळीच बसली होती ! चित्रासारखे डोळे तेवढे नाहीं म्हणायला हालत होते !

म्हणून मग अखेर आईच म्हणाली, " खरं तें सांगतेंय मी. नागाची पूजा म्हणजे वाडवडिलांची पूजा. घराण्याचा माणूस नाग होऊन संपत्ति राखतो. माणसं संभाळतो. तर मग नागाचा फणा दुखवावा कसा ? दळणं, कांडणं, सारवणं, लाटणं हें सारं बंद नगापंचमीला ! समजलं का ? " आणि मग तरीसुद्धां मी गप्पच राहिलेली बघून फणकाऱ्यानें निघून जात तिनें मला बोलून घेतलें, " अशी कशी कार्टी कुणाला माहीत. चाल-रीत कळत नाहीं वळत नाहीं. असलं पोर देवानं नसतं दिलं तरी छान होतं. अब्रु घालवायचीं लक्षणं मेलीचीं ! असा आडमुठेपणानं आईचं शिक्षण चव्हाट्यावर यायचं ! लोकं नांवं ठेवतील तीं मला. ही नामानिराळीच..."

आतां मात्र मला थोडें वाईट वाटलें. अशा गोष्टी मी मन लावून शिकत नाहीं म्हणून आईला कमीपणा येतो ही कल्पना मला अस्वस्थ करूं लागली. मला कसं अगदीं खुळ्यासारखं झालं.

त्यानंतर मग मात्र मी असलें शिकायचा सपाटा लावला. कुणी बाईमाणूस परगांवाहून आलें आणि त्याच्या पायावर पाणी ओतून शिळ्या भाकरीचा तुकडा त्यांच्यावरून ओवाळून टाकला तरी मला त्याचें कारण कळून घ्यावेसें वाटूं लागलें ! ...आणि मग एक दिवस जेव्हां आमच्या दादानें मला सांगितलें कीं, " हें पाणी ओतणें पायावरची धूळ घालवून टाकायला व भाकरीच्या

तुकड्याचें पाणी डोळ्यावरची धूळ जायला उपयोगी पडतें. तसेंच भाकरी टाकायची म्हणजे आल्या माणसाचें भले व्हावें म्हणून दाही दिशांना अन्नदान करावयाचें. " तेव्हां मात्र माझ्या डोक्यांत लख्ख काश पडला. आणि हीं जुनीं माणसें पिढ्यान्‌पिढ्या चालवलेल्या श्रद्धा कोणत्या हेतूनें जवळ बाळगतात हें लक्षांत आल्यामुळें तर त्यांच्या हुषारीनें माझ्या बुद्धीलादेखील माघार घ्यायला लावली !.....कारण हीं माणसें अशा कितीक भावनांना पोटच्या पोराप्रमाणें जवळ बाळगून असल्यानें त्यांच्या शहाणपणापुढें माझ्यासारखीचा रुबाब कुठला चालायला ? मी शिकलें होतें तें यापेक्षां फारच निराळें होतें आणि त्याचा पसारा पण एवढा ऐसपैस नव्हता !

• • •

# नव्या आयुष्यांत

लहानपणापासून माझ्या मागं मागं असलेल्या परीक्षेनं आपली मर्यादा संपली असं समजून माझा नाद सोडला आणि मी निवडणुकीच्या धांदलींत सामील झालें त्या वेळीं एका कल्पनेनं मला विलक्षण आनंद झाला. कितीक दिवस माझ्या शेजारच्या जागेवर बसून मला अभ्यास करतांना अडथळा आणणारी यमुना आतां माझ्या मार्गांत येणार नाहीं आणि मी निवान्तपणानं, कांहींहि करूं शकेन या उमेदीनं माझ्या जिवांत जीव आला. वाटलं, आतां आपण मनाला येईल तसं वागूं, हवं तें विनबोभाट करूं शकूं.

आणि त्याच उत्साहानं जेव्हां मी माझ्या पुढयांत चालून आलेल्या ' नव्या आयुष्यांत ' पाऊल टाकलं तेव्हां माझी खात्री पटून गेली कीं, आपणांला आतां खरंच मनासारखं वागतां येईल, कुणाची रखरख मागं लागणार नाहीं.

पण निवडणुकीच्या प्रचाराला गांवोगांव भटकायची, आपलं म्हणणं जनतेसमोर ठेवायची, मतदानाची कल्पना पटवून द्यायची, आणि माझ्या पक्षाच्या भलेपणाची बेरीज करायची जेव्हां वेळ आली तेव्हां कुणीसं कुजबुजलं, " भुईंतून आत्तां वर आली नाहीं तोंवर निवडणूक कशाला हिला ? आणि

एवढं करून हिला कळणार तरी काय त्यांतलं? बुकांतली भाषा निराळी. लोकांच्या मनांतली निराळी..." त्या वेळीं मात्र मनाला उगाचच चरकल्यासारखं झालं. अजूनहि आपल्या मार्गांतला ससेमिरा संपला नाहीं याची चुणूक लागल्यामुळं मी अस्वस्थ झालें. त्या घटकेला वाटलं, "असंच असेल तर आपण हा नाद सोडून द्यावा!..."

आतां माझ्या मार्गांत 'खो' घालून उठतां बसतां मला त्रास देणारं कोणी नको होतें म्हणून मी त्याच गोष्टीचा विचार करीत 'पुढं कसं कसं जमतंय बघूंया तरी' अशी मनाची समजूत घालून प्रचारासाठीं फिरूं लागलें. लोकांच्या मनाचा कौल काय लागतो हें समजून घेण्याच्या दृष्टीनें जो भेटेल त्याच्याशीं मनांतील विचार सांगत पुढं जाऊं लागलें...

अशीच एकदा मी एका लहानशा खेड्यांत बरोबरीच्या स्नेही मंडळींबरोबर दिवेलागणीचे वेळीं गेलें. तिथल्या पाटलांना आमच्यापैकीं एकजणानं बोलावलं. बिचारा थकला होता म्हणून तो आमच्याकडे चावडीवर यायचा ते आम्हीच त्याच्याकडे गेलों. आमची आपली समजूत कीं, बाई माणूस उभी राहिली आहे तेव्हां थोडं आगत स्वागत चांगलं होईल. पण तिथं जाऊन बघतों तों मताची भाषा आमच्या तोंडून निघायचा अवकाश कीं, तें चिमुकलं गांव मुठींत ठेवलेला तो म्हातारा डोळे चोळीत चोळीत आमच्यावर खेंकसला, "आमचं मत बैल जोडीला! बैल जोडीला!! बैल जोडीला!! किती डाव सांगावं बावानू! एकदा ठरलं तें ठरलं. लागा बगूं कसं आल्या वाटला!..." आणि वैतागून निघून गेला. हसावं का रडावं तें देखील मला कळेना. आश्चर्यानें एकमेकांकडे बघत आम्हीं ती जागा सोडली. आणि 'कमाल आहे!' म्हणत बाहेर लांब आल्यानंतर पोटभर हसलों. त्या वेळीं मी थोडी हिरमुसलें. तें बघून एकजण म्हणाला, "ही निवडणूक आहे. राजकारणाचा मामला असाच धकाधकीचा. आपल्याला मत देतो म्हणाला, बस्स! आपलं काम भागलं!" मला त्याचं हें बोलणं पटलं नाहीं. वाटलं, 'हा नुसत्या मतांचा प्रश्न नाहीं. त्या माणसानं थोडी आपुलकी दाखवायला हवी होती. अगदींच भिकाऱ्याला दान देऊन मोकळं होत तुझी कटकट नको म्हणून दारांतून हुसकावं तसं करायला नको होतं!...' माझ्या मनाला ही गोष्ट लागून राहिली. मीं तसं बोलूनहि दाखवलं. त्यामुळं माझ्याऐवजीं उभं राहण्यासाठीं धडपड केलेली

आमच्या बरोबर आलेली एक बाई म्हणाली, "तरी मी म्हणत होतें. तूं मागं घे आपलं नांव. माझा अर्ज कायम कर. देशभक्त आम्ही माणसं ! आम्हीं हाडाचीं काडं केलेलीं. तीस सालीं तुरुंगांत आम्ही गेलेलों. चळवळ केलेली ! तुझं काय..." त्यामुळें मी जास्तच गांगरून गेलें आणि स्वतःलाच विचारलं, "आजवर तूं कांहीं केलंस का असं या माणसारखं !"

त्या वेळीं मला वर्गांतली एक आठवण झाली आणि मीं माझं मलाच उत्तर दिलं, "होय. केलं आहे. जरूर केलं आहे."

यमुनानं मला एकदा असाच प्रश्न विचारला होता. त्या वेळीं मी तिला म्हणालें होतें, "तुझ्यासारखी मी तुरुंगांत जायला धडपडलें नव्हतें. पण एका माणसाच्या आयुष्यांतली अखेरची इच्छा पुरी केली होती..." या पलीकडे मीं तिला उत्तर दिलं नव्हतं. पण माझ्या नजरेसमोर तो प्रसंग उभा राहिला होता...

...हसतमुखानं देशाच्या स्वातंत्र्यासाठीं परक्या लोकांनीं सोडलेली गोळी छातीवर झेललेल्या एका तरुणाला तो खालीं कोसळतांना हातांतील निशाण दुसऱ्याच्या हातीं देऊन मीं सांवरलं होतं. चारचौघांच्या मदतीनं घरीं आणलं होतं. आणि कारंज्यांतून पाणी उडावं त्याप्रमाणं त्याच्या जखमेंतून उडणारं रक्त हाताच्या पंजानं खालीं बसवीत मीं त्याला हवं असलेलं अखेरचं पाणी पाजून त्याच्या इच्छेनुसार 'वंदे मातरम' म्हणण्याची त्याच्यांत ताकद येऊं दिली होती ! ...

आतां त्या घटनेला देखील अशाच एका प्रसंगाची एक आठवण माझ्या मनांत घोळूं लागली होती. आणि मी टक लावून कुठंतरी पाहात स्वःतशींच पुटपुटत होतें...

...त्या वेळीं मी परीक्षेसाठीं मुंबईला चाललें होतें. एका आगगाडीच्या मोठ्या डब्यांत एकटीच बसलेली मी ! सोबत काय ती हातांतल्या पुस्तकांची. त्यामुळं शांततादेखील वाजवीपेक्षां जास्त जाणवल्यानं मी बेचैन झालें. वाटलं घटकाभर तरी कुणीतरी येऊं दे, आणि बोलाफुलाला गांठ पडावी तसं झालं. एका बारीकशा दिसणाऱ्या गाडीच्या खिडकीजवळच्या भोकाला मोठा मोठा आकार येत चालला! हळूहळू कुणीतरी माणसासारखंच पण मुंगीएवढं पुढं येत

चाललं...मी बघूं लागलें. टक लावून माझी नजर त्या जागेवर खिळवली. पाहतें तों हळहळू मोठा आकार घेत चाललेले सुभाषबाबू माझ्याजवळ येत होते ! ... माझा आनंद मनांत मावेना. मी उठलें. थाटानं त्यांना अभिवादन केलं. त्याचा स्वीकार करून मला त्यांनीं प्रश्न केला, " कुठं निघालांत ? "

" मुंबईला. परीक्षेसाठीं. " मीं खरं होतं तें उत्तर दिलं.

" परीक्षा ? पुस्तक वाचून परीक्षा देण्याची ही वेळ नाहीं! माणसांचीं मनं वाचून देशाला हवी ती परीक्षा पास व्हा आतां ! आज देशाला अशा अभ्यासू विद्यार्थ्यांची गरज आहे ! ..." सुभाषबाबूंनीं मला स्पष्ट शब्दांत अशी जाणीव करून दिली असेल नसेल इतक्यांत पोलिसांना सुगावा लागल्याचा आवाज आला. माझं काळीज दडपून गेलं. सुभाषबाबूंचे पंचप्राण शाबूत ठेवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असं मनानं घेतलं. म्हणन मी कांहीं निर्वाणीचं बोलणार इतक्यांत सुभाषबाबूंनीं मूठ गच्च धरून कांहीं फेकल्यासारखं केलं आणि सगळीकडे चक्री वादळानं हैदोस घातला ! ...ते चुटकीसरशी दिसेनासे झाले ! पोलिसांच्या हातांवर तुरी देऊन ते नाहींसे झाले...

आणि मग कुठल्यातरी मोठ्या आवाजान दचकून जाग यावी तशी मी खाड्दिशी जागी झालें. ... स्वप्नांत बघितलेल्या या घटनेचा विचार करूं लागलें. ... आणि मग माझी मीच बोलून गेलें, " मी तीहि परीक्षा पास होण्याची शिकस्त करीन. "

पण अशा गोष्टींची हेटाळणी करून यमुना मला नेहमीं म्हणे, " हं ! असं स्वप्नांतलं जमेंत धरलं तर मग काय ? " आणि मग अभ्यासावरचं लक्ष उडून ह्यावरच आम्ही गप्पा करीत असूं.

नव्हे मीं अभ्यास न करतां अशा गोष्टींतच वेळ घालवावा अशी तिची तीव्र इच्छा असल्यानं माझा वेळ यांतच फार जात असे !

त्यामुळं आतां कांहीं तसं व्हायला नको म्हणून मुरडकानोसा खात मी गप्प राहिलें आणि आमचा प्रवास सुरू झाला.

अशाच भावनांना धक्के देणाऱ्या गोष्टींना तोंड देऊन मी निवडणूक अखेरीस जिंकली आणि समाधानाचा सुस्कारा टाकला, " आतां तरी कोणी माझ्या वाटेला येणार नाहीं ! "

परंतु कधीं कधीं देवालादेखील आपलं बघवू नये असं होतं म्हणतात तें माझ्याहि वांटचाला आल्याखेरीज राहिलं नाहीं. इतकंच नव्हे तर त्यानं माझी अशी पाठ धरलीय कीं मला माझा जीव नकोसा झाला आहे.

सभागृहामध्यें आम्ही जेव्हां निवडून आलेली मंडळी भारताच्या घटनेशीं एकनिष्ठ राहण्याची शपथ घेऊन एकत्र आलों त्या वेळीं स्त्रियांसाठीं राखीव ठेवलेल्या एका जागेवर मी जाऊन बसलें. त्या वेळीं दुसरीहि माझ्यासारखीच निवडून आलेली एक बाई माझ्याशेजारीं येऊन बसत म्हणाली, " आपलं नांव ? आपलं गांव ? " मला वाटलं माहितीसाठीं नवीन ओळखी होईपर्यंत असंच सांगावं लागणार म्हणून विधानसभेच्या मी बसलेल्या साऱ्या सभागृहा-कडे नजर टाकीत मी सारं सांगून मोकळी झालें. माझी कल्पना तेवढ्यावर तें विचारणं आणि सांगणं संपलं. म्हणून मी सभागृहांतील कामकाजाकडे नीट लक्ष देऊन कांहीं अभ्यास करण्याच्या इराद्यानं नीट बसून समोर पाहिलं. तेवढ्यांत त्या बाईंनीं पुन्हा मला विचारलं, " आपल्या घरीं कोण कोण आहे ? "

मला आतां राग आला. नुसत्या पहिल्या गांठीभेटीवर पुरती ओळखहि व्हायच्या आधीं ही कसली उठाठेव ? पण बोलूं कशी ? नुसती तिच्याकडे बघून गप्प राहिलें. मला वाटलं मी गप्प राहिलें कीं तीहि गप्प राहील. पण नाहीं. मी गप्प बसलेली बघून तिनं पुन्हा प्रश्न केला, " कां? बोलायला आवडत नाहीं वाटतं ?" तरीहि मी गप्प राहिलें. वाटलं आतां तरी ती कांहीं विचा-रणार नाहीं. परंतु तिनं माझा सूड उगवावा त्याप्रमाणं प्रश्नांची सरबत्ती माझ्यावर सोडली. "सासरीं असतां कीं माहेरीं? ... शिक्षण किती झालं ? ... कुठं झालं ? ...कसली पदवी मिळाली ? ...हिंदी बोलतां येतं का? ...तुमच्या भागांतला तुमचा काय अनुभव? ...किती लोक विरोधी उमेदवार होते ? ..."

आतां मात्र मला विलक्षण चीड येऊन मीं तिच्याकडे रागानं बघितलं तेव्हां मला चिमटून ती म्हणाली, " बघतां काय ? चला बाहेर. चहा घेऊं या, इथं काय बसायचं ? उठा उठा ! चला म्हणतें ना ! " आणि एकदम उठून सभापतींना नमस्कार करीत ती चालायला लागली. मी तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत ' सुटलें एकदाची ! ' असा स्वतःला निर्वाळा देऊन नीट बसलें आणि कुणीससं बोलत होतं तिकडे कान दिला....

पण रोज बघावं तर पुन्हा आपलं तेंच! मला त्या शेजारीं बसलेल्या बाईची अशीच कटकट झाल्यामुळं एक दिवस मी पुटपुटलें, " यमुना परवडली, पण ही नको ! ती अभ्यासांतलं विचारून नाहींतर इकडचं तिकडचं पुटपुटून तरी भागवायची. पण हें वेगळंच ! ... आणि अगदीं मागच्या जागेवर जाऊन बसलें....माझी समजूत इथें तरी आपण निवांत बसूं. पण नाहीं. तिथंहि ती बाई शेजारीं येऊन बसली तशी मी चटकन् ग्रंथालयांत जाऊन वाचीत बसलें.

तिथं जाऊन पांच मिनिटं झालीं असतील नसतील इतक्यांत मला गांठून तिनं म्हटलं, " चहा घेऊं या चला ! "

तेव्हां मात्र माझ्या सहनशक्तीला विलक्षण ताण बसला. सारी भाडभीड विसरून मी म्हणालें, " मी येत नाहीं. आपण जाऊं शकतां. " त्यावर ती एवढ्या मोठ्यांदा हसली कीं, माझ्या आजूबाजूला बसलेल्या वाचकांचं लक्ष समोरच्या कागदावरून उडालं आणि सर्वांच्या नजरा आमच्यावर खिळल्या! त्यामुळं मी मुकाट्यानं ' जास्त शोभा नको ' या भावनेनं चहा प्यायला तिच्याबरोबर गेलें आणि चटकन् चहा घेऊन रिकामं व्हावं म्हणून स्वतःच दोन कप चहा मागवून मोकळी झालें ......

असं एकदा नव्हे अनेकदा झालं आहे. मला कांहीं करूं द्यायचं नाहीं असा यमुनासारखा याहि बाईचा डाव असावा ! आणि त्यांना न जुमानतां आपली धडपड कायम ठेवून पुढं सरायचं असा माझाहि स्वभाव बनत चालला असावा कीं काय कुणाला माहीत !

कारण परवां एकदा सभागृहांत असंच माझं एका बिलावर भाषण झालं. त्या वेळीं ह्या बाईनीं मीं विचारलं नसतांना एकदम माझ्या हातांत चिठी दिली, " तुमचं भाषण अगदींच वाईट झालं ! " त्या घटकेला मी आपली गप्प राहिलें. कशाला वाद घालूं उगाच ? आणि मग ठरवलं कीं, आपण तिला दाद न देतां इतरांच्या भाषणांचीं कांहीं टिपणं घेत राहायचं.

शेवटीं सभागृहांत आल्याबरोबर जेव्हां मीं असा टिपणं घेण्याचा सपाटा लावला, तेव्हां माझी लेखणी कागदाला लागायच्या आधींच ' बघूं बघूं ' करीत तिनं पुन्हा मला त्रास द्यायला सुरुवात केली !

आतां मात्र माझं डोकं फिरायची वेळ आली ! मीं सरळ त्या बाईला विचारलं, " मला तुमचा असा छळवाद कां ? "

त्यावर आमच्या शेजारच्या दुसऱ्या एका बाईकडे बोट करून त्यांनीं उत्तर दिलं, " ह्यांनीं मला तुमची थोरवी सांगितली. मला तुम्ही आवडतां ! त्यामुळें वाटतं तुमच्याशीं खूप बोलावं. तुम्हांला काम करूं न देतां आपल्याशींच बोलत ठेवावं ! . . . आणि काय हो, तुम्ही कधीं झेंडावंदनाला गेलां होतां ? "

आतां काय सांगूं कपाळ ? झेंडावंदन इतरांसारखं मीं अनुभवलं नव्हतं तर राष्ट्रपित्याच्या सहवासांत अनुभवलं होतं हें का हिला सांगूं मी ? आणि सांगून उपयोग तरी काय ? गांधीजींच्या सहवासांत मी कांहीं दिवस होतें एवढं देखील तिला चार तास गप्पा करायला पुरेल, म्हणून मीं मनाला थोपवलं आणि कांहीं न बोलतां गप्प राहिलें ! . . .

इतक्यांत शिपायानं माझेकडे कुणीतरी आलं आहे अशी चिठ्ठी मला आणून दिली. दुधांत साखर पडावी तसं झालं म्हणून मी चटकन् सभागृहामधून बाहेर आलें. पाहतें तों माझ्या मागोमाग येत त्या बाईनीं मला सांगितलं, " सरळ येईनात तुम्ही बाहेर म्हणून दुसरं नांव देऊन ही युक्ति केली मीं ! . . " आणि त्या हसायला लागल्या.

हें ऐकून मला असा संताप आला कीं, मीं मन आवरलं नसतं तर चारचौघांत काय केलं असतं कुणाला माहीत ! . . . पण स्वतःचा आब राखावा म्हणून सारं मुकाट्यानं गिळून आंत जावं या भावनेनं मी माघारीं वळलें आणि माझ्या जुन्या ओळखींतल्या एका सभासदांच्या शेजारीं जाऊन बसलें. इतक्यांत शिपायानं आणखी एक चिठ्ठी आणून दिली ! आतां कोण आलंय् आणखी ? असं पुटपुटत उघडून पाहतें तों आंत त्या बाईचंच हस्ताक्षर आणि मजकूर असा—

" तुमची बाळपणची मैत्रीण यमुना–माझी मावस बहीण–परवां मला तिनं तुमच्या व तिच्या मैत्रीची ओळख दिली ! . . . ती बाहेर आली आहे. आपण चहाला यावें ! . . पुरुषांचे जागेवर उगाच बसू नये. वाईट दिसतें, तरी लौकर यावें. वाट पाहतें. . . . "

• • •

# समाज-चित्रें

गेल्या एप्रिलमधील गोष्ट. सकाळचे नऊ वाजले असतील. मी अभ्यास करीत बसलें होतें, तर त्या वेळीं अचानक एक वयोवृद्ध गृहस्थ मजकडे आले. मोठे समाजसेवक होते. कधीं नव्हे ते घरीं कसे आले ? मला नवल वाटलें. प्रचारासाठीं चला म्हणून आले असतील असा मीं तर्क केला. ते आले तशी गडबडीनें सामोरी गेलें. आगतस्वागत झालें. घरांत 'या' म्हटलें. ते आले. एखाद्या मिनिट दोन मिनिटांचा काळ तसाच गेला. वय झालेलें, तेव्हां जिना चढून त्रास झाला असेल असें वाटलें. नंतर आमचें बोलणें झालें. त्या गृहस्थांनीं मला प्रश्न केला, "आतां तुमचं कसं होणार ?"

मला या प्रश्नाचा रोख समजला नाहीं. मी त्यांच्याकडे पाहातच राहिलें. तसा त्यांनीं खुलासा केला. म्हणाले, "आमदार होतां, पगार मिळत होता. आतां इलेक्शनला उभ्या राहिलां नाहींत. म्हणजे हें गेलं. आतां भागणार कसं ?" माझ्या डोक्यांत एकदम लख्ख प्रकाश पडला. मी चटकन् बोलून गेलें, "तुम्हांला त्याची काळजी नको. माझं मीं पाहून घेईन." त्यानंतर ते कांहीं बोलले नाहींत. निघून गेले. मला वाईट वाटलें, कधीं नव्हे तें यायचें

तर ही काय चौकशी ? म्हणजे हा नाउमेद करायचा मार्ग, कीं पाठिंबा व्यक्त करून सहानुभूति दाखवायचा प्रकार, माझ्या कांहीं लक्षांत येईना ! त्यामुळें मी बराच वेळ विचार करीत बसलें. पण नक्की उत्तर मला मिळालें नाहीं. एवढें मात्र वाटलें कीं, स्वतःला पुढारी मानणारांनीं असें वागूं नये ! इतरांना उत्तेजन देऊन, पाठिंबा देऊन, कामाचा विकास करण्याची त्यांच्यावर जबाबदारी असते.

♥

त्या गोष्टीला आतां दीड वर्ष झालं असेल. रेडिओवर मीं कांहीं लोकगीतं गाइलीं होतीं. कार्यक्रम झाला त्याचा तो दुसरा दिवस होता. संध्याकाळची वेळ. एक फार मोठे म्हातारे पंडित टांग्यांतून घरीं आले. फार थकलेले होते. तर आले ते गळा दाटलेला. तोंडांतून शब्द फुटायची मारामार. डोळ्यांतून पाणी सांडलेलं. मी घाबरलें. काय झालं नि काय नाहीं ? कांहींच कळेना. धावत पळत घरांत शिरलें. वडिलांना घाईघाईनं बोलावलं.

पण मग गंमत झाली. त्या गृहस्थांनीं एकदम हसरं तोंड केलं. वडिलांना आलिंगन दिलं. माझ्या पाठीवरून हात फिरवला. उपरण्यानं डोळे टिपले, आणि माझं तोंड भरून कौतुक करीत त्यांनीं बोलून दाखविलं, " मुलीचा कार्यक्रम एकदम आवडला. वा ! सुंदर ! झक्क ! आपण खूष आहोंत· शाबास ! "

माझं अभिनंदन करायच्या या गृहस्थांच्या या प्रकारानं मला आश्चर्य वाटलं. पण मी झालं गेलं विसरलें. कुणीतरी आपलं एवढ्या अगत्यानं कौतुक केलं याच नादांत गुंगून गेलें. आणि मोठ्या उमेदीनं लोकगीतांचा—गायनाचा—अभ्यास करायचा निश्चय केला.

♥

मला वाटतं गेल्या आश्विनांतली ही गोष्ट असावी. हो, आश्विनांतलीच. दुपारचे अडीच वाजले असतील. वाचतां वाचतां माझा डोळा लागलेला. झोप लागली केव्हां कळलं नाहीं. मला कुणी उठवलंहि नाहीं. तर मी अशी झोपेंत असतांनाच एकाएकीं दारावरची घंटी जोरानें वाजली. तशी मी दचकून उठलें· एकदम उभी राहिलें. आणि आतां कोण आलंय् बघावं म्हणून बाहेर जाणार एवढ्यांत एक ओळखीच्या बाई मी झोपलें होतें तिथं आल्या ! त्यांना घेऊन

मी बाहेर आलें. " या बसा. या वेळीं कुणीकडे दुपारचीच वाट चुकली ?" म्हणाले. त्यांच्या महिला मंडळाची चौकशी केली. कामाबद्दल बोलणं झालं. मग त्या म्हणाल्या, " तुम्ही व्हिजिटला कधीं येणार ? आम्हांला निदान निदान तरी दोन हजार रुपये हवेत बघा, तेवढे मिळवून द्या." तशी मीं त्यांना समाज कल्याण समितीच्या कामाची माहिती दिली. समजावून सांगितलं आणि शेवटीं पैशाचाच प्रश्न होता तेव्हां खरं तें सांगून टाकलं, " आतां मी त्या समितीवर नाहीं !" तर काय आश्चर्य बघा ! माझं बोलणं संपलं त्या घटकेला त्या बाई उठल्या आणि ' बराय तर ! ' असें म्हणून तडकाफडकीं निघून गेल्या !!

मी तोंडांत बोट घालून बसलें ! हा काय प्रकार आहे ? माझा मलाच मीं प्रश्न केला. कारण एरव्हीं या ना त्या कामाच्या निमित्तानं छप्पनदा माझ्याकडे येऊन काम होण्यासाठीं निकड लावलेली ही बाई अशी गेलीच कशी एकदम ?

पण घडल्या गोष्टीच्या तर्कानं येणाऱ्या उत्तराला अर्थ नव्हता, म्हणून केवळ मनाच्या समाधानासाठीं मी गॅलरींत जाऊन उभी राहिलें. त्या बाईंना रस्त्यानं जातांना पाठमोरें पाहिलं आणि ' काय जग आहे हें ?' असें स्वतःलाच विचारीत बराच वेळ रस्त्यानं येणाऱ्याजाण्याऱ्यांच्याकडे पाहात राहिलें.

♥

एकदा मी आणि माझ्या ओळखीच्या दोघीजणी अशा मुंबईच्या एका हॉटेलमध्यें राहात होतों. कांहीं कामानिमित्त आठ दिवस आमचा मुंबईंत मुक्काम होता. तर हॉटेलांत होणारा रोजचा जेवणा-राहण्याखेरीजचा इतर खर्च लगोलग न देतां एकदम देऊन टाकूं म्हणून आम्हीं मॅनेजरला सांगितलेलं. तर आम्ही यायच्या आदल्या किंवा त्याच्या आदल्या दिवशींची गोष्ट. भल्या पहाटे त्या दोघीजणींपैकीं एकजणीचा नवरा दिल्लीहून आला. तेव्हां आम्ही दोघींनीं लवकर स्नान आटोपून फिरायला म्हणून बाहेर जायचं ठरवलं, आणि ठरल्याप्रमाणें खरोखरच निघूनहि गेलों.

त्या दिवशीं इकडे जा तिकडे जा असं करीत खोलीवर ज्या आम्ही आलों त्या चांगल्या बारा वाजून गेल्यावर ! आणि बघतोंय् तर दाराला कुलूप ! म्हटलं दोघेजण गेले असतील कुठंतरी. म्हणन मॅनेजरकडून किल्ली आणा-

यला म्हणून कचेरींत गेलों, तर काय ? हीं नवराबायको सरळ पुण्याला निघून गेलेलीं दहाच्या गाडीनं ! आणि एकहि बिल भागवलेलं नाहीं !! एवढंच नव्हे तर दोघांनीं मिळून घेतलेल्या दुधाचे तरी पैसे द्यावेत कीं नाहीं? नाहीं वा दिले !

मग काय ? हॉटेल सोडतांना झक मारीत राहिलेल्या आम्ही दोघींनीं धोब्याचे, दुधाचे, फळांचे असे कसले कसले खर्च झाले होते ते पैसे व तिचंहि हॉटेलचं बिल भरलं ! करणार काय मग ? लोकांपुढें तिच्याबद्दल बोलून आपलीच अब्रू जायची नाहीं का? बसलों गप्प. जणू कांहीं कांहींच घडलं नाहीं अशा तऱ्हेनं तिथं एक दिवस राहिलों व निघून आलों. जवळ पैसे होते म्हणून ठीक, नाहींतर केवढी फजिती !

♥

आमच्या एका शेजारणीचं सांगतें. तिचं कधीं कुणाशीं पटत नाहीं. ती आपण होऊन कुणाकडे बोलायला जात नाहीं. आणि तिचा स्वभाव तुसडा म्हणून तिच्याकडेहि सहसा कुणी फिरकत नाहीं. पण गंमतीची गोष्ट अशी कीं, आमच्या आळींत प्रत्येक घरांत तिच्याबद्दल चर्चा चालते ! आणि ती देखील रोज !!

ही बाई आहेच तशी. चार मुलांची आई. पण राहते कशी पंधरासोळा वर्षांच्या पोरीसारखी. अल्लडपणा तर आहेच. पण नखरा भारी करते. रोज कुंकू निराळ्या प्रकारचं, वेगळ्या रंगाचं लावते. पोषाखदेखील प्रत्येक प्रांताचा असा दररोज वेगळा वेगळा करते. म्हणजे कधीं पंजाबी, कधीं मद्रासी, कधीं बंगाली, कधीं काश्मिरी; कधीं नऊवारी, कधीं पांचवारी वगैरे असा मनाला येईल तसा हं ! आणि केसांना वळणं तरी अशीं निरनिराळीं देते कीं, बघणारानं थक्क व्हावं ! सिनेमांत फॅशन नसेल ती तिच्याजवळ आहे ! उभ्या जगाचे सारे प्रकार हिला जसे तोंडपाठ ! शिवाय ओठाला लिप्स्टिक लावते, डोळ्यांत काजळ घालते, विडा खाते हें निराळंच बरं का ?

त्यामुळें तिला कुणी दारावरून जातांना पाहिलं कीं, झालीच सर्वांची बडबड सुरू ! एकानं बोलायचा अवकाश दुसऱ्याला बोलणं सुचलंच अगदीं !

पण ती बिचारी कुणालाच दाद देत नाहीं. अगदीं ताठ मानेनं, ठेक्यांत येईल जाईल. आपल्याच तोऱ्यांत राहील. कुणाची पर्वा नाहीं. फिकी र

नाहीं. पण मी म्हणतें, नवरा बावळटासारखा, पोरं अजागळ, असा घरांत थाट आणि ही एकटीच अशी रुबाबांत कां ? स्वत: ठाकठीक राहायचं तर घरहि तसं राखावं कीं ! पोरं अगदीं मेंगळीं, नवरा खालीं मान घातलेला, आणि हीच तेवढी अशी ?

रोज आम्ही उलटसुलट बाजूंनीं तिच्याबद्दल विचार करतों. पण कधीं कुणाला तिचं कोडं उमगत नाहीं. तिचं सारंच जगावेगळं. माणसांत जशी ती नाहींच ! कारण तिच्या घरीं बाहेरचीं तर राहोच, पण नात्यागोत्याचींहि माणसं कधीं आलेलीं दिसत नाहींत आणि ती पण कुठं गेलेली कानावर येत नाहीं !

♠

परवांच्या सार्वजनिक निवडणुकीच्या वेळचा प्रसंग. एक दिवस संध्याकाळीं आम्ही एका गल्लींत प्रचार करीत फिरत होतों. बरोबर चारदोन कार्यकर्ते होते. एकदोघीजणी स्त्रियाहि होत्या. तर एका घरांत आगाऊ कळविल्याप्रमाणं आम्ही गेलों. तिथं गप्पा झाल्या. माहिती विचारून झाली. ओळखीचं घर म्हणून चहापाणी झालं आणि शेजारीं आम्ही येतोंय् म्हणून निरोप धाडला. 'या,' म्हणून उत्तर आलं. तशी पांचदहा मिनिटांनींच आम्ही तिकडे गेलों. बघतोंय् तर काय ? त्या घराच्या दाराला मापट्याच्या तोंडाएवढं कुलूप ! सगळीं दारं खिडक्या बंद ! ! झालं काय ? गेलीं कुठं हीं माणसं ? चौकशी केली, पण दाद लागली नाहीं.

अखेर शेवटीं तासभर त्याच आळींत दुसरीकडे प्रचार करीत फिरून आम्ही माघारीं निघालों तों तीं माणसं वाटेंत दिसलीं. आम्ही स्वाभाविकच त्यांना सामोरे गेलों आणि काय आश्चर्य बघा ! त्या माणसांनीं एवढाला एकेक डोळा आमच्यावर केला आणि 'हं !' 'हूं !' अशीं उत्तरं देत आमच्या पुढून सटकायची अशी शिताफी केली कीं विचारूंच नये !

मी म्हणतें 'नाहीं' म्हणून सांगावं कीं स्पष्ट ह्या अशा वागण्यापेक्षां! माणुसकी सोडून तिरसटासारखं काय हें ? ह्यांना कुणी काय उचलून द्या म्हणून देणगी का मागायला गेलं होतं ? साधं आल्या माणसाला भेटायची तयारी नाहीं ? मग माणसांत राहण्यापेक्षां निर्जन जंगलांतच कां नाहीं राहूं अशांनीं?

♥

गेल्या महिन्यांतील गोष्ट. पुण्याच्या तुळशीबागेंत मी आमच्या छोटचा राणीला घेऊन गेलेली आणि एका बांगड्यांच्या दुकानांत तिच्या पसंतीनं बांगड्या पाहात उभी असलेली. तर तितक्यांत चारसहाजणी एकदम त्या दुकानांत आल्या. त्यांतल्या दोघी ओळखीच्या निघाल्या. बाकीच्यांशीं ओळखपाळख झाली.

होतां होतां बांगड्या घेऊन मी निघालें तशी ओळखीची एकजण दुसरीकडे पाहात खेकसली, "ह्यांना कांहीं अक्कल आहे का विचारा ? अगदीं 'ढ' आहेत. मीटिंगमध्यें तोंड उघडतील तर शपथ ! खालीं मान घालून बसायचं हें काय ?" तशी मी थांबलें. मला ह्या बोलण्याचा संदर्भ कळेना, म्हणून जिला उद्देशून हें बोलणें होतं तिच्याकडे मीं पाहिलं, तों काय ? ती बिचारी ओशाळून गेली होती. खालीं मान घालून उसासा टाकीत होती. विचारूं कुणाला खरंखोटं ? म्हटलं असूं द्या. हसायचं सोंग केलं. त्या बाईंना घरीं या म्हणालें आणि निघून आलें. मग काय करणार ?

पण रस्त्यानं सारखा जीव चुटपुटत होता. असं एखाद्या दुकानांत चारचौघांच्या समोर, अनोळखी ठिकाणीं कुणीं कुणाला टाकून बोलूं नये असं वाटत होतं. त्यामुळं झाली चूक त्या बाईंना सांगायची असं मनाशीं ठरवलं आणि घरीं आलें. परंतु त्या बाईंचा स्वभाव असा होता कीं, कुणाचं ऐकायचंच नाहीं ! त्यांना वाटतं आपणच काय त्या सगळ्यांत शहाण्या आहोंत ! तेव्हां ह्या बाईशीं बोलून तरी काय उपयोग ? वाईटपणाच घ्यायचा कीं नाहीं पदरांत ? त्यापेक्षां गप्प राहिलेलं काय वाईट ? पण तेंहि मनाला पटत नाहीं. असं पुन्हा होऊं नये असं वाटतं. तेव्हां त्या बाई भेटतील तेव्हां बघूं या काय काय होतं तें ! एकदा बोलून तर टाकूं. मग काय होईल तें होईल, असं ठरवलं.

♥

आपल्याशीं कुणी कसंहि वागलं तरी आपण दुसऱ्याशीं नीट वागावं, आपली माणुसकी सोडूं नये असं मला वाटतं. त्यामुळं कधीं कधीं पश्चात्तापाचीहि पाळी माझ्यावर येते. आणि असं अनेकदा होऊनहि माझा स्वभाव जात नाहीं.

परवां एकदा असंच झालं. माझ्याशीं छत्तीसच्या आंकड्याप्रमाणं उगाचच वैर धरून वागणारी आणि मला मागं कसं खेचतां येईल हें पाहणारी बाई अपघातांत सांपडली असं कुणींतरी मला सांगितलं, म्हणून स्वाभाविकच मीं चौकशी केली. गोष्ट खरी असल्याचं कळलं, आणि त्या बाई आतां अंथरुणावर आहेत अशी बातमी आली.

झालं! माणुसकी म्हणून मी सगळं हातांतलं काम सोडून त्या बाईंना बघावं म्हणून गेलें! पाहातेंय् तर काय? त्या बाई खुशाल गांवाला निघून गेलेल्या! म्हणजे आहे तरी काय भानगड ही? मीं खुलासा करून घ्यावा म्हजून त्या बाईच्या मुलांना विचारलं.

तशी कळलं काय सांगूं! मीं आपण होऊन त्या बाईच्या घरीं यावं यासाठीं कारस्थान रचून कुणींतरी हा चावटपणा केला असावा. असा राग आला! पण करतेंय् काय? मुकाट्यानें घरीं निघून आलें आणि त्या बाईंचं पुन्हा तोंड पाहायचं नाहीं असा निश्चय केला.

तेवढ्यांत गंमत अशी झाली कीं, खुद्द त्या बाईंचाच फोन आला! पण मला काय माहीत? टेलिफोनची घंटी वाजतेय् म्हणून धांवत गेलें. रिसीव्हर उचलला आणि उत्तर दिलं. तशी त्या बाई फिदीफिदी हसत म्हणाल्या, "अहो, मी घरांतच होतें माडीवर!..." हें ऐकतांच मी दणकन् रिसीव्हर खालीं टाकला. फोनच्या तिथून दुसरीकडे निघून गेलें! पुढचं कांहीं ऐकायला सुद्धां नको म्हणालें. . .त्यानंतर एकदोनदा टेलिफोनची घंटी वाजली तरी मीं जाणूनबुजून फोन घेतलाच नाहीं! मग कुणाचा होता हरी जाणे!... माणसांनीं एवढी फसवणूक करावी म्हणजे काय? अशानं कुठं नीटपणीं जगतां येतं का? तरी पण अशीं माणसं इतरांच्या नाकावर टिच्चून जगतातच ना? एकदा निर्लज्ज झाल्यावर सोईरसुतकं कशाचं आलंय्? असल्यांशीं वाद घालण्यापेक्षां त्यांचा नाद सोडून द्यावा हेंच सर्वांत उत्तम! पण त्यांनींच आपली पाठ धरली तर मग काय? स्वतःला त्रास करून घेण्याशिवाय इलाजच कोणता? आपल्यामुळं इतरांना त्रास होतो हें अशांना कळत कसं नाहीं मीं म्हणतें!

♠

आमच्या आजोबांचे एक मित्र आहेत. मोठा गमतीदार माणूस. म्हाताराच आहे. पण वागतो तरण्यासारखा. म्हणजे कधीं थकलेला दिसत नाहीं. सदा तरतरीत. नेहमीं कष्ट करायची तयारी. रोज पांच मैल तरी चालणार. तर ह्यांचं आमच्याकडे नेहमीं येणं जाणं.

तसा हा गृहस्थ मोकळ्या मनाचा. पण आला कीं भारी कटकट वाटते. आम्हां मुलांचं रोज वय किती विचारील! कुणाचं लग्न केव्हां करणार याची चौकशी करील! आमच्या खाण्यापिण्यावर, कपड्यालत्त्यावर, सिनेमा-नाटक पाहण्यावर, फिरायला जाण्यावर, शिकायला जाण्यावर अशी फाजील टीका करील! त्या कारणानं भारी राग येतो.

पण बोलतां येत नाहीं. कुरकुरून उपयोग होत नाहीं. कुणाला सांगायची सोय नाहीं. आजोबा मोठे कडक. वडलांपर्यंत तक्रार जात नाहीं. आईजवळ सांगून न सांगून सारखंच. तिचं म्हणणं, लक्ष देऊं नये. वडील माणूस बोलतंय्, बोलेना? अंगाला भोकं तर नाहीं पडत? त्यामुळं भारी कुचंबणा होते. आणि वाटायला लागतं कीं, असलीं माणसं घरीं नाहीं आलीं तर उत्तम! पण तसं होत नाहीं आणि आमच्या डोक्यांतूनहि हें जात नाहीं. असो, असं सांगावं तेवढं थोडंच आहे.

● ● ●

# अनोळखी माणसं !

काल संध्याकाळची गोष्ट. अभ्यास करून आळसावल्या-सारखं झालं होतं म्हणून मी सहज फिरायला गेलें होतें. कुठं जायचं हें कांहीं ठरलेलं नव्हतं. त्यामुळं आमच्या घरापुढील लहान रस्त्यानं मुख्य रस्त्यावर आल्यावर मीं एक वेळ डावीकडे आणि एक वेळ उजवीकडे पाहिलं; आणि उजवीकडे जावं असं मनांत आलं म्हणून सरळ उजवीकडील रस्त्यानं निघालें. हा रस्ता एका प्रशस्त आणि नांवाजलेल्या दुकानाकडे जाऊन मनाला रिझविणारा होता. त्या कारणानं इकडेतिकडे बघत आणि रमतगमत पावलं उचलीत न चालतां मी भरभर निघालें. तर गंमत काय झाली कीं, कर्मधर्मसंयोगानं त्याच रस्त्यावरनं माझी एक जुनी मैत्रीण माझ्याच गतीनं लांबून येत असलेली मला दिसली. मला एकदम आनंद झाला. फार दिवसांनीं मैत्रीण भेटली या आनंदांत तिला " कमळेऽ ऽ" असं पुकारीत मी माझा वेग वाढविला. पण तिच्याबरोबर बहुतेक तिचा नवरा असला पाहिजे हें ध्यानांत आलं, तशी मी माझी गति कमी केली, म्हटलं, " जवळ आली कीं कमळी आपोआप भेटतेच आहे. उगाच तिच्या

नवऱ्यासमोर आपल्या मैत्रीचं प्रदर्शन कशाला ? " आणि मी मग चालायचं सोडून रस्त्याच्या एका बाजूला तशीच हसतमुखानं उभी राहिलें.

पण " आत्तां मला तुझ्याशीं बोलतां येणार नाहीं ! " एवढंच जातांजातां पुटपुटण्यापलीकडे कमळीनं माझी कसलीहि कदर बाळगली नाहीं, तेव्हां मात्र माझ्या मनाला विलक्षण धक्का बसला. लहानपणापासून माझ्याशीं अगदीं खेळीमेळीनं आणि जिवाभावानं वागणारी कमळी अशी तिरसटासारखी वागलेली बघून मला मोठं चमत्कारिक वाटलं. वर्फाळ मुलखांतून फिरतांना शरीर गारठून जावं तसं माझ्या मनाचं झालं. या अनपेक्षित वागणुकीनं माझं मन गारठलं; अगदीं गोठून जायची वेळ आली ! कमळीच्या या वागण्याचा मला अर्थच कळेना. कसं अगदीं वेड्यासारखं झालं बाई ! म्हणून मी लग-वगीनं माझ्या दुसऱ्या एका मैत्रिणीकडे गेलें आणखी तिला तडकाफडकीं विचारलं, " लग्न झालं कीं, माणूस एवढं बदलतं कीं काय ? "

" म्हणजे ? कुणाबद्दल म्हणालीस हें ? " माझ्या बोलण्याचा रोख तिला समजला नाहीं. तेव्हां मीं झाली गोष्ट तिच्या कानांवर घातली आणि विचा-रलं, ' नवरा कांहीं खात नव्हता तिला घटकाभर माझ्याशीं बोलली असती म्हणून ? ' त्यावर शांतपणानं तिनं माझी समजूत घालीत म्हटलं, ' तिनं कसं वागावं हा तिचा प्रश्न आहे. नाहीं बोलली म्हणून तुला एवढा राग कां आला ? '

आतां हिच्याशीं बोलायची मला इच्छा झाली नाहीं. कमळीनं माझ्या वह्या हव्या तेव्हां नेऊन माझा खोळंबा करीतहि अभ्यास कसा केला, वेळ-प्रसंगीं माझ्याकडून कधींहि परत न द्यायच्या अटीवर थोडेसे पैसे नेऊनहि आपली अडचण दूर कशी केली, अधूनमधून माझं हवं तें पातळ नेऊन फाटे-पर्यंत कसं तुबललं, वेळीं अवेळीं तिच्या कामासाठीं माझ्या वेळेची पर्वाहि न करतां मला हवं तिकडे कसं नेलं वगैरे वगैरे गोष्टींचा पाढा मीं तिच्यापुढं वाचला होता. तरीहि ती माझी समजूत घालायला लागल्यावर मी काय बोलूं ? आपली गप्प बसलें. भणाणून गेलेलं मस्तक दोन्ही हातांनीं गच्च धरीत शांत करतां आलं तर पाहात बसलें.

त्यामुळं माझ्या दोन्ही खांद्यांवर आपले दोन्ही हात ठेवीत माझ्या ह्या मत्रिणीनं माझ्या डोळ्यांत निरखून पाहिलं आणि मला सांगितलं, ' वेडी आहेस तूं. कमळी स्वार्थानं तुझ्याशीं वागली. परीक्षा पास व्हायला तुझी मदत

होत होती आणि तूं तिच्या उपयोगी पडत होतीस तोंवर तिनं तुझी कदर बाळगली. हें मीं त्याच वेळीं ओळखलं होतं. एकदादोनदा तुला बोलूनहि दाखवलं होतं. पण त्या वेळीं तुला तें खोटं वाटलं. आपमतलबी माणसं कशीं असतात हें मी चांगलं ओळखतें. पण तुला मात्र माझं म्हणणं कधीं पटलं नाहीं. तुझी नि तिची दाट ओळख तुला भोवली ! . . . अजूनहि तूं कमळीला ओळखूं नयेस होय ग ? . . .खऱ्या मैत्रीला निरपेक्ष प्रेम लागतं आणि जगांत हें फार दुर्मिळ हं ! '

आतां मात्र माझं तोंड मीं उघडलं. कपाळावर आठ्या चढवीत मी तिला बोलून गेलें, ' पण तिची नि माझी तर आज कितीक दिवसांची जुनी ओळख ! '

' अं हं ! याला खरी ओळख नाहीं म्हणतां येणार. '

' तें कसं काय ? '

' हा नुसता परिचय. वरवरची कामापुरती तोंडओळख. खरी ओळख एक तर पक्की व्हायला वेळ लागतो आणि दुसरं म्हणजे एकदा ती पक्की झाली कीं, आपल्याला सोडून जात नाहीं. कमळीची आणि तुझी नुसती तोंडओळख होती, असं माझं पहिल्यापासून ठाम मत होतं आणि आहे पण ! तिचं मन तिनं कधींच तुझ्यापाशीं खुलं केलं नाहीं. नुसते गोड शब्द वापरले. भावनेवर तुला तिनं खेळवली. तुझा कुणावर पण कसा ग विश्वास बसतो चटकन ? '

यावर माझा आवाज पुन्हा बंद झाला. ही सांगत होती तें खरं होतं असं आतां मला अनुभवानं पटल्यावर तिला खोडून तरी कशाच्या आधारावर काढायचं ! त्यापेक्षां झाल्या गोष्टीवर आपला आपणच विचार करीत स्वतःशीं पोटभर बोलावं या कल्पनेनं मी गप्प राहिलें. त्या कारणानं माझ्या ह्या मैत्रिणीनंच मला पुन्हा बजावलं, ' आतां तरी शहाण्या व्हा बाईसाहेब ! ' आणि माझ्या ओळखींत नव्यानं येणाऱ्या मीना देशपांडेबद्दल तिनं मला इशारा दिला.... तशी मात्र मी दचकलें. पण माझं मन तिच्याविषयीं साफ असल्यामुळं मीं तिला साफ सांगून टाकलं, ' आतां मी फसायची नाहीं ! चांगली सावध राहीन. माझ्या स्वभावाला मुरड घालीन. तूं बघच ! '

माझ्या या बोलण्यावर माझी ही मैत्रीण हसली आणि तिनं कां हसावं म्हणून त्या वेळीं तिच्यावर रागावलेलं माझं मनहि खोलींत परतल्यावर मला जेव्हां

शिणवूं लागलं तेव्हां माझी मलाच भारी चीड आली. कारण आजपर्यंत या ना त्या कारणानं अनेकांच्या बाबतींत मी स्वतःशींच निर्णय घेतला असतांना देखील मी तो मोडून वागलें होतें ! लोकांच्या गोड शब्दांची भूल पडून माझ्या निर्णयाशीं प्रामाणिकपणानं राहायचं मला कधींच जमलं नव्हतं.

आणि कमळीच्या उदाहरणानं तरी निदान यापुढं मी सावध होईन तर पुष्कळ बरं मी म्हणतें. पण मला शंका आहे. माझ्या स्वभावांत असले डाव-पेच नाहींत. माझ्या सरळपणावरून मी जगाची पारख करतें हा माझ्यांतील मोठा दोष आहे. पण ऐनवेळीं तोच दगा देत असल्यानं मला सगळी होणारी ओळख आपल्या जिव्हाळ्याचीच वाटते ! आणि माझं वागणंहि त्याच दिशेनं होतं ! !

कुणी समजावून दिलं आणि माझ्या मनालाहि कांहीं प्रसंगानं चटके दिले असले तरी आजपर्यंत असं अनेकदा झालं आहे. मला जीं माणसं ओळखीचीं वाटतात आणि ज्यांच्यावर मी विश्वासून राहतें त्यांच्यापैकीं अनुभवानं पुढं बरींच अनोळखी ठरलीं आहेत ! कमळी हें यांपैकीं अगदीं ताजें उदा-हरण ठरेल.

तीनचार वर्षीमागं सुधा फडणीसच्या बाबतींत असाच कांहींसा प्रकार झाला. ती माझी मैत्रीण म्हणून तिच्या भल्यासाठीं माझ्या ओळखींतल्या अरुण पंडिताशीं तिनं लग्न करावं असं माझ्या मनांत आलं. म्हणून एक दिवस बोलण्यावरून बोलणं निघालं तेव्हां मीं तिला हें सांगून टाकलं. तिला आणखी कुणीतरी अरुणबद्दल बोललं होतं म्हणे. परंतु माझ्यावर तिचा दांडगा विश्वास. मी सांगेन तें तिच्या हिताचं अशी तिची ठाम समजूत झाली. आणि वडिलांच्या करवीं हें स्थळ पसंत केलं. अरुण दिसायला चांगला, वागणुकीला चांगला, घर खातंपितं, शिकलेला मुलगा. चार माणसांत त्याची उठबैस. तेव्हां अरुण चांगला आहे हें माझ्याप्रमाणंच सर्वांचंच म्हणणं; आणि सुधा दिसायला फारच चांगली. तेव्हां अरुणनंहि तिला पाहतांच पसंत केली. लग्न थाटांत झालं. दोन्हीकडील करवली म्हणून आरवलें मिरवलें.

पण वर्ष दोन वर्षांतच मी समजून होतें तें हें चांगलं स्थळ वाईट ठरत गेलं आणि त्याचं खापर माझ्या डोक्यावर फुटायची वेळ आली !..... म्हणजे त्याचं असं झालं कीं, अरुण सुधाला अडाणी माणसासारखा वरचेवर मारहाण

करूं लागला आणि केवळ वडिलांच्यासाठीं तिच्याशीं आपण लग्न केलं असल्याची भाषा बोलूं लागला ! मी तर थक्कच झालें हें कळलं तेव्हां ! ........ आणि त्याहिपेक्षां मला धक्का देणारा कडेलोट झाला तो खुद्द सुधानंच अरुणच कुणा एका पोरीवर प्रेम आहे आणि त्या कारणानं तो आपल्याशीं एकजीव होऊं शकत नाहीं असं मला सांगितलं तेव्हां ! !.....अरुणसारखा साधा सरळ मुलगा असं कांहीं करील हें स्वप्नांतहि कुणाला खरं वाटलं नसतं. पण त्याच्या स्वभावांतील हें गुपित कळलं नसतं. तशी मी बरीक मनांतून चांगलीच हादरून गेलें.....लहानपणापासून ओळखीत असलेला अरुण असा अनोळखी ठरूं शकतो या गोष्टीवर माझा विश्वासच बसेना ! .....पण वस्तुस्थिति जेव्हां निराळीच निघाली तेव्हां मात्र मी खजील झालें; आणि मुकाट्यानं मीं सुधासमोर शरणागति पत्करीत म्हटलं, ‘ असं हें माहीत असतं तर मी तुला त्याच्याबद्दल बोललें नसतें !.....मला आतां पश्चात्ताप होतोय् ! ...... तुला हें स्थळ मीं उगाच सुचविलें बघ !.....’

त्यावर सुधा कांहीं बोललीच नाहीं. कुठंतरी शून्य दृष्टीनं टक लावून बघत वसली. त्यामुळें माझ्या जिवाला चुटपुट लागली. ती बोलली तर उत्तम असं वाटूं लागलं पण ती मुलखाची स्वाभिमानी. चकार शब्द तिनं काढला नाहीं. मी मात्र तिच्यापासून दूर जाऊन माझ्याच तोंडांत मारून घेतली आणि पुन्हा अशा भानगडींत पडायचं नाहीं म्हणून ठरवलं—

परंतु गेल्या वर्षीं अचानक भूकंपाचा धक्का बसावा तसं शिदूच्या बाबतींत मात्र पुन्हा झालंच ! आणि माझा जीव कसा अगदीं पोखरून निघाला. अगदीं सपाटून वाळवी लागावी तसा !

शिदू म्हणजे माझ्या घरीं नेहमीं येणारा जाणारा. बाळपणापासून ओळखीचा. नेहमीं त्याची माझी अनेक गोष्टींवर चर्चा व्हायची. पण तो बी. ए. झाला आणि कुठंतरी कारकून म्हणून नोकरीला लागला. स्वाभाविकच त्याचं येणंजाणं कमी झालं. मीं म्हटलं कामाचा तगादा पाठीमागं लागला तेव्हां नसेल आला. तेवढ्यावरच मी विसंबलें. त्याची जास्त चौकशी केली नाहीं.

पण मागच्या वर्षीं एकदा काय झालं कीं, आमच्या गांवच्या लखू माळ्याच्या मुलाची बदली कुठं लांब झाली तेव्हां ती जवळ करून घेतां आली तर बघा म्हणून तो आमच्याकडे आला. तसंच त्यानं त्या विशिष्ट खात्यांत शिदू

असल्याचंहि आम्हांला सुचविलं. त्यामुळं शिंदूला सांगितलं कीं काम होईल या खात्रीवर मी लखूला घेऊन शिंदूच्या कचेरीचा पत्ता काढीत गेलें. माझी भावना मी यश घेऊन येणार ही होती. म्हणून हसऱ्या चेहऱ्यानं मी गेलेली. पण झालं बरीक वेगळं. मला पाहिल्याबरोबर शिंदूनं प्रश्न केला, " कां येणं केलं ?" तशी मी अशानं असं झालंय् म्हणून आलेंय् असं म्हणालें. मला वाटलं त्यावर तो कांहीं तोड नक्की काढील. पण नाहीं. त्यानं मला एका वाक्यांत सांगून टाकलं, " कचेरींतल्या कामाबद्दल मला कुणी अशी वशिलेबाजी केलेली आवडत नाहीं !—खासगी ओळखी घरांत. इथं नाहीं !—" आणि त्याच्या-बद्दलच्या माझ्या सगळ्या अपेक्षा जमीनदोस्त झाल्या. माझ्या घरच्या अन्ना-वर वाढलेला हा शिदू एवढं चमत्कारिक बोलेल याची मला पुसट कल्पना असती तरीं मी त्याच्याकडे गेलें नसतें— पण त्यानं माझ्या डोळ्यांत चांगलंच अंजन घातलं! हिरमुसल्या मनानं मीं तेथून पाय काढला आणि लखूला सांगून टाकलं, " कामाचं जमत नाहीं बाबा !—पुढं पाहूं. "

त्यावर विचारा लखू हरीवर हवाला ठेवून माघारीं गेला. पण माझं मन मात्र मला अजूनहि खातं आहे कीं, एवढ्याशा साध्या अधिकाराच्या जागेवर असणाऱ्या शिदूनं माझ्या मैत्रीचा एवढा अव्हेर करायला नको होता !—

गेल्या पंधरवड्यांत मात्र याच्या अगदीं उलटा अनुभव मला आला. मैत्री-वरून उडत चाललेली माझी श्रद्धा पुन्हा स्थिर होण्यासारखं अचानक घडलं. मनाला एकदम उभारी आली.

कांहीं काम अचानक निघालं होतं म्हणून मी मुंबईला गेलें होतें. बरोबर घरचं कुणी येऊं शकलं नव्हतं. आणि मुंबईला मी पहिल्यांदाच चाललें होतें. त्यामुळं जीव कसा कावराबावरा झालेला. भेदरून गेलेला. तरी पण उसनं अवसान आणून मी सराइतासारखी प्रवासाला निघालेली. पण कुणाशीं बोलणं नाहीं कीं कुणाला कांहीं विचारणंहि नाहीं. कुणी ओळखीचं भेटेनाच तर बोलूं कुणाशीं ?

शेवटीं खंडाळा स्टेशन ओलांडून गाडी पुढं निघाली आणि बोगदा जवळ आल्यानंतर मोठ्या उत्सुकतेनं मीं माझ्या शेजारीं बसलेल्या एका बाईला विचारलं, ' किती बोगदे लागतात हो वाटेंत ?' तशी ती बाई हसली. तिनं आपल्या पोक्त वयाला साजेलसं मला उत्तर देत म्हटलं, 'आज पहिल्यांदा का

चालली आहेस ?... तर मग सगळं समजावून देतें हं !...' आणि खरोखरच तेथून पुढच्या सगळ्या प्रवासांत तिनं एखाद्या लहान मुलाला सांगावी त्याप्रमाणं मला सारी माहिती सांगितली. एवढंच नव्हे तर मला जिथं मुंबईंत जायचं होतं तिथं ती स्वतः बरोबर आली. आणि ठराविक वेळीं पुन्हा परत येऊन तिनं मला बोरीबंदरवर आणून पुण्याच्या गाडींत देखील तिकीट काढून देऊन बसवलं !... मला आश्चर्याचा धक्काच बसला. ओळखपाळख नसतांनाहि ही बाई अगदीं घरोब्यांतील असावी त्याप्रमाणं कशी वागली, मला कांहीं समजेनाच. पण मी बसलेली गाडी मुंबई सोडून निघाली तेव्हां 'हात-पाय शाबूत घेऊन पोचलें' असं तिनं दिलेल्या पत्त्यावर मला घरीं जातां क्षणींच पत्र टाकायला जेव्हां सांगितलं तेव्हां तर मी तिच्याकडे विलक्षण आश्चर्यानं 'आ' वासीत पाहातच राहिलें !... तिला होकार द्यायचं देखील मला भान राहिलं नाहीं ! तिच्या चांगुलपणानं मला एवढी भारली होती कीं, मला स्वतःचाहि क्षणभर विसर पडला होता ! ...

● ● ●

# स्नेहसंमेलन

परवांच्या भाद्रपदांतील गोष्ट आहे. आमच्या घरीं गौरी बसल्या होत्या, त्यामुळं आमच्या शेजारणी हळदी-कुंकवाला म्हणून आमच्याकडे नटूनथटून आल्या होत्या. माझ्या कांहीं मैत्रिणी पण त्या निमित्तानं घरांत गोळा झाल्या होत्या. दुपारचे तीन वाजले होते. गौरी जेवल्या होत्या. आमचीं जेवणं उरकलीं होतीं; त्यामुळं आमची एक शेजारीण मला म्हणाली, "आज आपण संमेलन करूं." मला तिच्या बोलण्याचा अर्थ उमजला नाहीं. कधीं घर सोडून बाहेर न जाणारी बाई नाहीं ती भाषा काय करते आहे? मला कळेना. म्हणून मीं तिला विचारलं, "संमेलन कसलं हो?" तशी ती चटकन् म्हणाली, "तुम्ही रोज सभेला जातां तसलं! शाळेंत पोरं करतात तसलं. शिकलेलीं माणसं करतात तसलंच बघा! समजलं?" आणि खूप हसली.

त्यामुळं दुसऱ्या शेजारणीनं मला बजावलं, "आज आम्ही व्रत करून आलोंय्. सभा करायची. गौरी रात्रीं जागवायच्या त्या आत्तां जागवूं या." आणिक मी कांहीं बोलायच्या आधींच तिसरी पुढं होत म्हणाली, "आज लई खेळायचं. झक्कास गानं गायचं. तुम्ही फोटो काढा. गानं यंत्रांत टिपून घ्या."

आत्तां मात्र माझ्या डोक्यांत प्रकाश पडला.तरी म्हटलं ह्या हळदीकुंकवाला एवढ्या लवकर जमल्या कशा ? आलं ध्यानांत. त्यांच्या कल्पनेचं मला पहिल्यांदा हसूं आलं. पण नंतर मीं त्याच कल्पनेचं मनापासून स्वागत केलं. माझ्या अशिक्षित शेजारणींना हवं असलेलं संमेलन पार पाडायचा मीं लगोलग निश्चय केला आणि त्यांना विचारलं, "अध्यक्ष कोण होणार ?"

"अध्यक्ष ?" प्रत्येकीनं माझ्याकडे रोखून पाहिलं. कुणाला माझं बोलणं कळलं नाहीं. मग मी त्यांना समजावून देत म्हटलं, "संमेलन करायचं तर पुढारी नको का ?"

"येऽऽ बाई ग ! आमच्या सभेला तसलं लागत नाहीं. आपुन साऱ्या एकच असूं या. पुढारी नको. मग मजा येणार नाहीं."

"अच्छा. नको तर नको. बरं कार्यक्रम काय करूं या ?"

"आम्ही खेळूं. तुम्ही आमच्यांत या खेळायला. फोटो काढा. तुमच्या यंत्रांत आमचं गाणं घ्या. रेडिओसारखं वाजलं पाहिजे !"

माझ्या शेजारणींना फोटो काढायची हौस होती. गाणं ध्वनिमुद्रित करून ऐकायची हौस होती. खूप दिवस माझ्यामागं त्यांचा तगादा होता. पण त्यांच्यापैकीं चांगलं असेल तें शोधायच्या नादांत मी होतें. आज बघूं, उद्यां बघूं, असं मीं चालवलं होतं. कारण सगळंच फोटोला ठीक नव्हतं. ध्वनिमुद्रणाला योग्य नव्हतं. त्याकारणानं कुणाला हो म्हणावं, आणि कुणाला नको म्हणावं, हा माझ्यापुढं पेंच होता.

पण आतां त्यांनीं अचानक मला पकडल्याकारणानं आवडनिवड बाजूला ठेवणं भाग पडलं. मी चटकन् "ठीक आहे" म्हणालें. त्यासरशीं एकजण आपल्या नव्या लुगड्याचा पदर डोईवर नीट सावरीत म्हणाली, "बघा ! म्हटलं नव्हतं ? ताई आमचं ऐकतील ! अहो, हौसेला कुठं मोल असतं काय ?"

त्यामुळं ह्या संमेलनाला येईल तो खर्च मीं खुशीनं केला पाहिजे, असा इशारा मला नकळत मिळाला; आणि मीं त्यांची हौस पुरी भागवायचा बेत पक्का केला. घटकाभर सगळ्याजणींना बाहेरच्या खोलींत बसवलं. आंतल्या खोलींत टेप रेकॉर्डर नवी टेप बसवून तयार ठेवला. कुणाला दिसणार

नाहीं असा अगदीं बाजूला ठेवला. कॅमेरा सजवला, आणि मग सर्वांना मोठ्या खोलींत या म्हटलं.

सगळ्याजणी लहान मुलांच्या उत्साहानं आंत आल्या. सणासुदीच्या आनंदानं हसल्या. आपली हौस भागणार म्हणून हरखून गेल्या, आणि मग सर्वांनीं मिळून एकदम मला खेळून दाखवायचा बेत केला. जणू खऱ्या कार्यक्रमाची रंगीत तालीम करावी तसा थाट आणला. लहान मुलं कोपऱ्यांत बसलीं. मोठ्या बायका व मुली खेळूं लागल्या.

पहिल्यांदा पांचसहा प्रकारची संगीत फुगडी एकदम सुरू झाली. भराभर उखाणे बाहेर येऊं लागले. बायका तापल्या, तव्यावर लाही फुटावी तशा फडा-फडा बोलूं लागल्या. त्या वेळीं त्यांच्या पायांतील जोडव्यांनीं पायाखालच्या फरशीवर आणि तोंडांतल्या पकव्यानं तोंडाजवळ असा सुंदर ताल दिला कीं, विचारूं नका ! मीं ध्वनिमुद्रणाचं यंत्र गुपचूप सुरू केलं. कॅमेरा गळ्यांत अडकवला आणि दोन चार फुगड्या चुटकीसरशीं छायाचित्रित करून टाकल्या. कुणाच्या लक्षांत आलं नाहीं ! कुणाला समजलं नाहीं.

फुगडी मागं सरली आणि कोंबडा पुढं आला. गाणं गात कोंबडा रंगला पकवा घालीत घर घुमलं. बायका खेळांत रंगून गेल्या. तेवढ्यांत मीं सैंपाक-घरांतील सूप, लाटणीं, कळश्या आणिक तांब्या—भांडं आणून त्यांच्या पुढ्यांत ठेवलं . . .

एकामागून एक खेळ निघूं लागले . . . गाणीं निघूं लागलीं. . . . सूप, नाचवून झालं. कळशी फुंकून झाली. लाटणीं खेळून झालीं. पण कुणी दमलं नाहीं. कुणीं माघार घेतली नाहीं. सभा गाजवायच्या ईर्ष्येनं सारं चाललेलं ! त्यामुळं मीहि कुणाला अडवलं नाहीं. कुणाला कांहीं बोललें नाहीं. वहिणीच्या हातांत कॅमेरा देऊन हळूच त्यांच्या खेळांत घुसलें.

आमच्या शेजारणींनीं नेहमींचे खेळ झाल्यावर मग एक नाच करून दाख-विला. झन झनभर काचेच्या बांगड्या हातांत घालून त्यांनीं हातांची कसरत करीत, गाणं म्हणत आणि पकवा घालीत तो नाच एवढा सुंदर केला कीं, त्याचं शब्दांनीं वर्णन करणं अशक्य आहे ! त्या वेळचा त्यांचा उत्साहदेखील दृष्ट काढण्याजोगा वाटला मला. आणि या नृत्यानंतर त्यांनीं

सवती–सवतीमधील भांडणाचं दाखविलेलं प्रत्यंतर तर एवढं बहारीचं झालं कीं हसून हसून सर्वांची मुरकुंडी वळून गेली ! ..

एव्हांना चार वाजायला आले होते. समोरच्या घड्याळांत एकीनं पाहिलं. त्यामुळं ती म्हणाली, " ये, आतां पुरे ग. ट्रायल बस झाली. ताईंना यंत्र काढा म्हणावं आतां. खराखरा खेळ आतां करूं आपण. " तेवढ्यांत मीं ध्वनिमुद्रणाचं यंत्र बंद करून टेप उलटी गुंडाळून घेतली आणि ती सुलट करून पुन्हा नीट बसवीत सर्वांना म्हटलं, " आतां एका ठिकाणचीं खेळ-गाणीं ऐका हं ! तुम्हीं तस्सं म्हटलं पाहिजे, तरच मी रेकॉर्डिंग करीन. "

बायका क्षणभर चपापल्या. लोकाचं ऐकायला उत्सुकल्या. माझ्याकडे आश्चर्यानं बघूं लागल्या. पण मीं तिकडं लक्ष दिलं नाहीं. टेप सुरू केली आणि तेथून बाहेर निघून आलें......

" अगबाई ! अगबाई !.....हें काय ? हें काय ? आमचं खेळ गाणं काढून घेतलं वाटतं !.....आतां रे देवा !....."

टेपवरील ध्वनिमुद्रण कानांवर येत गेलं तसा बायकांचा एकच गलका उडाला. कुणी कौतुकल्या. कुणी घाबरल्या. कुणी आश्यर्यानं थक्क झाल्या. कुणी टाळी वाजवीत गडगडा लोळण घेत हसूं लागल्या. कुणी माझ्याशीं आनंदातिरेकानं झोंबूं लागल्या.....सारा एकच हलकल्लोळ उडून गेला. कांहीं तरी अचानक जादू घडावी तसा प्रकार झाला.....

मगळी टेप संपली. हसण्याखिदळण्यांत कार्यक्रम संपला. तशी मी पोटभर हसलें. बायकाहि खूप हसल्या, आणि मग एकजण हळूच दाताखालीं पदर घेत म्हणाली, " अडाण्याचं पण गाणं काढतां नाहीं तुम्ही ? . . काय चमत्कार आहे !...." तशी दुसरीनं तिला दाबली, " ये ऽ गप. पुन्हा ऐकूं. आपला आवाज नीट ध्यानांत घे. आपण पण माणसंच ! शिकलेल्यांनाच काय सोनं लागलंय काय ? ऐक गुमान. "

त्या वेळीं मला त्यांच्या बोलण्याचं कौतुक वाटलं. स्वतःची अपुरी इच्छा पुरी करून घेतांना त्यांना वाटणारा आनंद आणि माणूस म्हणून स्वतंत्रपणें वाटणारा स्वाभिमान मला मोठा कौतुकास्पद वाटला. मी त्यांच्याकडे टक लावून बघत राहिलें.....

त्या घटकेला एक विचार माझ्या मनांत मोठ्या प्रकर्षानं आला. कुठंतरी वाचल्याचं ध्यानांत आलं. भारताच्या सामाजिक विकासासाठीं सेवाधारिणीचं व्रत घेऊन आमच्याकडे आलेल्या भगिनी निवेदितांनीं विद्यार्थ्यांच्या एका सभेंत म्हटलं होतं तें लक्षांत आलं. " केवळ रामायणाचें पठण करण्यांत समाधान मानून राहूं नका ! आपल्या मातृभूमीच्या उद्धारार्थ आजच्या या काळीं स्वतःच्या कृतींनीं नवें रामायण निर्माण करून दाखवा ! " असं त्यांनीं त्या वेळीं म्हटलं होतं. मला या शब्दांची याद आली. लोकांना काय हवं आहे याचा अभ्यास करून त्यांच्या विकासासाठीं, भल्यासाठीं आम्ही सामाजिक कार्यकर्त्यांनीं कामाला लागलं पाहिजे अशी माझी त्या घटकेला पक्की समजूत झाली. माझ्या शेजारणींनीं मला एक नवा धडा गिरवायला दिला आहे असं वाटलं. त्यांच्या खेळांचे सामने भरवावेत, गाण्यांच्या चढाओढी लावाव्यात, त्यांचे मेळावे भरवावेत, असा विचार मनांत येऊन गेला. त्याचबरोबर त्यांच्याजवळ असलेला स्वाभिमान लक्षांत घेऊन त्यांच्याकडून आपण कांहीं अवश्य शिकण्याजोगं आहे याचीहि मला खात्री पटली.

पण मनांत आलं तें मी कुणाजवळ बोललें नाहीं. माझ्या शेजारणींच्या घोळक्यांत जाऊन बसले. त्यासरशीं एकजण आपल्या रडत्या पोराला दटावीत मला म्हणाली, " संमेलन झकास झालं आमचं नाहीं ? " मीं चटकन् होकारार्थी मान हालवली. फोटो घेतल्याचं सांगून टाकलं, त्यामुळं बायका एकाएकीं एवढ्या लाजल्या, अशा हसल्या आणि त्यांना न सांगतां फोटो घेतले म्हणून माझ्यावर लटक्या रागानं असे डोळे फिरवूं लागल्या कीं, त्यांची माया माझ्या पोटांत मावेना ! त्यांची हौस माझ्या नजरेंत ठरेना. मी कौतुकानं त्यांच्याकडे बघत राहिलें. स्वयंस्फूर्तीनं केलेल्या त्यांच्या खेळ–गाण्यानं मला एवढी भारून टाकली होती कीं, माझी तहानभूकच हरपून गेली होती !

अखेर शेवटीं मीं त्यांना तसं बोलून दाखवलं तेव्हां जीव शांत झाला. तेवढ्यांत माझ्या आईनं सगळ्याजणींना गौरीच्या दर्शनाला बोलावलं. आम्ही तिकडे गेलों. मीं सर्वांना हळदकुंकू दिलं. पानसुपारी दिली वहिणीनं चांपयाचीं फुलं वांटलीं आणि आईनं बत्तासा देऊन साखर खोबऱ्याचं सारण चमचा चमचाभर वांटून सांगितलं, " आतां गौर जागवूं या. कान मोडूं गौरीचे. " आणि मग मोठी मजा आली. पालथ्या लाकडी कांठवरीवर वस्त्र-

गाळ केलेली राख घालून तिच्यावरून आमच्या आईनं एका हातांत घेतलेलं लाटणं व दुसऱ्या हातांत घेतलेली डाव आळीपाळीनं फिरवीत असं मोठं देखणं पार्श्वसंगीत काढलं कीं, आमच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. घोळयामेळयानं आम्ही मग गौरीचं गीत सामुदायिकरीत्या म्हणून आमच्या संमेलनांची अखेर साधली ! ...

घरच्या हळदीकुंकवासाठीं म्हणून त्यानंतर वायका मग निघून गेल्या. त्या वेळीं सहा वाजायला आले होते. तीन तास कसे आले आणि गेले मला कळलं नाहीं. मी आच्यारी का विच्यारी झालेली. कधीं न अनुभवलेलं आणि कधीं न पाहिलेलं बिनतयारीचं हें अवचित घडून आलेलं स्नेहसंमेलन माझ्या डोक्यांत ठाण मांडून बसलं होतं...आमच्या महिला मंडळांतून आम्ही जिवाचा आटा-पिटा करूनहि जें घडून आलं नव्हतं तें एकाएकीं घडून आलेलं बघून झालेला आनंदहि माझ्या मनांत मावत नव्हता !...आणि स्नेहसंमेलनं खेळीमेळीनं झालीं पाहिजेत, बिनवर्गणींचीं झालीं पाहिजेत, बिनभांडणांचीं झालीं पाहिजेत. स्वयंस्फूर्तीनं झालीं पाहिजेत, आपुलकीनं सर्वांनीं भाग घेऊन झालीं पाहिजेत, आटोपशीर पण खुमासदार झालीं पाहिजेत, या माझ्या डोक्यांत गेले कितीक दिवस ठाण मांडून बसलेल्या भावनेला अवचित कशी वाचा फुटली याचाहि मला उलगडा होत नव्हता !...सारं कसं जादूची कांडी फिरवावी तसं झालं होतं; त्यामुळं आपल्या इच्छापूर्तीचे भूक-लाडू व तहान-लाडू घेऊन या संमेलनाला आलेल्या वायकांचे आभार मानायचे कशी विसरलें याचाहि मला उलगडा होत नव्हता !...त्या कारणानं मी उगाचच एवढी भांबावून गेलें होतें कीं अंधार पडला तरी गौरीपुढं बसलेली असूनहि वेळेला पंचारती पाजळायचं भान मला राहिलं नाहीं !...

• • •

# हीं माणसंहि बोलतात !

तसं पाहिलं तर खरं म्हणजे भविष्यावर माझा विश्वास नाहीं. त्यामुळं कुठंहि छापून आलेलं आपल्या राशीचं भविष्य वाचायच्या भानगडींत मी सहसा पडत नाहीं. पण काय असेल तें असो, परवां एका खेड्यावर जायचं होतं म्हणून मीं अगदीं आवर्जून सांपडेल तें भविष्याचं पान मनापासून वाचून काढलं. माझ्या कर्क राशीचा मजकूर तर एकदा सोडून दहादा वाचून पाहिला. मीं अंगावर घेतलेल्या कामामध्यें यशस्वी होईन किंवा नाहीं याची खात्री यावी म्हणून हा भविष्याचा आधार घेतला आणि घरच्या जिन्याच्या पायऱ्या उतरून दारांत उभ्या असलेल्या मोटरींत बसलें.

गाडी सुरू झाली तशी मी अस्वस्थ झालें. अंगावर गार वारा येत होता तरी मला चैन पडेना. काय होईल नि काय नाहीं या धास्तीनं मी उगीचच काळवंडून गेलें. इतर माणसांना यश आलं नाहीं तिथं आपला काय पाड लागणार अशी रुखरुख मनाला लागलेली होती. म्हणून मी माझ्या शेजारीच बसलेल्या शांताबाईंना विचारलं, " म्हणजे या बायकांना हें सारं पसंत नाहीं म्हणायचं तर ? " म्हणून तर म्हणतात कशा " वेळ नाहीं. आम्हांला

असलं करायचं काय ? घर सोडून लोकांच्या दारांत काय म्हणून जायचं ? तुमचं तुम्हांला लखलाभ होऊं दे बाई. आम्हीं इथं घरांत बेस आहोंत.' असं म्हटल्यावर माणसानं काय बोलायचं हो? उत्साहच नाहीं मेल्यांजवळ कसला तो, त्यांना बघा नवं कांहीं नकोच. बापजादे करीत आले तेवढं करीत राहायचं एवढंच त्यांना माहीत. आयुष्याकडे बघायची त्यांची दृष्टिच आकुंचित!"

शांताबाईंच्या या बोलण्यानं माझी बेचैनता जास्तच वाढू लागली. उभ्या आयुष्यांत मला असा अनुभव नसल्यामुळं मी गोंधळून गेलें. यांतलं खरंखोटं करायला माझं मन राजी होईना. म्हणून मीं शांताबाईंच्याजवळ विषय काढला.

"एवढ्या या बायका बेपर्वा नि वाईट आहेत का हो ?"

त्यावर इकडेतिकडे कांहींतरी हरवावं नि तें सांपडूं नये अशी शोधाशोध करीत त्या म्हणाल्या, "होय हो ! कुठून झक मारली नि या छंदांत पडलें असं झालंय् बघा." त्यामुळं मी गप्प बसले आणि समोर पाहात राहिले.

भरधाव वेगानं रस्ता कापीत मोटार चालली होती आणि क्षणाक्षणाला तें गांव जवळ येत चाललं होतं... त्याच वेगानं माझं मन वाचलेल्या भविष्याचा पाढा घोकीत सारं जमेल असं दिसतंय् या आशेनं स्वतःशीं कांहीं खूणगांठ बांधीत गेल्याबरोबर काय काय केलं पाहिजे याचा विचार करण्यांतच गुंतलं होतं... तरी पण एका गोष्टीचा खुलासा करून घ्यावा म्हणून मी शांताबाईंना चिमटलं, "काय हो, हळदीकुंकवाचा बेत तरी केलाय् ना ?"

माझ्या या प्रश्नाचं शांताबाईंना विलक्षण हसूं आलं. "अहो, त्यासाठीं तरी गेलं पाहिजे एवढी अक्कल नको का ?"

"म्हणजे ? या गांवच्या बायका कधीं जमतच नाहींत एकत्र अशा ?"

"अजून तरी नाहीं जमल्या बाई !"

"तुम्ही कोणी बोलावलं तरी ?"

"हो हो ! ठाऊक असतांना हात दाखवून अवलक्षण करायचं कशाला!"

"अस्सं !"

शांताबाईंच्या बोलण्याचा रोख माझ्या ध्यानांत आला म्हणून मी त्यांच्याशीं बोलायचं सोडून दिलं आणि स्वतःशींच बोलत राहिलें, 'बोलावलंच नाहीं

तर येईल कशाला कोण ? या बायका अडाणी दिसल्या तरी त्यांना देखील मन आहेच कीं ! भावनेला भावना पटल्याखेरीज त्या वश व्हायच्या नाहींत ...पण तें कांहीं असू दे. आपण सारं जमवून घ्यायचंच. आपली शक्ति पणाला लावून पाहायचीच. माणसानं माणसाला ओळखलं पाहिजे नि ओळख दिली पाहिजे...तेवढी पारख या बायकांना निश्चित असेल...त्याहि माणूसच आहेत !...आमच्यासारख्यांची माणुसकीहि त्या पारखीत नसतील कशावरून ?...आम्हीच त्यांच्या पसंतीला उतरलों नसूं कशावरून ?...

" तें बघा त्या झाडींत लपलंय् ना तेंच तें गांव. देवळाचा कळस वर डोकावतोय. पाहिलांत का ? "

शांताबाईंनीं मध्येंच मला डिवचून माझी तंद्री मोडली म्हणून मी क्षणभर दचकलें. पण झाडांच्या कुशींत वसलेलं तें गांव नजरेंत येतांच कसा कोण जाणें मला थोडा धीर आला आणि मी बोलून गेलें. ' या निसर्गाप्रमाणें इथलीं माणसं देखील चांगलीं-असलीं पाहिजेत..."

आणि तिथं जाऊन बघतें तों खरंच तसा अनुभव येत गेला. तेव्हां आनंदानं माझं मन भरून आलं.

साडेपांच सहा वाजले असतील. हळदीकुंकूं आहे म्हणून त्या लहानशा गांवांतील शेतकरणी लाजत-मुरकत आपलं चिमुरडं कडेवर घेऊन पाटलांच्या वाड्यांत जमत होत्या. मागं पुढं पाहात आपण जणू कांहींतरी जगावेगळं करीत आहोंत या भावनेनं वाड्यांत पाऊल टाकीत होत्या. आणि अंथरलेल्या बनातीवर बसतांना आपला धक्का कुणाला लागतो कीं काय या भीतीनं अंग चोरून धरून आणावं तशा बसत होत्या. पदर माथ्यावरून पुढं ओढतांना त्यांची धांदल उडत होती. स्वतःच्या पोराला सावरतांना त्यांना सावरल्यासारखं होत होतं. एकमेकींकडे बघतांना बावरत होत्या. ओळखीच्याच रोजच्या सरावांतील चेहऱ्यांना पाहतांना त्यांना बोलूं कीं नको असं होत होतं.

सुरवातीला मी कांहीं बोललें नाहीं. त्या जमा होत चाललेल्या बायकांना नुसती पारखीत राहिलें. शेवटीं त्या घोळक्यांतील एका म्हातारीनं माझ्याजवळ विचारपूस केली, ' पाव्हणी कवा येणार ती ? आमास्नी सैंपाकाला लौकर माघारीं गेलं पाइजे, पाव्हणीला यायला लई उशेर असल तर मग द्या

हळद-कुंकू आमाला, कामाचा वखत...पुनाच्यान वाईच लौकर ये म्हनावं पाव्हणीला पाइजे तर. खरं का खोटं वा ? ”

त्यावर एकदम काय बोलावं मला सुचेना. मी त्या बाईकडे बघत राहिलें तशी मीच ती ‘ पाव्हणी ’ अशी शांताबाईंनीं सर्वांना बातमी दिली. मला एकदम चमत्कारिक वाटलं.

मी त्या बाईशीं बोललें नाहीं म्हणून ती पट्दिशीं कांहीं बोलेल या धास्तीनेंच माझा चेहरा काळवंडून गेला...पण पाहतें तों उलट घडलं. ती म्हातारी हसली. जणू मी तिला आवडलें अशी मान हालवीत ती शेजारणीच्या कानांत कांहीं कुजबुजली....आणि तिनं हसतच मला विचारलं, “ गांव कोनच वो ? ”

आतां मात्र मीं तोंड उघडलं, “कोल्हापूर–सांगलीच्यामध्यें आहे एक खेडं.”

“ तरीच !.....शिकलायसा किती बुकं ?”

“ शिकायला मिळेल तेवढं सगळं ! ”

“ आमची कानी येती का ? ”

माझ्याशीं ती म्हातारी जास्त बोलायला लागली म्हणून एकीनं तिला चिमटली तेव्हां खर्दिशीं तिच्या हाताला हिसका मारुन म्हातारी ओरडली, “ गप ग !....बोलूं दे कीं वाईच. लई शिकली म्हून काय झालं ? मानूसच हाय न्हव ? ” त्यामुळं होंकारार्थी मान हालवीत मीं तिला सांगितलें, “ येंतात कीं ! माझी आजी मला रोज कहाणी सांगायची ..तुम्ही बायका अशा कहाण्या जमतां कीं नाहीं ? ”

माझ्या बोलण्याचा रोख थोडा बाजूला झाला तशा सगळ्याजणी टकमका एकमेकींकडे पाहात राहिल्या. एकदोघींनीं नाहीं अशी मान हलवली. पण कुणी शब्द काढला नाहीं. त्यामुळं पुन्हा बोलणं भाग पडलं. म्हणून मीच म्हणालें, “ बोला कीं ! भ्यायचं कशाला ? ” तेव्हां मात्र अगदीं मागच्या कोपऱ्यांत बसलेली एक बाई पुटपुटली, “ कुणी बोलवील तर यायचं का उगचंच ? ” आणि लगेच दुसरीनं तोंड उघडलं, “ बोलण्यानं बोलणं वाढतं. हळदकुंकू लावा म्हणावं. धारची वेळ झाली. धनी आतां येतील. ” आणि जणू इशारा दिला. त्यामुळं शांताबाईंना हळदकुंकू लावायला खुणावीत मी उभी राहिलें आणि सर्वांना उद्देशून म्हणालें, “ आम्ही इथे तुम्हाला रोज कांहीं ना कांहीं शिकवणार आहोंत. म्हणजे वाचायला, लिहायला, खेळायला, शिवण, विणकाम,

वगैरे वगैरे, तर तुम्हाला नेमकं काय पाहिजे कळेल का ? म्हणजे मग तसं करायला बरं. अगदीं मोकळ्या मनानं बोलायचं हं ! ”

माझ्या मनांतलं मी बोललें खरी. पण त्याचं फळ काय मिळतंय् कुणाला माहीत. या कल्पनेनं माझी नजर समोरच्या हळदी-कुंकू लावून घेण्यांत दंग झालेल्या बायकांच्यावर भिरभिरत राहिली. एवढ्यांत एक बाई हात वर करून लाजत लाजत म्हणाली, “ पैलं मजी असं, कीं येळ वकूत वगून काय तें व्हावं. तिनी सांजला जमायचं न्हाई वो ! पोरास्नी भूक लागती. चूल पेटवाय नग ? ” तोंच दुसरीनं उठून सांगितलं, “ मला वाचायला शिकायचं. आईकडचा सांगावा वाचाय आला पाइजे... पण पोरांसारकी पाटी पेनसुल हातांत नग बाई. ” आणि पाठोपाठ तिसरीचा आवाज आला, “ नऊ टुकड्यांची चोळी मला येती. मी ती दुसऱ्यांस्नी शिकवीन. तुम्ही मला अखंड चोळी शिकवा वेताया. ” लगेच जोर येऊन चौथी बोलली, “ मला टिपडं, पायमोजे झालंच तर गळ्याभोंवतालचा पट्टा विणाय् येतो. तें मी कुनाला पाइजे तेला शिकवीन. तुमी मला झवलं विणाय् शिकवा. सुरूची वीण पाइजे. पुस्तक अस्त का वो ह्याचं ? ” आणि मग लाही फुटावी तशी एकेकीनं जीभ उचलली. “ आपला भाजीपाला कसा करावा शिकवा. परड्यांत जागा हाय! गणूला लई पाइजे असती भाजी. रोज इकत मिळत न्हाई न् पैसबी नसत्यात जवळ येळला...हां हां शेळीच्या दुधाची चांगलं दहा रुपय म्यां साठीवल्याती. तेवढ्यांत काय शिकायचं सांगा. मला म्हातारीस आतां लिव्हनं पुसनं नग. दुसरं काय तरी बोला...म्हशीचा दुधाचा हिशोब म्या लोण्यानं माखल्यालं व्वाट वडून ठेवतें. एकांद येळला तें पुसलं कीं गेला हिशोब. तेवढा लिवून कसा ठेवायचा सांगा. ताक करतांना मस्स घोकतीया पन जमाना पोरांच्या वानी. घरच्या न शेताच्या कामांतनं फावत न्हाई. जीव घाईला येस्तोवर काम ! येळ हाय कुनाच्या बांजवळ म्हना. पन त्यांतनंबी येळ काडून कशीदा येतीया दीन काडून मी तुमच्या लुगड्यावर म्हनरीन तर ! ... आमास्नी पोरांच्या वाणी खेळ नग बाई. सनासुदीचा फुगडी झिम्माच बरा. तुमाला येती का ? ”

बायका बोलतील तसा मला धीर येत गेला. माझ्यावरच येऊन ठेपलं म्हणून मीं मध्येंच तोंड घातलं, “ मला सगळं येतं. ” तेवढ्यांत एक धीट

चिमुरडी मुलगी उठली आणि मला आव्हान पुकारावं तसं म्हणाली, " फुगडी खेळतां ?" त्यामुळं मीहि माझा पदर कमरेला खोचीत म्हणालें, " कां नाहीं?" आणि हात पुढें केला. मला वाटलं तें सारं लुटुपुटीच्या पोरापोरांच्या बोलण्या सारखं झालं. पण बघतें तों खरंच तिनं माझे हात धरले आणि उखाणा घातला, " एवढासा पाटा बाई जिरीमिरी वाटा पाव्हणीबाईचा ठमकारा मोठा ! "

हें ऐकून मी ओशाळलें. खजील झालें. वाटलं आपलं कांहींतरी चुकलं... पण तसं न दाखवतांना फुगडी घुमवतांना मींहि एक उखाणा घातला, " फुगडी खेळतांना जमीन झाली लाल माझ्यासंगं फुगडी खेळतेस पकवा तरी घाल. " आणि जोरानें फुगडी खेळलें...तेवढ्यांत दुसरी बाई पुढं आली आणि तिनं आपला हात माझ्या हातांत घातला. दम लागला होता तरी मीं पुन्हा पावलं उचललीं आणि ठसक्यांत उखाणा घातला, " तुझ्या घरीं माझ्या घरीं आहे विदली सरी, फुगडी खेळतांना बाई नको तालीवारी. "

फुगडी मागं सरली आणि चौघींचा झिम्मा पुढं आला, मला माहीत होतं तें गाणं सांगत मी टाळ्या देऊं लागलें तशी एक म्हातारी आवेगानं पुढं झाली आणि तिनं माझ्या पायांना मिठी मारीत म्हटलं, तूं आमची हाईस ! तुला आमचं येतं. आमाला त्वां वळीकलंस ! ...तुजी वळक आमाला पटली..."

त्या म्हातारीच्या मिठीनं माझं काळीज सुपाएवढं झालं. माझ्या डोळ्यांत आनंदाश्रु आले. भरल्या शब्दांनीं मीं तिला उठवली. तशी माझ्या डोळ्यांत बघत तिनं मला सांगितलं, " अशी येशील तर तूं म्हणशील ते व्हईल ! सोंग नको काढुसा. आमी फसायच्या न्हाई हं ! ...आतां एक गोष्ट सांग...दिवे-लागण झाली...वकूत लई झाला..."

या बायकांच्या परीक्षेंत मी पास झालेली बघून माझा जीव घागरीएवढा झाला. पोर कडेवर घेऊन घरीं जायला निघालेल्या बायकांच्याकडे पाहात मी म्हणालें, "गोष्ट कसली पाहिजे ? देवांची कां माणसांची ?" त्यावर कुठूनतरी आवाज आला, " वाटेल ती चालेल. " म्हणून मी उभ्याउभ्याच त्यांना गोष्ट सांगितली, "...अशीच एक आजीबाई होती. ती अशाच एका गांवांत राहा-यची, तर एक दिवस काय गम्मत झाली कीं, आपलं अंगण ती रोजच्यासारखी खराट्यानं झाडूं लागली, तेवढ्यांत एक मुलगा ओरडत आला. ' गांधी खून खटल्याची बातमी ऽऽऽ कटाचा शोध लागला. ' आलं. तें एकलं मात्र. ह्या

आजीबाईनं खराटा फेकून दिला. कमरेवर हात ठेवून उभी राहिली. तिनं त्या पोराला बोलावलं. तो पुढं आला. त्यानं वर्तमानपत्र तिच्या हातावर ठेवलं. आजीबाईनं दंडावरच्या चोळींत मुडपलेले आठ आणे त्याच्या हातावर ठेवले. मोड मागितली नाहीं. त्या मुलांनहि दिली नाहीं. तो निघून गेला...मी तिथूनच फिरायला चाललें होतें. तिथं थांबलें. आजीबाईला म्हणालें, ' वाचतां येतं ? ' तशी ती ठसक्यानं म्हणाली, ' गांधीबाबाचं तेवढं येतं ! ...देव त्येच्या आत्म्याला शांति देवुं दे...उभ्या दुनियेचं काळीज होता त्यो गांधीबाबा. अख्खी भावगंगा राजावाणी लुटून नेलीवती त्येनं...' आणि हें ऐकलं तशी तिथें न थांबतां पुढं गेलें. हळूच मान वळवली ! तों थाटांत ती आजीबाई वाचीत उभी असलेली ! तोंड हलत असलेलं."

पण मला एकीनं मध्येंच अडवलं, आणि विचारलं, " खरी गोष्ट सांगतां का रचलेली ? "

" अगदीं खरी आहे " मला आनंद झाला म्हणून मी आत्मविश्वासानं बोललें. सर्वांच्या तोंडावर समाधान तरळलं. बत्तीच्या उजेडांत त्या बायकांच्या मनांतील भावगंगेला भरतं आलेलं आढळलं. मीं सर्वांना मनापासून नमस्कार केला.

बायका निघून गेल्या. माझ्याकडे बघत बघत चालल्या. जातां जातां एकीनं कानगोष्ट केली. " भेटला तुमी लई छान झालं...काय म्हणशील तें करूं आमी. पैसं लागलं तरी देऊं ! ....बाईच आपुलकीनं घ्या. संभाळून घ्या. खुळाभैरा जीव असतो आमचा "...आणि ती निघून गेली.

एवढा वेळ शांतपणें उभ्या असलेल्या शांताबाई मला मोठ्या ठेक्यांत म्हणाल्या, " कार्यक्रम कसा काय झाला ? खूप बायका जमल्या नाहीं आज ? "

त्यावर मीं आनंदानं मान हलवली. म्हणून त्याच पुन्हा म्हणाल्या, " पहिल्यांदाच जमल्या पण बोलल्या कां हो ? "

" कां नाहीं बोलणार ? ...हीं माणसंहि बोलकीं असतात. पण आपण त्यांना संधि दिली पाहिजे. बोलूं दिलं पाहिजे. त्यांच्याशीं एकजीव झालं पाहिजे. त्यांना हवं तें दिलं पाहिजे. आपला देश खरा हा शांताबाई ! "

शांताबाईंच्या बोलण्याला मीं उत्तर दिलं. पण त्यांना तें पटलं नसावं. त्यानीं मला ठोसरा दिला. " एवढं करायला वेळ कुणाजवळ आहे हो ? आणि तुमच्यासारखं सर्वांना कुठून जमायला."

मी गप्प राहिलें. उत्तराला प्रतिउत्तर दिलं नाहीं. माझं भविष्य खरं ठरलं याच आनंदांत मी रमून गेलें. माझ्या राशीला दिवस चांगले, माझ्या हातून चांगलं काम होईल. माझ्यावर लोकांचा विश्वास बसेल असं जें मीं वाचलं होतं तें खरं ठरलं म्हणून त्या बायकांनीं केलेल्या मागणीचा पुरवठा कसा करतां येईल याचाच विचार करीत मी घरीं परतण्यासाठीं मोटरमध्यें पाऊल टाकलं, तोंच एक बाई मोटरीच्या दाराच्या काचेंतून डोकावीत पुटपुटली, 'पुनाच्यान कवा येशील वो पाव्हणीबाई ? आमचा च्याहा नाहीं का घ्याचा !' म्हणून मी काच खालीं करीत हसलें आणि पुन्हा लवकरच येण्याचें वचन देऊन मीं तिचा हात माझ्या हातांत घेऊन दाबला. . .

त्यानंतर गाडी भरधाव वेगानं निघाली खरी पण माझं मन मागं मागं रेंगाळूं लागलं. 'म्हणून शांताबाईंना एवढंच म्हणालें, " हें मानसशास्त्रच अवघड असलं तरी शिका. देशाचा हा प्राण आपण त्यांच्यासारखं होऊनच शाबूत ठेवला पाहिजे. हीच आपली खरी संपत्ति. त्यांना घेऊनच आपलं प्रत्येक पाऊल आतां पडलं पाहिजे ! ..." आणि त्या बोलक्या माणसांच्या आठवणींत गुंग होऊन समाधानानं डोळे मिटून घेत मागें पाठ टेकली.

• • •

# आतां इथंच थांबूं या !

पहाटेचा थंड वारा अंगाला झोंबतो म्हणून मीं माझा पदर बराच घट्ट आवळून धरला आणि वाऱ्याच्या जोराच्या वेगानं पायाखालचा दगड निसटून जाईल कीं काय या उगाचच वाटणाऱ्या धास्तीनं डोळे मिटून घेतले. पण त्याच क्षणाला देवीची आरती सुरू झाल्यानें मिटलेले डोळे पुन्हा मीं उघडले. माझी नजर समोरच्या दर्या-वरून डाव्या बाजूला असलेल्या देवळाकडे वळली. आरतीच्या मंगल सुरांनीं माझ्या काळजाचा वेध घेतला. झांज, घंटी, नगारा, चिपळ्या, टाळ, टाळ्या आणि गीत यांच्या एकमेकांत विलोभनीय रीतीनं विलीन झालेल्या आवाजानं माझं भान हिरावून घेतलं. स्वतःचा विसर पाडणाऱ्या त्या आवाजानं माझीं पावलं उचललीं. मलाहि नकळत मी देवळाकडे निघालें. एखाद्या विशिष्ट मंत्रांनीं मन भारून जावं तशा थाटांत डोळे विस्फारून आणि श्वास रोखून मी देवीच्या दर्शनाला उतावीळ झालें...

चालतां येईल तितक्या वेगानं मीं देवीचा गाभारा गांठला. तिथं दहावीस माणसं हात जोडून देवीसमोर उभीं होतीं. त्यांत चार पांच गुजराथी आणि दोन तीन महाराष्ट्रीय स्त्रिया होत्या. आदबीनं आणि शालीनतेनं हात जोडून

त्यांची देवीची प्रार्थना चालू होती. त्यांच्याप्रमाणंच हात जोडून आपणहि उभं राहिलं नाहीं तर बरं दिसणार नाहीं म्हणून मी माथ्यावरचा पदर नीट घेतला आणि इतरांप्रमाणं टाळचा वाजत्रीत देवीकडे पाहणार एवढ्यांत मी उतरलें होतें त्या हॉटेलचा भय्या डोळे मिटून समोर उभा असल्याचं माझ्या ध्यानांत आलं. त्यामुळं टाळचा वाजवायच्या पवित्र्यांत असलेले माझे हात जिथल्या तिथं थांबले. मी कां कुणास ठाऊक 'आ' वासून त्याच्याकडे बघूं लागलें. आणि तें ध्यानांत येतांच त्यानं माझ्याकडे बघून फक्त 'जी' म्हटलें आणि प्रार्थना संपायच्या आंतच देवीपुढं त्यानं साष्टांग नमस्कार घातला. त्यामुळं कांहीं मंडळींचं लक्ष त्याच्याकडे गेलं एवढेंच नव्हे तर एवढा वेळ एका तापथांत झडणारा घंटानादहि किंचित् मंदावला ! ... जणू त्याचा हा नमस्कार जगावेगळा घडला असल्याची ग्वाही सारं देऊळ देऊं पाहात होतं! ...

"हें काय भैय्या ?" त्याला असं कां केलंस म्हणून विचारल्याशिवाय मला दम निघेना.

माझा आवाज ऐकतांच तो एकदम ताठ उभा राहिला. कांहीं न बोलतां त्यानं माझ्याकडे नुसतं पाहिलं आणि वाऱ्याच्या वेगानं तो आरती संपण्या-पूर्वींच निघून गेला... पण माझ्याखेरीज इतर कुणाच्या तें लक्षात आलं नाहीं. जो तो देवीच्या पूजेंत दंग होता !... आरतीहि पूर्वीच्या दिमाखांत चालू होती...

देवीची आरती संपली आणि मग मीहि देवळांतून बाहेर पडलें. वाटल भय्या सरळ हॉटेलकडे गेला असणार तेव्हां आपण खोलीवर परतलं कीं त्याला विचारायचं, "असा कां वेडयासारखा मधेंच नमस्कार केलास ? सारे लोक मनांतल्या मनांत तरी हसले नसतील ?"

पण देवळाच्या पंचवीस सव्वीस पायऱ्या उतरून मी खालीं पाऊल टाक-णार एवढ्यांत एक टॅक्सी घेऊन येत भैय्यानं म्हटलं, "खोलीवर जायचं हाय न्हवं ?" खरं म्हणजे घटकाभर समुद्राची हालचाल डोळ्यांत सांठवून घेऊन मी परतणार होतें. मला घाईनं परतायची आवश्यकताहि नव्हती. पण भैय्यानं गाडी आणल्यानं मी चटकन् आंत बसलें आणि शोफरला सांगितलं, "धोबीतलाव... " आणि पुढची खूणहि सांगणार इतक्यांत भैय्या पुढच्या सीटवर बसत म्हणाला, "हम पता देंगे चलो..."

" असा वेड्यासारखा आरती संपण्याआधींच कसा नमस्कार केला भैय्या ?" मोटर हॉटेलपर्यंत येईस्तोंवरहि दम न निघाल्यानं मीं भैय्याला प्रश्न केला.

त्यावर त्यानं एवढंच उत्तर दिलं,

" ...मी साधा माणूस. मनाला यील तेव्हां देवापुढं हात जोडतों. मला येळवकुत लागत न्हाई !... फावलं तवा देवाची गांठ घेणारा मी !..." आणि तो गप्प झाला. अशा बोलण्यानं त्याला काय म्हणायचं होतं कुणाला माहीत. पण तें ऐकून मला मात्र थोडं चमत्कारिक वाटलं. एरव्हीं आनंदी दिसणारा त्याचा चेहरा काळवंडलेला बघून आणि सदोदित खुशींत असणारा आवाज किंचित् बदसूर झालेला ऐकून मी खरंच थोडी चपापलें. आणि त्या-मुळंच आश्चर्यानें त्याच्याकडे पाहण्यापलीकडे मी कांहीं बोलूं शकलें नाहीं !

शेवटीं हॉटेलजवळ गाडी आली तेव्हां मोटरचं दार उघडीत तोच म्हणाला, " माणसांतबी लई फरक असतो बाईसाब ! ... "

" म्हणजे ?" त्यानं अधिक खुलासा करावा या हेतूनं मी मोटरचे पैसे चुकते करीत मान वळवली.

" ... मजी त्येचं असं हाय, तुमच्या मनाला यील तसं तुमी वागतां, इतर माणसंबी तशी वागत्याती कैक. पण...पण माझी गोष्ट निराळी. मला मन न्हाई. जित्यापनींच त्येचा मुडदा झालाय म्हणीनासा !... कळ दाबून यंतर चालावं तसा मी हालतों."

" म्हणजे काय भैय्या ? ... थोडा सरळ बोल ना !.. मी तर समजून होतें की..."

"... की ह्यो लई गाढवं हाय असंच नव्ह ?"

" नाहीं. तुझ्यासारखा सुखी माणूस जगांत नसेल अशी माझी कल्पना ! "

माझ्या या कल्पनेनं भैय्याची नजर तारवटली. तो गंभीर झाला. क्षणभर आपल्या पागोट्याच्या टोकानें त्यानं कपाळावरचा घाम पुसल्यासारखं केलं आणि मग तो म्हणाला, " पुस्तकांतलीं माणसं आनिक आमी माणसं ह्यांत जमीन अस्मानाचा फरक असतूया !...दिसतं तसं जग नसतं बाईसाब ! मी हसतों, कर्कन् मान वाकस्तोवर वज्ज घेऊन भराभर जिना चढतों, गिरा-इकापुढं धावत पळत जाऊन इमान राखतो मजी...व्हय मजी मी तुमच्या-सारका माणूस नसतो असं न्हाई !... पर देवानं मला माझ्या खऱ्या आयु-

क्षाचा इसूर पाडलाय! ! ...त्येच्या विच्छेसारखा मी हालतूया एवढंच ! ..."
इतक्यांत दारांत कुणी तरी नवीन माणसं त्या हॉटेलांत राहायला आल्याची खुण सामानसुमानानं गच्च भरलेल्या मोटारनं दिल्यानं भैय्या चटकन् तिकडे धावला आणि मी माझ्या खोलीवर परतलें...

नौकर लोक रात्रंदिवस लोकांच्यासाठीं कष्ट उपसतात, क्षणाक्षणाला पुढ्यांत येणारं काम त्यांना मुकाट्यानं करावं लागतं, आपल्या कल्पनेलाहि सहन होणार नाहीं एवढं मोठं ओझं वाहून नेतांना त्यांची कुरकुर ऐकू येत नाहीं, त्यांच्या हातावर चारआठ आणे ठेवले तरी आपल्या कामाचा मोबदला भरपूर मिळाला या आनंदानं ते लवून मुजरा करतात. कष्टापलीकडे त्यांच्या आयुष्याला इतर सुखसोयींची ओळखपाळख विशेष झालेली नसते वगैरे वगैरे प्रकारच्या सांच्यांत बसलेलें या लोकांचं जीवन मीं पाहिलं असल्यानं माझी अशी समजूत होती कीं, ह्या लोकांचं आयुष्य फार चांगलं असलं पाहिजे. हो, एरव्ही त्यांच्या तोंडावरचा आनंद मावळला असता ! पण तसं होत नाहीं त्याअर्थी ते सुखीहि असले पाहिजेत खास. हो, निदान ह्या भैय्याबाबत तरी मी तसं धरून चाललें होतें. गेल्या दहा पंधरा दिवसांत मीं त्याला पाहिलं तें नेहमीं समाधानांत. त्याची वागणूक किती नम्र आणि किती हजरजबाबी ! आपल्याला कुठं जायचं झालं तरी ह्या भैय्याची आठवण यावी एवढा तो सतत तयार असायचा. जिना उतरायचा अवकाश कीं तो हमखास पुढं येऊन म्हणेल, " गाडी आणू ?" आणि ' हो ' म्हणतांच धावत पळत पुढं व्हायचा. त्याच्या भल्या मोठ्या शरीराची धावपळ ट्रॅम बसच्या गर्दींत सुरू झाली कीं, माझा जीव खालीवर व्हायचा. वाटायचं, चुकून हा वाहनाखालीं सांपडला तर ? आणि एक दिवस असं घडलं कीं, त्यानं उडी नसती मारली तर ट्रॅमखालीं त्याचा पाय तरी सांपडला असताच ! तें बघून मी लांबून ओरडलें होतें, " अरे अरे ! ...मरशील ना ?" त्यावर तो आभाळ गडगडावं तसा हसून म्हणाला होता, " मरायसाठीं जित्ता राहिलों ?" आणि असा पुन्हा एक वेळ हसला कीं, त्याचे बारीक डोळे भुवयाखालच्या उंचवटींत पार गडप झाल्याचा मला भास झाला... खरंच, किती विचित्र जीवन ह्या भैय्याचं ? ना घर ना दार. ना बायको ना पोरं. हॉटेलच्या ओसरीवर याचं बिऱ्हाड थाटलेलं ! झोपायला लागेल तेवढीच याची जागा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे . स्थळप्रत
अनुक्रमांक 37836 वि: निबंध
नों. दि. 5.11.62



एरव्हीं पाय ठेवायलाहि सत्तेची जागा नाहीं ! म्हणून मीं एकदा त्याला सहज विचारलं होतं, " भैय्या, तुझ्या घरीं कोण कोण आहे ?" त्यावर मिस्किलपणें हसून माझी बॅग खोलींत आणून ठेवीत त्यानं म्हटलं होतं, " माझ्याशिवाय सगळी! ..." काय होता त्याच्या बोलण्याचा अर्थ त्याचा त्याला माहीत ! मीं या बोलण्याचा खुलासा विचारला तेव्हां त्यानं एवढंच सांगितलं होतं, " तुमच्याशिवाय माझी आजवर कुणींच विचारपूस केली न्हाई. मला जुळेना बोलायचं ! ... "

आणि एकपरी खरं होतं त्याचं म्हणणं. ' बॅग वर आण, खालीं ने, टॅक्सी बोलाव, लिफ्टमनला सांग, आज दोन तीन आणे बस्स, पुन्हा बघू इ. शब्दां-पलीकडे त्याच्याशीं कुणी बोललेलें मीं ऐकलं नव्हतं ! ... मला वाटायचं. इतर कोणी न बोलेना. आपण बोलूं या. तोहि माणूसच आहे आपल्यासारखा. आणि शिवाय त्याला पाहिलं कीं, मला माझ्या एका दूरच्या नात्यांतील काकांची याद यायची. लहानपणीं मला त्यांनीं भरपूर खेळवलेलं असल्यानं त्यांचा ठसा माझ्या मनावर कायमचा कोरलेला होता. तेहि याच भैय्या-सारखे दिसत. त्यामुळें " मुंबईला तो गेलाय. वज्ज वाहून पोट भरतो. " असं आमच्या गांवच्या कांहीं लोकांनीं म्हटल्याचं ऐकल्यानं हा भैय्या म्हणजे माझे ते काका तर नसतील अशी शंका मनांत वायची. हो, त्यासाठींच मी त्याच्याशीं बोलायची. आणि त्यानंहि माझ्याशीं खूप बोलावं असं मला वाटा-यचं ! कधीं तरी, हां, निदान एकदा तरी त्यानं माझ्या काकांच्या सारखी मला हांक मारावी असं मला नक्की वाटायचं !...

" आज कितीला जायाचं हाय ?" भैय्याच्या या आवाजानं आणि दारा-वरच्या पडद्यांतून डोकावल्यानं माझी विचारमालिका मध्येंच तुटली...मी दचकलें. नुसती मान वर केली आणि त्याच्याकडे पाहिलं. तो नेहमींप्रमाणं हसून म्हणाला, " आज कितीला जायचं ?... मी जरा... " पण पुन्हा तो अडखळला. म्हणून मी त्याला विचारलं, " आत्तांशी कुठं दहा वाजलेत ! एवढ्यांतच चौकशी ?" त्यावर तो म्हणाला, " पोरांची परीक्षा हाय आज-पासनं. तवा गाडी सांगून ठेवाय पाहिजे आदीच ! ..." पण तिकडे लक्ष न देतां मी त्याला म्हणालें, " भैय्याजी, तुझं गांव कोणतं ?"

" मी जाईन तें माज गव. न्हाईन तें माजं घर. "

" तरी पण आलास कुठनं तूं ?"

" कुनाला दकल हाय ? आलों तवा न्हान होतों. एका मोठ्या मानसानं मानगूट धरून मला आगीनगाडींतनं आनलं आनिक मी आलों ... या उप्पर मला ठावं न्हाई !"

" पण असा कसा तूं आलास त्या माणसाबरोबर ? आणि तुझ्या आई-वडिलांनीं कसं पाठवलं ? "

" आई जलम दिला तवाच मेली वती. आन् बाला माजी सुद होती कुटं ? त्येनं कवा तरी चौकशी करावी माजी ? ...मला कळलं तें असं की, दारूच्या आन् रांडंच्या पायांत सारं घरदार इकून करजाचा डोंगर त्येनं रचला... याज दिकुन फिटायची लक्षनं दिसनात म्हनं ! तवा सावकारानं मला त्या याजाची रक्कम म्हन हिकडं आनलं !...माज्या कवळ्या मानगुटीवर मोट्ठं वज्ज दिऊन त्येनं माजी मान अवगडवली ...काळीज धाव्यावर बसवून मला मारलं. ..अंगाची सालडं निगस्तोवर त्येनं काम करून घेतलं ..तोंडाला फेस येस्तोवर राब राब राबीवलं. ..पायाचं टुकडं पडलं तरी आनिक मानचं कंडकं पडलं तरी वज्जानं माजी सोबत सोडली न्हाई बाईसाब !"

भैय्या बोलतां बोलतां गहिवरला ...पागोट्याचा सोगा त्यानं डोळ्याला लावला आणि मान बाजूला फिरवीत म्हटलं, " जाऊं द्या. तुमच्या सुकी जिवाला माजं गरिबाचं दुक्कानं माखल्यालं कीर्तन नको.. जातों मी !... " आणि खरोखरच तो तिथून निघून गेला ...

" भैय्याजी !..." मी चटकन् पुढं धावलें. पण तो माझ्या दृष्टीच्या टप्प्या-आड केव्हांच झाला होता. ..माझा नाइलाज झाला. मला त्याच्याशीं खूप बोलायचं होतं. त्याला आणखी प्रश्न विचारून माझ्या त्या काकांच्या आयुष्याशीं जुळतं दिसणारं त्याचं जीवन मला वाचायचं होतं ... पण त्यानं माझी निराशा केली. . खरंच, त्याची कहाणी ऐकून माझ्या मनाला त्रास होईल अशी कां बरं त्याला भीति वाटली असेल ? माझ्या मनांत पुन्हा आशेचा किरण डोकावला, ' काकाशिवाय इतरांना एवढा कसा जिव्हाळा वाटावा माझ्याबद्दल ? हो, तेच असतील बहुतेक. ' आणि म्हणून खोली बंद करायच्या भानगडींत न पडतां अंगावरचा पदर नीट सावरून मी पायांत

चपला सरकावल्या आणि भरभर जिन्याकडे जात भैय्याला हांक मारली, " टॅक्सी लाव भैयाजी ऽऽऽ"

" जी ! आलों..." भैयाचा आवाज कुठून तरी लांबून आला आणि आवाजापाठोपाठ त्याचीं पावलंहि ओळखूं आलीं...

" कुठं जायचं ? "

" टॅक्सी बोलाव. मग सांगतें. "

" जी !...आत्तां एवढ्यांत आणतों..." भैय्या तुरूतुरू जिना उतरून पुढं झाला आणि मी भरभर त्याच्या मागून निघालें. एक वेळ वाटलं मधेंच थांबवून त्याला विचारावं, " आतां तूं हें आयुष्य सोडून दे. पुन्हा शीक आणि इतर कांहीं करतां येईल तर पाहा.. " आणि म्हणून मी जिना उतरतां उतरतां अडखळलें...आणि त्याच क्षणाला भैय्यानं मागं मान वळवून म्हटलं, " न्हानपनीं वाटायचं लई शिकावं, शाळामास्तर व्हावं... न्हाईतर पोट भरस्तोंवर मोटार हानावी !... कवा कवा चिपाडाच्या पाठीवर बसून मोटारीसारका पाँ... पाँ... करीत मी भिरीरा पळायचा दिकुन !... पन सारी हावस मरून गेली... घान्याला जुपल्याला बैलावानी डोळ्यावर झांपड आली !...न्हाई त्या रस्त्याला आयुक्ष पळत निघालं..." आणि तो पुढें निघाला. पण मीं त्याला थांबवून विचारलं, " भैय्या, निराश होऊं नको. अजूनहि तुला शिकतां येईल...मी शिकवतें पाहिजे तर..."

" छे आतां येळ गेली... नग आतां मला इथंच थांबू द्या बाईसाब!...वज्जीं उचलून उचलून हात लाकडावानी कठीनढोक झाल्याती तिथं लेकनी बसल कशी वो ?... वलवाळकं, शिळंपाकं, कुचकं नासकं खाऊन जड झाल्याल जिवाला आतां ' ग म ' जमला वो कसं ? तुमीच सांगा ?... साऱ्या मनांतल्या विच्छेची राख फासून मुर्दाड झाल्याला काळजांत लिवनं पुसनं करून येनारं श्यानपन शिरावं तरी कसं आतां ?... एक डाव गेलं तें गेलं !... जाऊं द्या· हाई हें बेस हाय !... आपल्या जल्मांत हेंच देवानं राकलं बत म्हनायचं आन् गप बसायचं...अनिक हें तर कांय वाईट आतां ? तुमच्या सारक्यांची सेवा ह्या हातानं घडतीया हें माजं केवढं नशीब ?..." एवढं बोलून त्या भैय्यानं नेहमींप्रमाणं हास्य केलं आणि गाडी आणायला म्हणून तो निघून गेला...पण मी मात्र त्याचं हें बोलणं ऐकून तिथून माघारीं वळलें. धावत

पळत खोली गांठली मी. . .परमेश्वर ठेवील त्या परिस्थितींत जीवनाचं केलेलं मोजमाप भैय्यासारखंच प्रत्येकाला करतां आलं पाहिजे या वेडया आशेनं मी त्यानं माझ्यापुढं उघडून ठेवलेलं त्याच्या जीवनाचं पुस्तक काळजीपूर्वक वाचूं लागलें. . . तें वाचतां वाचतां त्याच्या जीवनाला वेगळी कलाटणी देणं शक्य आहे किंवा नाहीं, कीं तो म्हणतो त्याप्रमाणं त्यानं इथंच थांबायचं या प्रश्नाचं उत्तर शोधून काढायला मी उतावीळ झालें होतें. . . आणि त्यामुळंच समोरच्या खिडकींतून भैय्या मोटर घेऊन येत असलेला दिसला तरी मी मात्र जागची हाललें नाहीं. . .

देवीच्या देवळांतील गाभाऱ्यांत चालू असणाऱ्या आरतीच्या घंटानादापेक्षांहि जोराचा अस्पष्ट घंटानाद माझ्या मनांत घुमत होता.. .प्रत्येक घंटेच्या निनादाबरोबर भैय्याच्या जीवनाचं एकेक पान नजरेसमोर येऊं लागलं होतं... आणि तें वाचतां वाचतां मला माझ्या काकांचा शोध लावतां आला तर पाहायचा होता !..... ह्या भैय्याच्या जीवनांतच काकाहि विलीन झाल्याची दाट शंका आतां माझ्या मनाला डिवचून गेली होती.....आणि तिचं उत्तर शोधावं म्हणूनच मी अशी शांत उभी राहून समोर पाहात होतें.....आपल्याला बाहेर जायचं आहे आणि भैय्यानं मोटर आणली आहे हें दिसत असूनहि त्यामुळंच मी उमजूं शकत नव्हतें.....

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१८३८ .. वि:
क्रमांक ..२३८०.... नों. दि.
५/७/६
द्वा. ग्र. ९९४३८
REFBK-0011534

आगामी 'सुविचार' प्रकाशनें

पाळणा

गंगाधर गाडगीळ

आग

पु. भा. भावे

श्री. कबीरवचनावलि

भ. श्री. पंडित

आकाशलहरी

श्री. ना. बनहट्टी

मराठी निबंध

डॉ. म. मा. अळतेकर

मराठी कथा

प्रा. व. दि. कुलकर्णी

▲